मासिक वार्तापत्र • अंक ६ • एप्रिल २०१७ • सहयोग राशी - रु. ५ • २० पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


नकली देशभक्तीचा कलकलाट आणि लष्करातील जवानांचे उठणारे सूर ८

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ - भारतीय फासीवाद्यांची खरी जन्मकुंडली १०

ऑक्टोबर क्रांतीचा वारसा आणि नव्या समाजवादी क्रांत्यांचे आव्हान १४


विधानसभा निवडणूक निकाल – फासिस्ट शक्तींची सत्तेवर वाढती पकड

## याला उत्तर, ना खोटी आशा - ना हताशा

## एक झुंजार प्रगतिशील सामाजिक चळवळ उभारण्याची तयारी करावी लागेल

संपादक मंडळ

उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर विधानसभा निवडणूकांच्या निकालांनी काही जणांना धक्का जरूर बसला आहे, परंतु हे निकाल नक्कीच अनपेक्षित नाहीत. निवडणूकांचे निकाल आल्यानंतर जे काही झाले, तेदेखील बिलकुल अनपेक्षित नव्हते. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांना मुख्यमंत्री बनवणे आणि गोवा व मणिपुरमध्ये भांडवली लोकशाहीची थट्टा करीत, कमी जागा मिळूनसुद्धा भाजपची सरकारे बनवणे हे येणाऱ्या राजकारणाच्या खुणा आहेत.

एका हिंदू मुलीच्या बदल्यात शंभर मुसलमान मुली उचलून आणल्या जातील असे सांगणारी आणि माझ्या एका हातात माला आहे तर दुसऱ्या हातात भाला, असा धमकीवजा इशारा मुसलमानांना देणारी व्यक्ती देशातील सर्वांत मोठ्या आणि विविधतेने नटलेल्या राज्याची मुख्यमंत्री बनली आहे. जेथे मुसलमानांची संख्या दहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तेथेच दंगे होतात आणि जेथे मुसलमानांची लोकसंख्या ३५ टक्क्यांहून अधिक आहे, तेथे गैरमुसलमान अजिबात सुरक्षित नाहीत, असे त्यांचे मत आहे. योगी आदित्यनाथची हिंदू युवा वाहिनी पूर्व उत्तर प्रदेशच्या ३५ जिल्ह्यांमध्ये अगोदरच सक्रिय आहे आणि ती लहानसहान शहरे आणि खेड्यांपर्यंत आपला प्रभाव पसरवते आहे. मऊ आणि आझमगढमध्ये सांप्रदायिक ज्वाळा भडकवण्यात योगी आदित्यनाथ यांची भूमिका सर्वज्ञात आहे. गोरखपूरमध्ये तर त्यांच्या दहशतीचे राज्य सुरू आहे.



निवडणूकांच्या काळात मोदी आणि अमित शहा यांनी उत्तर प्रदेशात सर्वत्र उग्र हिंदुत्वाचा खेळ खेळण्यास योगींना पूर्ण सूट दिलेली होती. आणि आता आरएसएसने एका दीर्घ योजनेनुसार कित्येक जुन्या नेत्यांचे दावे फेटाळून योगींना मुख्यमंत्रीपदी बसवले आहे. आज भांडवलशाही आजपर्यंतच्या सर्वाधिक तीव्र अशा संकटाच्या टप्प्यातून जात आहे. अशा वेळी दोनच गोष्टी होऊ शकतात. महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक दुरावस्थेने उद्ध्वस्त जनतेला काही तात्कालिक मदतीच्या घोषणा देऊन शांत करणे, ज्यांना वारंवारच्या अनुभवानंतर जनता विटली आहे. अशा वेळी जर या असंतोषाला व्यापक आंदोलनामध्ये रूपांतरित करू शकणारी एखादी क्रांतिकारी शक्ती समाजामध्ये नसेल तर फॅसिस्टांच्या लोकरंजक घोषणा आणि वादळी प्रचार जनतेला आपल्यासोबत वाहून नेण्यात यशस्वी ठरतो. इतिहासात याची अनेक उदाहरणे आहेत. उदारीकरण, खाजगीकरणाच्या धोरणांची बुलेट ट्रेनच्या वेगाने अंमलबजावणी करणाऱ्या भाजप सरकारला हे पक्के माहीत आहे की या धोरणांमुळे निर्माण होणारी बेरोजगारी, महागाई आणि सार्वत्रिक दुरावस्था देशभरात स्फोटक जनाक्रोशाला जन्म देणार आहे. या धरबंध घालण्याचे दोन फॉर्मुले शासक वर्गाकडे आहेत. एक म्हणजे धार्मिक पायावर जनतेमध्ये फूट पाडणे आणि दुसरा म्हणजे अंधराष्ट्रवाद. सांप्रदायिक धृवीकरणाचे राजकारण स्वाभाविकपणे

पान १३ वर

पाच राज्यातील पर्यायहीन निवडणूका

## कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतीकारी प्रतिनिधीत्वाचा प्रश्न

**जेव्हा पाच राज्यात निवडणूका चालू होत्या, तेव्हा हा लेख लिहिला होता परंतु कामगार वर्गासाठी या लेखाची प्रासंगिकता बघता हा लेख आम्ही निवडणूका झाल्यानंतर सुद्धा देत आहोत. कारण या लेखात पाच राज्यांच्या मुख्य राजकीय पक्षांच्या, त्यांचा वर्ग आधार आणि त्यांच्या धोरणांचे अगदी योग्य विश्लेषण केले आहे. त्याहून महत्वपूर्ण हे आहे की, या मध्ये कामगार वर्गाच्या क्रांतिकारी पर्यायासंबंधी विस्ताराने लिहिले आहे.**

गेल्या ६५ वर्षांत राज्याच्या विधानसभा निवडणूका आणि संसदेच्या निवडणूकांत वास्तवत: याच तर गोष्टीचा निर्णय होत आलाय की पाच वर्षांपर्यंत भांडवलदार वर्गाच्या 'मॅनेजिंग कमेटी'चे काम कोणती पार्टी करणार. या वेळेसही फार काही वेगळं घडतय असं नाही. या निवडणूकांमध्ये तमाम भांडवली पक्षांमध्ये काय समीकरणे काम करताहेत, यावर अगदी संक्षेपात भाष्य करून आपण या प्रश्नावर येऊ, की क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टीची भांडवली निवडणूकांबाबत काय भूमिका असायला हवी.

### निवडणूकांच्या खेळांतील समिकरणे

या पाच राज्यांच्या निवडणूकांत सर्वात महत्वपूर्ण आणि संख्येनं सर्वात मोठ्या उत्तरप्रदेशच्या निवडणूका आहेत. त्यामुळे उत्तरप्रदेशच्या निवडणूकांना लोकसभा निवडणूकांची स्टेज रिहर्सलसुद्धा म्हटले जात आहे. उत्तरप्रदेश निवडणूकांत एका बाजूला भाजपची राष्ट्रीय लोकशाही आघाडी आहे तर दुसरी कडे सपा-कांग्रेसची युती आहे.

दलितांच्या नावावर निवडणूकीचे भांडवली राजकारण करणाऱ्या मायावतींची बहुजन समाज पार्टी सुद्धा मजबुतीनं मैदानात उभी आहे. सोबतच नेहमी प्रमाणे स्थानिक पेटीबुर्झ्वा (छोटे भांडवलदार) पक्ष, स्थानिक दादा, भाऊ, काकांची तर भरपूर भाउगर्दी आहे जी नेहमी स्वत:साठी सगळे पर्याय खुले ठेवतात आणि वेळ आल्यास गाढवालाही बाप बनवण्याची गौरवशाली भारतीय मध्यवर्गीय राजकीय परंपरेवर अंमल करतात. पश्चिम उत्तरप्रदेशमध्ये मुजफ्फरनगर आणि शामली मधल्या दंगली व सांप्रदायिक तणाव पूर्वीपेक्षा कमी झालाय व परिणामी झालेलं ध्रुवीकरणही कमी झालयं खरं, पण संपलय असं म्हणता येणार नाही. भाजपा या सांप्रदायिक तणावाला अजून भडकवून सांप्रदायिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. कारण नोटबंदी व जाट आरक्षणाच्या वायद्याला पूर्ण न केल्यानं सांप्रदायिक ध्रुवीकरणामुळे भाजपाच्या बाजूने गेलेली जाट मते पून्हा अजित सिंहाच्या राष्ट्रीय लोक दल किंवा सपा-कांग्रेस युतीकडे जाऊ शकतात. अवध आणि पूर्व उत्तरप्रदेश मध्येही नोटबंदीच्या परिणामी भाजपाच्या मतांमध्ये घट होण्याची शक्यता आहे.तरीही अंतिम क्षणी सपाच्या अंतर्गत कलहामूळे मतांचा कौल भाजपाकडे जाण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. सोबतच, बसपाच्या आव्हानाला सपा-कांग्रेस युती दूर्लक्षू शकत नाही. अखिलेश

पान १६ वर

## सोमनाथ केंजळे यांच्या दोन कविता


### ॲलिनेशन

ज्यांच्या कणखर हातांनी
घाव घातले दगडांवर
उभारला संपत्तीसंस्कृतीचा डोलारा
कुणाच्या असण्यावर अन् कुणाच्या नसण्यावर सुद्धा
शेवटचा घाव पडताच
चुकते होतात हिशेब
ॲलिनेट होत बाहेर
फेकली जातात मांण्स
त्यांनीच निर्माण केलेल्या
सुंदर जगापासून ...
मग जग असत नाही
त्यांच्या श्रमाची जादुगरी
मग जगात दिसत नाही
एकही माणूस ...
माणूस झोपडपट्ट्यातून हुंगत राहतो
माणूस वस्त्या वस्त्यातून रांगत राहतो
माणूस शोधत राहतो
हरवलेला माणूस
मग या सुंदर जगात
तो बनत जातो क:पदार्थ...
दखलपात्र जगातलं बेदखल पात्र ...
बेदखल माण्सांबरोबर पांगत जाते वस्ती
बेदखल माण्साबरोबर पेंगत जाते वस्ती
बेदखल वस्त्यांबाहेर
इथिक्स विथिक्स -मॅनर्स डेकोरेमच
विन्ल जातं जाळं
राज्य दूर उभं राहत ...
पाळतिला ठेवलं जात
गिधाडांच टोळं
वस्तीलाच कळू लागतं
माण्सांच दुःख
दुःखाच्या महासागरात बुडून जाते वस्ती
मग वस्तीच कुजबूजु लागते
माण्सांच्या कानात ...
हल्ला बोल! हल्ला बोल!!
ढिम्म हलत नाही

### श्रम, अंतर्विरोध, कामगार वैगरे

एकही दगड खाणीतला ...
पोलाद गुमान पडून रहातं
यंत्रांच्या सांगाड्या सोबत ...
श्रम नावाची लवचिकता
शिरत नाही पोटात जोवर ...
तोवर जग लोंबकळत राहतं
शुन्य प्रहरात निपचित ...
मग श्रमाचं गतीशास्त्र
प्रसवूलागतं दौलत आभाळभर...
श्रमा शिवाय महाल माती असतो
श्रमा शिवाय यंत्र माती असतं
श्रमा शिवाय अस्तित्व माती असतं
मात्र बांडगुळशाही सांगु लागते
हक्क आभाळभर दौलतीवर ...
श्रमाचे मायबाप विकले जातात
बांडगुळी बाजारात चवलीपावलीवर
आता बांडगुळशहा असतो
अनभिषीक्त सम्राट ...
उत्पादन साधनांचा...
अंतर्विरोध थडग्यातून उभा राहतो
अन् म्हणतो मी वर्गसंघर्ष आहे...
मालका विरुध्द गुलामांचा ...
मालका विरुध्द मजूरांचा...
बांडगुळा विरुध्द श्रमाचा...
संघर्ष...आहे...
अंडरग्राउंड ज्वालामुखी ओकत राहतो
नव्या युगाच्या प्रज्ञावान सुर्यांना
विचार तळपू लागतात
अन् नाकारतात म्यान होणं
अंतापर्यंत ...
आता कारखाने असत नाहीत
पगारी गुलामांची स्मशानभूमी...
हत्यारबंद क्रांतीकारकांचे
जीवंत केंद्र बनू पाहतात कारखाने.

## कार्टुनिस्ट तन्मय त्यागीच्या नजरेतून






**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

• रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९६१९०३९७९३, ९१४५३३२८४९

• सोमनाथ, दिपनगर, केडगाव, अहमदनगर ४१४००५ मो. नं. ९१५६३२३९७६, ९६५७५९०४९१

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करुन कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : सोमनाथ केंजळे, सत्यनारायण

संपादकीय कार्यालय : रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. १०० (टपाल शुल्कासह)

# स्वच्छता अभियानाचे देशव्यापी नाटक सुरु असतानाच सार्वजनिक स्वच्छतागृह खचून लोकांचा मृत्यू

सत्यनारायण

सत्तेवर आल्यापासूनच मोदी सरकार सातत्याने स्वच्छता अभियानाची दवंडी पिटवीत आहे. हाथामधे झाडू घेऊन फोटो काढण्यापासून टी.व्ही., वर्तमानपत्रे, रेडिओवर अमाप पैसे खर्च करून जाहीरातींमार्फत जागरूकता निर्माण करण्याच्या बाता मारल्या जात आहेत. परंतु वास्तविकत: स्वच्छ भारत निर्माण करण्यासाठी ज्या गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे, त्यावर काहीही खर्च केला जात नाही. मुंबईसारख्या महानगरामधे जेथील ६० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये छोट्या-छोट्या खुराडयांत राहते, जी किमान मुलभूत सुविधांपासूनच वंचित आहे, तेथील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था पाहूनच तिथल्या परिस्थितीविषयी अंदाज बांधता येऊ शकतो. सार्वजनिक स्वच्छतागृहांची याच गंभीर परिस्थितीचा परिणाम नजिकच्या काळातच मुंबईत झालेल्या अनेक लोकांच्या मृत्यूच्या रूपाने समोर आला आहे. मागील ३ फेब्रुवारीला मानखुर्दमधील इंदिरानगर येथे सार्वजनिक स्वच्छतागृहाची फरशी संडासच्या भांड्यासहित सेप्टीक टँकमधे खचली. त्यावेळी स्वच्छतागृहामध्ये २० ते २५ लोक उपस्थित होते. त्यापैकी बहुतेक जण त्या घाणीमध्ये पडले. अग्निशमन दल आणि पोलिस तब्बल एक तासानंतर घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत आसपासच्या लोकांनीच प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यातील बहुतेकांना बाहेर काढले. पोलिस आणि प्रमुख वर्तमानपत्रांनी तीन व्यक्ती हरीश टीकेकर (वय ४०), गणेश सोनी (वय ४०) आणि मोहम्मद अंसारी (वय ३६)मृत पावल्याचे अधिकृत वृत्त प्रकाशित केले. परंतु स्थानिक रहिवाश्यांच्या म्हणण्यानुसार एकुण ७ जण मृत झालेत. एका मृतांची ओळख पटलेली नाही (ज्याचा मृतदेह त्यांनी बाहेर काढला होता) व तीन जणांना त्या घाणीच्या दलदलीतून बाहेरही काढले नव्हते. या वस्तीमध्ये अनेक लोक असे पण आहेत जे मजूरी करण्यासाठी बाहेरून आलेले आहेत आणि कुटुंब सोबत न आणल्यामुळे एकेएकटेच राहतात. अशातच ते ३ व्यक्ती कोण, त्यांची अद्यापही ओळख झालेली नाही. पण दबक्या आवाजात काही लोक असे म्हणत आहेत कि त्या घटनेनंतर ह्या भागत तीन लोक बेपत्ता आहेत.

हे सार्वजनिक स्वच्छतागृह म्हाडा (महाराष्ट्र हाउसिंग एण्ड एरिया डवलपमेण्ट ऑथोरिटी) च्या मार्फत फक्त १० वर्षापूर्वी बनवले गेले होते. ही शौचलये बांधण्यासाठी अतिशय निकृष्ट दर्जाचे बांधकाम सामग्री वापरली असेल याचा अंदाज यावरून आपल्याला बांधता येतो. ज्या आमदाराच्या आमदार निधीतून ही स्वच्छतागृहे बांधण्यात आली तोच नंतर या म्हाडाच्या अध्यक्ष सुद्धा झाला. अशा पद्धतीची कितीतरी स्वच्छतागृहे आणि निवासगृहे यांच्यामार्फत बांधली गेली असतील व त्यांची सुद्धा दुरावस्था काय असू शकते याचा अंदाज बांधणे अवघड नाही. स्वच्छतागृह पडझडीला मोडकळीस आले असल्याच्या अनेक तक्रारी या भागातील रहिवाश्यांनी देऊनसुद्धा ज्या ठेकेदाराने हे शौचालये चालविण्यास घेतले होते त्याला एकदासुद्धा त्या तक्रारींची दखल घ्यावी असे वाटले नाही. दरम्यानच्या काळातच त्या ठेकेदाराला म्हाडाकडून स्वच्छतागृह दुरुस्तीसाठी एकूण ९ लाख रूपये देण्यात आलेत, परंतु हे सर्वच्या सर्व पैसे त्याने स्वत:च्या खिश्यात घातले. या दुर्घटनेत ज्या तिघांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांच्यावरच अवलंबून होता. ह्या लोकांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या म्हाडा या सरकारी संस्थेने मृतांच्या घरच्यांना आतापर्यंत काहीही नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही.

नरेंद्र मोदीच्या सत्तेत येण्यापासून स्वच्छता अभियानाचे नाटक सुरू झालीत ते अध्यापही संपलेली नाहीयेत. टीव्हीवर अमिताभ बच्चन पासून ते नोटांवर स्वच्छता अभियानाची जाहिरात करण्यावर तर दाबून खर्च केला जातोय. परंतु सार्वजनिक सुविधांवर केवळ दाखविण्यासाठीच फुटकळ खर्च केला जातो. केंद्र सरकारने नोव्हेंबर २०१५ पासून एक विशेष कर सुद्धा याबाबत लागू केला आहे. 'स्वच्छ भारत सैस' नावाच्या या करापोटी मागील अर्ध्या वित्तीय वर्षात ३९० करोड रूपये जमा केले आहेत आणि या आर्थिक वर्षात जवळपास १०००० करोड रूपये जमा होतील. या पैशांचा वापर करून गरजवंताना चांगल्यात चांगली स्वच्छतागृहांची सुविधा देता येऊ शकली असती परंतु या पैशांचा अधिकाधिक वापर खेड्यांमधे स्वच्छतागृह बनविण्याच्या नावावर व जाहीरातबाजीवरच केला जात आहे. या बद्दलच्या रिपोर्टनुसार अधिकांश स्वच्छतागृहे फक्त कागदेपत्रीच तयार होताहेत प्रत्यक्षात नाही. डिसेंबर २०१५ मध्ये एका संस्थेकडून १० जिल्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार नोंद झालेल्या स्वच्छतागृहांमध्ये २९ टक्के स्वच्छतागृह फक्त कागदावरच आहेत. जेव्हा की ३६ टक्के वापरण्यायोग्यच नाहीत. २०१४-१५ मध्ये सरकार द्वारे २१२.५७ करोड रूपये जाहीरांतीवर खर्च करण्यात आले जे २०१५-१६ मधे वाढ होत २९३.१४ करोड झालेत.

मुंबई शहराविषयी बोलायचे झाल्यास इथे तर सार्वजनिक स्वच्छतागृहांची खुपच कमी आहे. आणि जे आहते त्यांची अवस्था अतिशय बिकट आहे. मुंबई शहराच्या लोकसंख्येच्या ६० टक्के हिस्सा स्लम (झोपडपट्टी) भागात राहतोय. येथील ७८ टक्के सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये पाण्याची काही व्यवस्थाच नाही व ५८ टक्के विज जोडणीपासूनच वंचित आहेत. रहिवाशांना शौचालयासाठी पाणी बाहेरूनच आणावे लागते. वीज जोडणी नसल्या कारणाने महिला व लाहन मुलं रात्रीच्या वेळी या स्वच्छतागृहांचा वापर करत नाहीत, ज्यामुळे त्यांना अनेक रोगांची लागण होते. सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या इतकी मर्यादित आहे कि कुठे कुठे तर २०० पेक्षा अधिक व्यक्तींमागे एकच स्वच्छतागृह आहे. ज्या भागात ही दुर्घटना घडली तिथे ५००० व्यक्तींसाठी २२ शौचालय (एक युनिट) होते. नरेंद्र मोदी आपल्या स्वच्छता अभियानाच्या भाषणांमध्ये जनतेला त्यांचा दृष्टिकोन बदलण्याचा सल्ला देतात. काही जाहीरातींमधे तर असेही दाखविले जाते की लोक मोबाईलचा वापर करतात पण स्वच्छतागृहांचा वापर करत नाहीत. अशा जाहीराती निर्माण करणाऱ्यांना व पसरविणाऱ्यांना अशा सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये घेऊन आणण्याची गरज आहे. इथे इतकी भयंकर दुर्गंधी पसरलेली असते की माणूस १० मिनीटे सुद्धा मोठ्या मुश्किलीने थांबू शकेल आणि त्यात अशा दुर्घटना होण्याची 'टांगती तलवार' अधिकच भर घालते. ही दुर्घटना काही इथे झालेली पहली दुर्घटना नाही. या अगोदर मानखुर्द मध्ये मार्च २०१५ मधे एक स्वच्छतागृह खचल्याने एका महिलेचा मृत्यू झाला होता. २०१६ मध्ये मालाड, गोरेगांव मध्ये दोन छोट्या मुलांचा अशाच प्रकारच्या घटनेमधे दुर्देवी मृत्यू झाला होता. त्यामुळे जर जनता नाईलाजास्तव उघड्यावर शौचास बसत असेल तर तो लोकांचे अपराध नसून सरकार आणि यंत्रणेचे नाकार्तेपणा आणि निर्लज्जपणा आहे.

**सार्वजनिक स्वच्छतागृह - मालामाल करणारा धंदा**

मुंबईतील बहुतेक स्वच्छतागृहे म्हाडा किंवा बीएमसी द्वारेच बनवले आहेत परंतु त्यांना चालविण्याचा ठेका मात्र एनजीओ किंवा खासगी ठेकेदार कंपनींना दिलेला आहे. अतिशय गरीबी असलेल्या भागांमध्ये पडझड होऊन एकदम मोडकळीस आलेल्या स्वच्छतागृहामध्ये सुद्धा हे ठेकेदार प्रति माणसी २, ३ ते ५ रु. चार्ज घेतात. संपूर्ण मुंबईमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांमार्फत बर्षाकाठी जवळपास ४०० करोड रूपयांची कमाई होते. हे उघड आहे कि या ठेकेदार कंपन्यांसाठी हा अतिशय फायद्याचा सौदा आहे. ज्यामध्ये गूंतवणूक काहीच नाही परंतु कमाई मात्र भरमसाठ आहे.

**कुठवर सहन करायचं, असं गप्प रहायचं**

मानखुर्दच्या या परिसरामध्ये दुर्घटनेनंतर लोक संतप्त होऊन त्यांनी त्याच दिवशी उरलेले मृतदेह बाहेर काढायची मागणी केली, तेव्हा त्यांचेवर पोलिसांनी लाठी हल्ला केला. या घटनेपासून ते सार्वजनिक स्वच्छतागृहे पण बंद आहे आणि लोकांना नाईलाजास्तव ३ किमी अंतरावरच्या स्वच्छतागृहांमधे किंवा जवळच असलेल्या खाडीमधे शौचास जावे लागत आहे. तरीसुद्धा ना नवीन स्वच्छतागृह बनविण्याविषयी काही बोलले जात आहे, ना तात्पुरत्या स्वरूपात फिरत्या शौचालयांची उपलब्धी करून दिली जात आहे. आज येथील सर्व लोकांनी एकजूट होऊन मृतांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाईची रक्कम मिळवून देण्याची मागणी केली पाहीजे. सोबतच वस्तीमध्ये सर्वच मूलभूत सुविधा मिळविण्याची मागणी करण्यासाठी एकजूटीने लढा पुकारला पाहीजे. जर असे केले नाही तर कोणताच नेता किंवा मंत्री येऊन आपल्याला आपला अधिकार देणार नाहीत. कांग्रेसचे सरकार असो वा भाजपाचे, तेव्हाच काही तरी अधिकार देतील जेव्हा जनता एकजुट होऊन त्यांना ते देण्यास बाध्य करेल.

# 'गोरक्षक' गुंडांच्या आतंकाविरोधात मुंबई येथे विरोध प्रदर्शन

दिनांक १ एप्रिल रोजी राजस्थानमधील एका मुस्लीम शेतकऱ्याची काही 'गोरक्षक' गुंडानी निर्दयीपणे हत्या केली. झाले असे की हरियाणा येथील मेवातमधील शेतकरी 'पहलू खान' या दिवशी जयपुरच्या प्रसिद्ध हटवाडा येथील गुरांच्या बाजारातुन 'दुग्ध' व्यवसायासाठी गाय विकत घेत होते. पहलू खान यांची एकच चुक होती, ती म्हणजेच 'मुस्लीम' असणे. स्वत:ला गोरक्षक म्हणनाऱ्या जातीयवादी गुंडानी त्यांना थोडे पुढे जाऊ दिले आणि त्यानंतर लगेचच त्यांना पकडले व मारायला सुरवात केली. ह्या मारझोडीतच पहलू खान यांचा मृत्यू झाला.

अशा प्रकारची ही पहिलीच घटना नाहीये. आणि शेवटची सुद्धा नसणार असे दिसते. या घटनेच्या विरोधात दिनांक १५ एप्रिल रोजी अंधेरी रेल्वे स्टेशन (पूर्व) येथे नौजवान भारत सभा, बिगुल मजदूर दस्ता तसेच इतर संघटनांनी विरोध प्रदर्शन केले. विरोध प्रदर्शनाच्या सुरवातीला काही क्रांतीकारी घोषणा दिल्या गेल्या. त्यानंतर नौजवान भारत सभेचे सत्यनारायण यांनी आपले म्हणने मांडले. सुरवातीला त्यांनी घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती उपस्थित लोकांना सांगितली व ते पुढे म्हणाले, मागच्या काही दिवसांपासुन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजेच आरएसएस ह्या संस्थेशी संलग्न असणाऱ्या काही संघटनानी भावनांना भडकावून जागो जागी गोरक्षेच्या नावाखाली गुंडांच्या टोळ्या उभ्या केल्या आहेत. 'इंटरनेटवर' ह्या गुंड प्रवत्तीच्या टोळ्या लोकांची निर्घृण पद्धतीने मारझोड असलेले व्हीडिओ सोशल मिडीयावर प्रसारीत करत आहेत तरी देखील त्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई होत नाही. हे व्हीडीओ इस्लामिक स्टेटच्या दहशतवादी संघटनांच्या व्हीडीओसारखेच आहे. ते म्हणाले की ह्या सगळ्याच प्रसंगावरून हाच प्रश्न निर्माण होतो की खरच त्यांचे ध्येय हे गायांची सुरक्षा करणे हेच आहे का? ज्या-ज्या राज्यांमध्ये गोरक्षेचे कायदे लागु झाले आहेत तिथेच गोरक्षक टोळक्यांचा आतंक वाढला आहे. म्हणून तेथील शेतकऱ्यांनी गायी सोडून 'म्हशी' पाळायला सुरवात केली आहे. ह्यावरून असे लक्षात येते की, ह्या सगळ्या गोरक्षावादी गुंडशाहीच्या मागे कोणत्याच बाजूने असे दिसत नाही की, यांना गायींचे भले करायचे आहे. उलट समाजामध्ये दिवसेंदिवस वाढत असलेली बेरोजगारी यावरून ध्यान भटकवणे हेच आहे. अशा कठीण परिस्थितीत आर्थिक मुद्यांवरून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी मोदी सरकार कधी गोरक्षा तर कधी लवजिहाद तर कधी राममंदिर असले भावनात्मक मुद्दे वारंवार चर्चेत आणून जनतेला गंडवत आहे. हे नाव तर हिंदुधर्माचे घेतात परंतु यांचा खरा धर्म अडाणी, अंबांनी, जिंदल, मित्तल यांचा नफा वाढवणे हा आहे. ज्या-ज्या वेळी हे धर्माचे नाव घेवुन येतील तेव्हा त्यांना आर्थिक नितींबाबत विचारणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्याला हे लक्षात घेण्याची गरज आहे की, जर आपण आज यांच्या कटकारस्थानाला त्वरित ओळखले नाही तर याची किंमत आपल्या येणाऱ्या पिढ्या चुकवतील. एवढे बोलुन सत्यनारायण यांनी आपले मनोगत संपवले. त्यानंतर तेथील उपस्थित लोकांना हजारो पत्रके वाटण्यात आली. प्रदर्शनाचा समारोप क्रांतीकारी घोषणांनी झाला.



# नपुंसक न्यायव्यवस्थेकडे न्यायाची दाद मागता-मागता खैरलांजीचे भैयालाल भोतमांगे यांचा संघर्ष मावळला

बबन ठोके

आजपासुन ११वर्षांपूर्वी खैरलांजी येथील दलित कुटुंबियाचा अमानुष, बर्बर हत्याकांडाने पूर्ण देशातील न्यायप्रिय व्यक्तींच्या हृदयाला पिळवटून टाकले. त्या हत्याकाण्डातील जीवित राहिलेले एकमात्र पीडित व्यक्ती भैयालाल भोतमांगे यांचा २० जानेवारी २०१७ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. भारतीय न्यायव्यवस्थेचा नपुंसकपणा व खरा चेहरा खैरलांजी घटनेतील पीडित भैयालाल भोतमांगे यांच्या मृत्युने दाखवुन दिला आहे. उच्चवर्णीयांच्या तिरस्कृत नजरांपासुन स्वत:च्या कुटुंबाचा बचाव करत, आयुष्याचा पुर्वाध कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत शांतपणे जगणारे, पण उत्तरार्धात याच नजरांचा स्फोट झाल्यावर भीषण शोकांतिकेला सामोरे जावे लागलेले, भैयालाल भोतमांगे यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रत्येक व्यक्ती आशेवर जगत असतो. भैयालाल सुद्धा आपल्या कुटुंबियांवर झालेला पाशवी अत्याचार डोळ्याने पाहुन सुद्धा न्यायाच्या आशेने न्यायव्यवस्थेचा दरवाजा ठोठावत राहिले. पण शेवटी हृदयविकाराच्या एका झटक्याने त्यांची ही आशाही हिरावली गेली.

ग्रामीण भागातील गावगाड्याचे सामाजिक विषमतेचे प्रचंड चटके सहन करून सुद्धा ताठ मानेने जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या भोतमांगे कुटुंबासाठी २९ सप्टेंबर २००६ हा दिवस काळाकुट्ट ठरला. शेजारच्या गावातील प्रेमानंद गज्वी नावाच्या व्यक्तीबरोबर, काही कारणामुळे गावातील लोकांशी वाद झाला. सत्याची बाजु म्हणून भोतमांगे यांची पत्नी सुरेखाने साक्ष दिल्याने गावातील उच्चजातीय आणि उच्चवर्गीय वर्चस्व असलेल्या लोकांना पाहावले नाही. याचा राग आणि वर्षानुवर्षे उपेक्षीत असलेल्या एका दलित व्यक्तीने स्वाभिमानाने जगणे, मुलांना शिकविणे, मुलगी असुन सुद्धा प्रियंकाला १२वी शिकवुन पोलिस भरतीसाठी प्रोत्साहन देणे हे गावगुंडांना सहन होण्यासारखे नव्हते. आणि मानवी मनाला व मानवतेला काळीमा फासणारे कृत्य झाले. पत्नी सुरेखा व मुलगी प्रियंका यांच्यावर आळीपाळीने सामुहीक बलात्कार करण्यात आले, गुप्तांगावर विवस्त्र अवस्थेत वार करून त्यांचे तुकडे करण्यात आले. दोन्ही मुलांना बेदम मारहान करून त्यांचे हातपाय तोडले व नंतर बैलगाडीमध्ये टाकुन गावातुन मिरवणुक काढत, गावकुसाबाहेर पाठबंधाऱ्यात फेकुन देण्यात आले. त्याचवेळेस असह्य होऊन भैयालाल पोलीसांचे पाय धरत विनवण्याकरत "तुम्ही एकदा तरी गावात चला" असे सांगत होते. पण पोलीसांनी जरा सुद्धा ऐकले नाही. समुद्रा एवढे दु:ख हृदयात दाबुन व डोक्यावर सारे आभाळ कोसळले असतानां जगण्याची इच्छाच राहिली नाही, असे भैयालाल यांच्या डोळ्यातील रक्ताश्रु सांगत होते. पण तरी सुद्धा झालेला अत्याचार पाहता, खचुन न जाता केवळ कुटुंबियाना न्याय मिळावा यासाठी स्वत: प्रत्येक दिवस जीव जाळत न्यायासाठी संघर्ष सुरू झाला. तो त्यांच्या निधनापर्यंत याच अकरा वर्षाच्या काळात भंडारा येथे एका वस्तीगृहात शिपाई म्हणुन काम करून व निवृत्तीनंतर विशेष बाब म्हणजे मिळालेली मुदतवाढ व त्यातुन मिळणाऱ्या मोजक्या पैशाच्या आधारावर स्वत:ची उपजीविका भागवत न्याय मिळावा म्हणुन कधी नागपुरला तर कधी दिल्लीला चकरा मारत राहिले.



डोळ्यात न्यायाचे स्वप्न घेऊन भैयालाल भोतमांगे काळाच्या पडद्याआड निघून गेले

पण संवेदनाशुन्य झालेल्या जुलमी न्यायव्यवस्थेपर्यंत भैयालाल भोतमांगे यांचा आवाज व वेदना आयुष्याच्या शेवट पर्यंत पोहचलीच नाही. या हत्याकांडामध्ये गावातील बहुतेक लोकांचा सहभाग असताना सुद्धा फक्त ११ लोकांवर खटला चालवण्यात आला. भंडारा न्यायालयाने यातील ३ आरोपींना मुक्त केले आणि दोघांना जन्मठेपेची व सहा जणांना फाशीची शिक्षा सुनावली. नंतर उच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा झालेल्यांची सुद्धा शिक्षा जन्मठेपेत बदलली. सीबीआईने भोतमांगे यांना आश्वासन दिले की कमी होत चाललेल्या शिक्षे विरोधात आम्ही सर्वोच न्यायलयात अपील करू, पण त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे भोतमांगे यांना स्वत: सर्वोच न्यायलयात अपील करावी लागली. तिथे त्यांना न्याय मिळाला नाही. त्यांच्या अपीलाची शेवटची सुनावणी ऑगस्ट २०१५ मध्ये झाली. मृत्युच्या दोन दिवसा अगोदर दोन वर्षांपासुन स्थगिती असलेल्या सुनावणीला सुरूवात कधी होणार? हा त्यांचा शेवटचा प्रश्न त्यांच्या हृदयाचे ठोके थांबताच संपला. भोतमांगे यांना व्यवस्थेशी दोन हात करताना पावला-पावलावर पराभवच बघावा लागला. त्यांचे न्यायाचे स्वप्न अधूरे राहिले. बथानी टोला, लक्ष्मणपुर बाथे सारखे दलित हत्याकांडां प्रमाणेच खैरलांजी हत्याकांडातील पीडितांना सुद्धा न्याय मिळाला नाही. या घटनेने पुन्हा एकदा गरीब, दलित व समाजातील इतर वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यात न्याय व्यवस्थेची अकार्यक्षमता आणि दुबळेपणा उजागर झाला आहे.

# जोतीराव फुले - स्त्रीमुक्ती चे पक्षधर आणि जाती अंताच्या संघर्षाचे योद्धे

जोतीराव फुलेंची १९०वी जयंती (११ एप्रिल) नुकतीच झाली. तब्बल १६९ वर्षांपूर्वी मुलींची पहीली शाळा उघडण्याचा निर्णय जोतीराव फुल्यांनी घेतला होता. विधवा विवाहाला समर्थन, विधवांचे केशोपन थांबविण्यासाठी नाव्ह्यांचा संप, बाल विवाहाला विरोध, मुलांचे संगोपन अशा एक ना अनेक गोष्टींतून जोतीराव-सावित्रीबाईंचा स्त्री समतेचा, स्त्री स्वातंत्र्याचा दृष्टीकोन समोर येतो. स्त्री मुक्ती व जाती उच्चाटनाच्या संघर्षांमध्ये फुल्यांनी महत्वाचे योगदान दिलेले आहे. आज आपण सगळे जाणतोच आहोत की स्त्री मुक्ती आणि जाती उच्चाटन एकामेकां मध्ये जोडले गेले आहे. जाती उच्चाटनासाठी आंतरजातीय विवाह होणे गरजेचे आहे आणि आंतरजातीय विवाह तेव्हाच होतील जेव्हा स्त्री मुक्त होईल. त्याचबरोबर स्त्रीसुद्धा खऱ्या अर्थाने तेव्हा स्वतंत्र होईल जेव्हा जाती नष्ट होतील.



सामाजिक परिवर्तनासाठी जोतीराव फुले कधीही सरकार कडे जोडे झिजवत बसले नाहीत. उपलब्ध साधनांसहीत त्यांनी आपल्या संघर्षास सुरुवात केली. सामाजिक प्रश्नांबाबतही फुले, शेटजी आणि भटजी या दोघांना शत्रू म्हणून चिन्हीत करतात. आयुष्याच्या उत्तरार्धात ते ब्रिटीश शासनाच्या आणि भारतातील ब्राम्हणवाद्यांच्या यूतीला ओळखायला लागले होते म्हणूनच ते म्हणाले होते की इंग्रजांच्या सत्तेमध्ये बहुतेक अधिकारी ब्राम्हण आहेत आणि जरी काही अधिकारी इंग्रज असले तरी ते हाडाने ब्राम्हणच आहेत.

आज जेव्हा संघी फासीवादी, जातीप्रथा आणि पितृसत्तेच्या आधारावर आणि सांप्रदायिक ध्रुवीकरणातून दलित, अल्पसंख्यांक व स्त्रीयांवरील हल्ले तीव्र करत आहेत, खाण्या-पिण्यापासून-जोडीदाराच्या निवडीचे व प्रेमाचे अधिकारही हिसकावून घेऊ इच्छितात, अशा काळात फुल्यांची जयंती साजरी करण्याचं औचित्य विशेष महत्वाच आहे. फुल्यांना अपेक्षित समाज निर्माण करण्यासाठी जोरदार संघर्ष करुणच त्यांच्या स्मृती जपल्या जाऊ शकतील. **ब्राम्हणवाद व भांडवलशाहीच्या विरोधातला संघर्ष तीव्र करुनच जोतीराव फुलेंना खरेखुरे अभिवादन करता येईल.**

**शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या त्यांच्या कवितेच्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत.**

विद्येविना मती गेली। मतिविना नीती गेली।
नीतिविना गती गेली। गतिविना वित्त गेले।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले॥

## शहीदे आजम भगत सिंह यांची उद्धरणे

क्रांतीचा आमचा आशय काय आहे, हे स्पष्ट आहे. या शतकात क्रांतीचा फक्त एकच अर्थ असू शकतो तो म्हणजे - जनतेसाठी जनतेने राजकीय सत्ता ताब्यात घेणे. वास्तवात हीच 'क्रांती' आहे. बाकी सारे विद्रोह हे फक्त मालकांच्या पाठिंब्याने चालणाऱ्या परिवर्तनाद्वारे भांडवलशाहीतील सडकेपणाच पुढे रेटत असतात. लोकांविषयी किंवा त्यांच्या प्रश्नांविषयी कितीही सहानुभूती दाखवली तरी जनतेपासून वस्तुस्थिती लपत नाही, लोक कपट ओळखतातच. भारतामध्ये श्रमिकांच्या सत्तेपेक्षा काहीही कमी स्वीकारणे आम्हांला मान्य नाही. भारतातील साम्राज्यवादी - आणि ज्यांची नाळ शोषण हा मूलाधार असलेल्या आर्थिक व्यवस्थेशी जुळलेली आहे, असे त्यांचे हस्तक - यांना हुसकून देऊन भारतीय श्रमिकांना पुढे यावे लागेल. आम्ही गोऱ्या दुष्प्रवृत्तीच्या जागी काळी दुष्प्रवृत्ती आणून यातना भोगू इच्छित नाही. एक स्वार्थी समूह म्हणून या दुष्प्रवृत्ती एकमेकांची जागा घ्यायला तयार आहेत.

इतिहासाने पुन:पुन्हा सिद्ध केलेल्या एका सत्याकडे आम्ही जनतेचे लक्ष वेधू इच्छितो. गुलामी आणि असहाय्यतेत विव्हळणाऱ्या जनतेला चिरडून टाकणे सोपे आहे, परंतु विचार अमर असतात आणि जगातील कोणतीही शक्ती त्यांना चिरडून टाकू शकत नाही. जगातील महान साम्राज्ये धुळीला मिळाली, पण ज्या विचारांनी प्रेरित होऊन जनसामान्यांनी ही साम्राज्ये धुळीस मिळवली ते विचार आजही जिवंत आहेत. बूरबों (फ्रेंच राज्यघराणे) नष्ट झाले, परंतु क्रांतिकारक निधड्या छातीने पुढे जात आहेत.

लोकांना आपापसात लढण्यापासून रोखण्यासाठी वर्गचेतनेची आवश्यकता आहे. गरीब कष्टकरी आणि शेतकऱ्यांना समजावून सांगितले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, म्हणूनच तुम्ही त्यांच्या डावपेचांपासून सावध राहिले पाहिजे, व त्यांच्या नादी लागून काहीबाही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे या राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रियतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे.

# भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांच्या ८६व्या शहीद दिनानिमीत्त 'नौजवान भारत सभा', 'बिगुल मजदूर दस्ता' व इतर सहयोगी संघटनांद्वारे देशव्यापी कार्यक्रम

शहीद भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांच्या ८६व्या (२३ मार्च) शहीद दिनानिमीत्त 'नौजवान भारत सभा', 'बिगुल मजदूर दस्ता' व इतर सहयोगी संघटनांद्वारे देशव्यापी कार्यक्रम आयोजित केले गेले. मुंबई, अहमदनगर, दिल्ली, चण्डीगढ, लुधियाना, पटना, इलाहाबाद, लखनऊ, गाजियाबाद, देहरादून इत्यादि ठिकाणी शहीदांच्या क्रांतिकारी विचारांना वेगवेगळ्या कार्यक्रमांद्वारे पोहचवले गेले.

मुंबई आणि अहमदनगर या ठिकाणी १५ दिवसीय शहीद स्मृति अभियानाचे आयोजन केले होते. या अंतर्गत पत्रके वितरण, चौका-चौकात सभा, पुस्तक प्रदर्शन, रैली, फिल्म स्क्रीनिंग, परिसंवादाद्वारे शहीदांच्या विचारांना लोकांमध्ये पोहचविले गेले. या अभियानाचे शेवटच्या दिवशी (३ एप्रिल) अहमदनगर येथे रहमत सुल्तान फाऊंडेशन या सभागृहा मध्ये 'फासीवादच्या आजचा काळात भगतसिंहाची प्रासंगिकता काय आहे' या विषयावर परिसंवाद आणि दोन पुस्तकांचा लोकार्पणाचा कार्यक्रम केला गेला. या परिसंवादाचे मुख्य वक्ता 'कामगार बिगुल'चे संपादक सोमनाथ केंजळे यांनी भारताच्या क्रांतीकारी आंदोलनाच्या धार्मिक पुनरुत्थानवादापासुन ते वैज्ञानिक समाजवादापर्यंत सविस्तरपणे आपले म्हणने मांडले. भगतसिंहाला कोणत्या प्रकारचे स्वांतत्र्य अपेक्षित होते, राजकीय जीवनात धर्माच्या हस्तक्षेपाच्या बाबतीत भगतसिंह काय विचार करत होते, अस्पृश्यता समस्येला कशाप्रकारे बघत होते आणि भारतीय जनतेसाठी कशाप्रकारे फक्त कामगार क्रांतीचे स्वप्न बघत होते, इ. वर सोमनाथ यांनी रोचकपणे प्रकाश टाकला. त्यानंतर फासीवादाबाबत बोलताना ते म्हणाले की भगतसिंहांच्या वेळी हिटलर आणि मुसोलिनीचा बर्बर चेहरा पुर्णपणे समोर आला नव्हता. तरीदेखील भगतसिंह समजत होते की कशाप्रकारे जेव्हा भांडवलदार वर्ग जनतेला लुटण्यासाठी असाह्य व्हायला लागतो, तेव्हा तो लोकांना आपापसात लढवतो. त्यांनी भगतसिंहाचे लेख 'धार्मिक दंगली आणि त्यावर उपाय' व 'धर्म आणि आपला स्वतंत्रता संग्राम' यांचा संदर्भ देत सांगितले की भगतसिंह सांप्रदायिक झगडयांच्या मागे असलेले खरे कारण म्हणजेच आर्थिक कारणाला समजत होते आणि त्याचसाठी भगतसिंह वर्गीय एकता करण्यावर जोर देत होते. सोमनाथ यांनी शेवटी सांगितले की सध्याच्या काळात तरुणांना भगतसिंहाच्या मार्गानेच पुढे जावे लागेल. देशातल्या कामगार वर्गाला एकत्र करून फासीवादावर मात करावी लागेल तेव्हाच भगतसिंहाच्या इंकलाब झिंदाबादाचे स्वप्न साकार करता येईल.



अहमदनगर येथे परिसंवाद आणि दोन पुस्तकांचा लोकार्पणाचा कार्यक्रम



मानखुर्द, मुंबई येथे रैली



दिल्लीतील वजीरपूर (जीथे मोठ्या संख्येने स्टील इंडस्ट्रीतले कामगार राहतात) भागात शहीद दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी "तमाशा" या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. वस्तीमधील मुलांनी "मेरा रंग दे बसंती चोला " व इतर क्रांतीकारी गाणी सादर केली व सोबतच काही क्रांतीकारी कवितांचेही वाचन करण्यात आले.




नौजवान भारत सभा,हरीयाणा मधील रोडी युनीट द्वारे रोडी गावात "शहीद भगतसिंह पुस्तकालय" सुरू करण्यात आले.त्याच्या उद्घाटन प्रसंगी "जीवनातील पुस्तकांचे महत्त्व "या विषयावर परीसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.उद्घाटन सोहळ्यानंतर नौजवान भारत सभा द्वारे इंकलाबी मार्च काढण्यात आला.




पूर्व उत्तरप्रदेशातील मऊ, बलिया, इलाहाबाद, गोरखपुर, इ. शहरांत शहीद दिनानिमीत्त १५ दिवसीय 'शहीद स्मृती अभियान' चालवले गेले. या अभियानाच्या दरम्यान सर्व शहरांमध्ये रॅलींचे आयोजन करून भगतसिंह यांच्या विचारांना पोहचविले गेले.



लुधियाना, पंजाब मधील कामगार ग्रंथालया येथे शहीद भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांच्या स्मृतींची आठवण करत एक क्रांतीकारी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत केला. या निमित्ताने 'इंकलाब झिंदाबाद', 'ह्या समाजाला बदलून टाका', 'एका कामगाराचा मृत्यू' इ. नाटके प्रस्तुत केली गेली. अनेक क्रांतीकारी-लढाऊ गाण्यांचा सुद्धा कार्यक्रम झाला.

# सोफी शोल - फासीवादाच्या विरोधात लढणारी एका धाडसी मुलीची गाथा

मुकेश त्यागी
मराठी अनुवाद - विशाल पाटील


जर्मनीच्या नाझी समुदायाने लाखोंच्या संख्येने यहूदींचा नरसंहार तर केलाच पण त्याचबरोबर सन १९३३ ते १९४५ च्या दरम्यान हिटलरच्या फासीवादी शासनाचा विरोध करणारे ७७ हजार जर्मन नागरीकांना नाझींच्या मार्फत चालणाऱ्या विशेष किंवा तथाकथित जन न्यायालया आणि कोर्ट मार्शलद्वारे मृत्युची शिक्षा दिली. यामधील किती तरी लोकांना आपण ओळखत देखील नाही, परंतु म्युनिख विश्वविद्यालयच्या विद्यार्थ्यांचे 'व्हाईट रोज' नाव असलेले नाझी विरोधी एक भुमिगत चळवळ चालवणारा समुह, आणि त्या समुहाचे नेतृत्व करणारी धाडसी मुलगी म्हणजे सोफी शोल आणि तिचे सहकारी लढवय्ये यांचा संघर्ष व बलिदान जनतेला चांगलाच परिचित आहे. जीवशास्त्र व तत्वज्ञानाची २१ वर्षांची सोफी व तिचा भाउ हान्स यांनी विश्वविद्यालयात हिटलर आणि युद्धाच्या विरोधात पत्रके वाटप करणे, त्यांना अटक, त्यांची लांबलचक चौकशी, कोर्ट कचेरी, न्याय मिळविण्यासाठी त्यांनी केलेला अतूट संघर्ष आणि त्यांचा तिसरा सहकारी क्रिस्टोफ प्रोब्स्टसह मृत्यूदंडाची शिक्षेची गोष्ट आहे - २००५ साली निर्माण झालेला जर्मन चित्रपट 'सोफी शोल - द फाइनल डेज'. गेस्टपो आणि नाझी न्यायालयच्या फाइलीमध्ये या संबंधी केली गेलेली चौकशी, न्यायालयात उपलब्ध माहितीच्या आधारे सोफी शोल आणि सहकारी यांच्या द्वारा फासीवाद विरोधात जर्मन जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न, अशा धाडसी ऐतिहासीक घटनांचे चित्रण ह्या चित्रपटात उत्तम झाले आहे.

सोफी व तिचा भाऊ हान्स सारखेच 'व्हाइट रोज' ग्रुपचे बहूतेक तरुण सदस्य लोकशाहीवादी, उदार, मानवतावादी परीवारांमधून आलेले होते, परंतु त्यांनी सुरवातीस हिटलरच्या नाझी युवा संघटनेत उत्साहाने काम केलेले होते. त्या वेळेच्या जर्मन समाजाचे वर्णन त्यांच्या समुहात जीवंत राहिलेल्या ऐका सदस्याने असे केले होते, "प्रत्येक गोष्टि वर फासीवाद्यांचे नियंत्रण होते - प्रसार माध्यमे, हत्यारे, पोलिस, सेना, न्यायालय, दळणवळण, प्रत्येक स्तरांवरचे शिक्षण, सर्व सांस्कृतिक-धार्मिक संघटन. कमी वयातच नाझी विचारांची शिकवण सुरू होत होती आणि 'हिटलर युवा' या युवा संघटनेच्या मार्फत पूर्ण बौद्धिक नियंत्रण मिळे पर्यंत शिकवण दिली जात होती. परंतु वैद्यकीय शाखेचा विद्यार्थी हान्स आणि त्याचे दोन मित्र यांनी सोवियत संघात, पूर्वेच्या मोर्चामध्ये सेनेच्या दवाखान्यात काम करत असतानां युद्धांचा दुष्परिणाम बघितला, तसेच त्यांना पोलंड आणि सोवियत संघ इत्यादि ठिकाणी निष्पाप यहूदीं व अन्य जनतेचा नरसंहाराच्या बातम्यासुद्धा माहित झाल्या होत्या. या सर्व घटनांमुळे त्यांनी युद्ध व नाझीवादाच्या विरोधात जर्मन जनतेत प्रचार करण्याची आणि प्रतिकार संघटित करण्याची प्रेरणा मिळाली.

जुन १९४२ साली त्यांनी पत्रके छापून व भिंतीवर लिहून आपल्या कामाची सुरवात केली. हे लोक हाताने चालवले जाणाऱ्या साइक्लोस्टाइल मशिनचा वापर करून पत्रके छापत होते. पोस्टाने म्यूनिख व जवळपासच्या क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक व बुध्दीवादी लोकांना पाठवत, टेलिफोन बुथ आणि तत्सम ठिकाणी पुस्तकात ठेवत, अशा प्रकारे या पत्रकांचे वाटप केले जात होते.

यांनी आपल्या दुसऱ्या पत्रकात यहूदींवर होणाऱ्या अमानवीय अत्याचाराची निंदा या शब्दात केली होती, "पोलंडवर विजय मिळविल्यानंतर ३ लाख यहूदींचा अमानुष पध्दतीने रक्तपात केला. जर्मन लोकांचा मुर्खपणा व निष्काळजी पणा फासीवादाच्या अत्याचाराला अधिक प्रेरणा देत आहे. आम्ही सर्वजन ह्या गुन्ह्याच्या दोषापासुन अलिप्त राहू इच्छितो आणि आपल्या आंतरमनाला किंचीत देखील दुःख न जाणवता आरामात आपले जीवन जगत आहोत. परंतु ह्या गुन्ह्यांतून आपण कधीच दोषमुक्त होऊ शकत नाही, आपण सर्व दोषी आहोत, दोषी आहोत, दोषी आहोत."

जानेवारी १९४३ साली 'व्हाइट रोज' च्या पाचव्या पत्रक 'जर्मन जनतेला आवाहन' च्या ६ हजार प्रति छापल्या गेल्या, संघटनेच्या सदस्यांनी आणि समर्थकांनी म्यूनिखसह दक्षिण जर्मनीतल्या शहरांनमध्ये वाटप केले. नंतर, गेस्टापो द्वारा चौकशी दरम्यान सोफीने सांगितले की १९४२च्या उन्हाळ्या पासुनच संघटनेचे ध्येय जास्तीत-जास्त जर्मन जनतेपर्यंत पोहचणे हे होते, म्हणूनच पत्रकातुन संघटनेचे नाव बदलुन 'जर्मन प्रतिकार आंदोलन' असे केले. या वेळेपर्यंत ते ठाम झाले होते की जर्मनी युद्ध जिंकू शकत नाही, म्हणुन त्यांनी म्हटले "हिटलर युद्ध जिंकू शकत नाही, पण लांबवू शकतो." त्यांनी नाझी अमानवीयता, साम्राज्यवाद आणि प्रशियाई सैन्यवादावर हल्ला केला आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य तसेच अपराधी हुकूमशाही राजसत्ते पासुन जनतेची सुरक्षा करण्यासाठी जर्मन प्रतिकार आंदोलनात



सोफी शोल हिचा मुळ फोटो

सहभागी होण्याचे आवाहन केले.

जानेवारी १९४३ च्या शेवटी स्टालिनग्राडच्या लढाईत जर्मन सैन्याची विनाशकारी हार व त्यांच्या आत्मसमर्पणा मुळे युद्धाची दिशाच बदलुन गेली आणि जर्मनीच्या ताब्यात असलेले सर्वच देशात प्रतिकार आंदोलने सुरू झाली. १३ जानेवारी १९४३ साली म्यूनिखचा नाझी पक्ष नेता याने विद्यार्थ्यांना कायर म्हटले म्हणुन मोठा उद्रेक झाला होता. त्या मुळे 'व्हाइट रोज'च्या सदस्यांचा उत्साह अधिकच वाढला. स्टालिनग्राड च्या पराभवाची बातमी ऐकल्या नंतर त्यांनी शेवटचे सहावे पत्रक काढले "विद्यार्थी मित्रांनो" त्याच्यात घोषणा केली होती की आपल्या प्रजेसाठी सर्वात घृणित आततायी राज्यकर्त्यासाठी निर्णयाचा क्षण येवून पोहचला आहे, आपल्याला स्टालिनग्राडच्या मृतकांची शपथ आहे. ३, ८ आणि १५ फेब्रुवारीला ह्या लोकांनी म्यूनिख विश्वविद्यालय व इतर इमारत्यांवर टिनच्या स्टेंसिल ने 'डाउन विद हिटलर' आणि 'आझादी' सारख्या घोषणा लिहल्या.

ह्या वेळी टपाला मार्फत पत्रके पाठवल्या नंतर, पत्रके शिल्लक होती परंतु पाकिट संपले होते, कागदाच्या कमतरतेमुळे मिळत ही नव्हते.त्या मुळे सोफी आणि हान्स शोल यांनी १८ फेब्रुवारीला सहकाऱ्यांनी केलेल्या नकाराला डावलून पत्रके स्वतःच्या जबाबदारी वर विश्वविद्यालयात वाटप करण्याचा निर्णय घेतला. त्या दिवशी ते दोघे एका सुटकेस मधे पत्रके घेवून गेले व क्लास सुरू असताना बंद दरवाज्याबाहेर पत्रके ठेवली. तरीही काही पत्रके शिल्लक राहिल्या मुळे ते वरच्या मजल्यावर वाटण्यासाठी गेले. सोफीने अचानक वरूनच हॉल मधे शेवटची काही पत्रके फेकली व त्याचवेळी एका कर्मचाऱ्याने हे बघितले, तेव्हा त्यांना बाहेर जाताना अडवून गेस्टापो मार्फत अटक करण्यात आली. त्या वेळेस सातव्या पत्रकाची सामग्री हान्सकडे होती, तो त्याने नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु यश आले नाही, पण सोफी आपल्या कडील पुरावे नष्ट करण्यात यशस्वी झाली. गेस्टापोमध्ये या प्रकरणाची चौकशी व तपास रॉबर्ट मोर नावाच्या अधिकाऱ्याने केली व सुरुवातीला त्याने सोफीला निर्दोष ठरवत सोडण्याचा आदेश दिला, परंतु हान्स ने सगळे कबूल केल्यामुळे तसेच इतर पुरावे मिळाल्यामुळे सोफी ने देखील कबूल केले आणि संघटनेच्या इतर सदस्यांना वाचवण्यासाठी सर्व जबाबदारी स्वता:वर घेतली.



चित्रपट 'सोफी शोल - द फाइनल डेज' या मधील एक दृश्य

२२ फेब्रुवारी १९४३ साली सोफी आणि हान्स शोल तसेच प्रोब्स्ट वर नाझींच्या राजकीय खटल्यांमध्ये अन्यायासाठी बदनाम 'लोक न्यायालया'त खटला चालवला गेला. खोल चौकशी व खटल्यामध्ये न्यायाधीश फ्रेसलर याच्या धमकी नंतरही सोफीने शौर्याने आणि दृढतापूर्वक न डगमगता उत्तर दिले, "आम्ही जाणतो तसे तुम्ही देखील जाणता आहात की युद्ध हरले गेले आहे. परंतु तुम्ही तुमच्या कायरतेमुळे त्याचा स्विकार करणार नाही. न्यायाधीश रोलैंड फ्रेसलर ने त्या तिघांना देशद्रोही ठरविले व मृत्युदंडाची शिक्षा दिली. त्याच दिवशी त्यांना शिरच्छेद करण्याच्या यंत्राने गळा कापून मृत्युदंड दिला गेला. या शिक्षेचा सामना त्या तिघांनी बहादुरीने केला. जेव्हा गळ्यावर यांत्रिक करवत ठेवली तेव्हा सोफी म्हणाली "सुर्य अजुनही तेजोमय आहे" आणि हान्स ने ही "आझादी जिंदाबाद" ची घोषणा दिली.

'व्हाइट रोज' संघटनेच्या बहुतेक सभासदांना अटक करून वेगवेगळे खटले चालवत कोणाला मृत्यूदंड तर कोणास जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. जरी त्यांना दुष्ट, गद्दार ठरवून शिक्षा दिल्या होत्या आणि जर्मनी मधील वृत्तपत्रात अशाच बातम्या छापल्या गेल्या परंतु ह्यांचे समर्थक एवढे वाढलेले होते की जर्मन नाझी अधिकारी या बातम्या व अफवा दाबून ठेवू शकले नाही आणि 'व्हाइट रोज' संघटनेच्या सभासदांनी अन्य जर्मनांना प्रतिकारासाठी प्रेरित केले. त्यांचा प्रतिकार व त्यांना मिळालेल्या शिक्षेच्या बातम्या जर्मनी बाहेर गेल्यावर सोवियत लाल सेनाने 'व्हाइट रोज' च्या स्वातंत्र्याच्या संघर्षांच्या सन्मानार्थ एक पत्रक काढत ह्यांचे अपुरे राहिलेले सहावे पत्रक 'म्यूनिखच्या विद्यार्थ्यांचे घोषणा पत्र'च्या नावाने प्रकाशित केले व मित्र राष्ट्रांच्या विमानांच्या मदतीने संपुर्ण जर्मनीत फेकले. चित्रपट आकाशातून पडणाऱ्या पत्रकांच्या दृष्यासोबत संपतो.

# पंजाब विश्वविद्यालय, चंडीगढ मध्ये फी वाढीचा विरोध करणाऱ्यां विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, ६६ विद्यार्थ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा.

महाग होत चाललेल्या शिक्षणाबाबत सरकारला जेव्हा जेव्हा जाब विचारण्यासाठी आंदोलन व विरोध केला जातो तेव्हा तेव्हा सरकार सगळ्या मुखवट्यांना काढून ठेवत दडपशाही करतं. हेच ११ एप्रिल रोजी चंडीगढ मधल्या पंजाब विश्वविद्यालयात झालं. या विश्वविद्यालयातल्या सगळ्या कोर्सेजची फी अनेक पटींनी वाढवली गेली, जसे बी-फार्मा ची फी ५०८० वरून ५०००० केली गेली आहे. या विरोधात विद्यार्थ्यांनी निदर्शने आयोजीत केली होती.त्यात हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते.वीसी ला भेटण्यासाठी निघालेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी सुरूवातीला तर वाटर कॅनान ने पाण्याचा मारा केला, नंतर अतिशय रानटीपणे लाठीचार्ज केला.त्यानंतर ६६ विद्यार्थ्यांवर देशद्रोहाच्या गुन्ह्यासहीत अनेक कलमं लावण्यात आली आहेत. अनेकांना अटक केली आहे. फीविरोधी आंदोलन करणाऱ्यांवर देशद्रोहाचे कलम लावण्याच्या विरोधात जेव्हा चहुबाजूंनी पोलिसांवर दबाव वाढू लागला तेव्हा ते कलम काढले गेले. अजूनही विद्यार्थ्यांचा संघर्ष ठामपणे चालूच आहे. विद्यार्थ्यांना जामीन मिळालाय. ही बातमी लिही पर्यंत तरी अजून फी वाढ मागे घेतली नव्हती.



### न्यायधीश आणि जेलर सुद्धा त्यांचे, सगळे अधिकारी सुद्धा त्यांचेच!

# मारुती कामगारांच्या केसचा निर्णय : भांडवली न्यायव्यवस्थेचा उघडा-नागडा चेहरा

मराठी अनुवाद - कृष्णा कांबळे

१० मार्चला गुडगाव च्या ट्रायल कोर्टाने मारुती मानेसर प्लाण्ट च्या १४८ अटकेतील कामगारांपैकी ३१ जणांना दोषी ठरवण्यात आले. त्यातील १३ जणांस खुनाच्या संदर्भात दोषी ठरवले. जखमी करण्याचा आणि अतिक्रमण करण्याच्या आरोपात १८ कामगारांना दोषी ठरवन्यात आलं. चार वर्षाची शिक्षा भोगलेले बाकी ११७ कामगारांना निर्दोष मुक्त केलं. मारुती सुजूकीच्या मानेसर या प्लांटमधे २०११ पासूनच व्यवस्थापक मंडळ आणि कामगार यांच्यात तणाव वाढत जाऊन संघर्षाचं वातावरण बनले होते. कामगार आपल्या युनियनला नोंदवून घेण्यासाठी आणि कामातील अमानवीय परिस्थितीकडे ध्यान देण्यासाठी संघर्ष करत होते. आणि याच संघर्षाच्या वातावरणात १८ जुलै २०१२ ला सदरील घटना घडली ज्यात मानेसर प्लान्टमधीलच एक एचआर मॅनेजर अवनिश कुमार देव यांचे निधन झाले. तेव्हापासून आतापर्यंत १४७ कामगारांस खुन व खुनाचा प्रयत्न करण्याच्या आरोपाखाली जेलमध्ये खितपत पडावं लागलेलं आहे. इतर ६६ जणांवर वेगळे खटले लावण्यात आले. घटनेनंतर ताबडतोब ५४६ स्थायी व १८०० कंत्राटी कामगारांना कामावरुन काढण्यात आलं. या घटनेची जेव्हा १० मार्च ला सुनावणी झाली तेव्हा त्यात १३ माणसांवर खुन, खुनाचा प्रयत्न करणे,आग लावणे, कट करणे इ. आरोप लावण्यात आले. बाकीच्या १८ जणांवर मारझोड, जखमी करणे आणि अनधिकृत प्रवेश व गर्दी गोळा करणे असे आरोप लावण्यात आले. त्यातील १३ कामगार असे -राममेहर, संदिप ढिलों, राम विलास, सरबजीत, पवन कुमार, सोहन कुमार, अजमेर सिंह, सुरेश कुमार, अमरजीत, धनराज, योगेश, प्रदीप गुर्जर, जियालाल यांस ३०२, ३०७, ४२७, ४३६, ३२३, ३२५, ३४१, ४५२, २०१, १२०बी यांसारख्या कलमांतर्गत गुन्हेगार ठरवण्यात आलं आहे. दुसऱ्या गटातील १४ कामगारांना कलम २३, ३२५, १४८, १४९, ३४१, ४२७ अनुसार आरोपी ठरवण्यात आलं आहे. तिसऱ्या गटात कलम ३२३, ४२५, ४५२ अनुसार दोषी ठरवण्यात आलं आहे. ज्या ३१ कामगारांस आरोपी ठरवलंय त्यामधील १३ कामगारांना जन्मठेपेची, ४ कामगारांना ५ वर्षाची शिक्षा आणि जेलमध्ये काढले गेलेल्यां ४ वर्षांना बघून राहिलेल्या १४ कामगारांना फक्त दंड ठोठावण्यात आला आहे.

या निकालाने भांडवलवादी न्यायव्यवस्थेच्या नागड्या रुपास उघडं केलं आहे. आणि हे तेव्हा झालं आहे जेव्हा काही दिवसापूर्वीच गुन्हा कबुल करणारे असीमानंद आणि बाकीचे संघी आतंकवाद्यांना ठोस पुरावे असतांना देखील मुक्त करण्यात आलं आहे. हे दोन्ही प्रकरणं भांडवलशाही राज्याच्या अंगाच्या रुपाने न्यायव्यवस्थेची खरं रूप उजागर करत आहेत. ही राज्यव्यवस्था आणि यामुळेच इथली न्यायव्यवस्था भांडवलशाहांच्या फायद्याची सेवा करण्याच्या मागे लागली आहे. म्हणूनच कामगारांना या व्यवस्थेत न्याय मिळू शकत नाही. मारुतीच्या १४८ कामगारांवर चालवण्यात आलेला खटला, त्यांची अटक आणि चार वर्षाहून जास्तकाळ त्यांना तुरुंगात डांबून ठेवण्यात येणं या गोष्टीने भांडवली न्यायव्यवस्थेचा मुखवटा उतारला आहे. मारुतीच्या ३१ कामगारांना कोर्टाने दिलेली ही शिक्षा कामगार वर्गासमोर एक उदाहरण घालवण्याचा प्रयत्न आहे की जो कुणी भांडवली नफ्याच्या तंत्राला नुकसान पोहोचवेल त्यांना सोडलं जाणार नाही.

ज्या १३ लोकांविरुद्ध ३०२ व ३०७ भा.दं. वि. अंतर्गत कलमे लावण्यात आली आहेत त्यांविरोधात कुचकामी पुरावे उपलब्ध होते. कोर्टात झालेल्या प्रक्रियेत सादर केलेल्या युक्तिवादाचा संक्षिप्त आहवाल खाली देण्यात आला आहे. यावरूनच हे उघडपणे सिद्धच होत आहे की कशाप्रकारे हे शासन आणि न्यायव्यवस्था वास्तविकपणे भांडवलशाहां साठीच आहे!

१. आश्चर्याची बाब अशी की ज्या १३ जणांवर खुनाचा आरोप आहे, ते सर्व युनियच्या नेतृत्व करत होते. कोर्टात चाललेल्या कारवाई मध्ये खुन व जाळपोळीच्या आरोपात अटक केलेल्या कामगारांविरोधात कोणताही प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नव्हता, ना सीसीटीव्ही फुटेज होते आणि ना फिर्यादी पक्षाचा साक्षिदार त्या कामगारांना ओळखू शकला. आश्चर्याची गोष्ट ही आहे की दिपक आनंद ज्यांनी ५५ कामगारांविरुद्ध एफआयआर दाखल केली, ते कोणताही कामगाराला ओळखू शकले नाही. तसेच सलिल विहारी ज्यांने जियालाल नावाच्या एका कामगाराला खुनाचा मुख्य सूत्रधार म्हणून सागितलं होतं, तो त्याला ओळखू देखील शकला नाही.





२. १८ जुलै २०१२ ला ही दुर्घटना जवळपास संध्याकाळी ७:२० च्या दरम्यान घडली आणि प्लांटच्या बाहेर सकाळी ११ वाजताच पोलीस फोर्स उपस्थित होती. पण पोलिसांना तोपर्यंत आत येऊ दिलं गेलं नाही जोपर्यंत ते वातावरण नियंत्रणाच्या बाहेर गेले नाही. यावरुन लक्षात येतं की हे प्रकरण प्रशासनाकडून रचलेलं कटकारस्थान आहे. अजून सांगायचं म्हटलं तर कामगारांच्या कपड्यांत कंपनीचे काही बाउंसर पण त्या घटनास्थळी उपलब्ध होते.

३. एकीकडे एफआयआर मधे उल्लेख केलेला आहे की जवळपास ४००-५०० च्या संख्येत कामगार लाठ्याकाठ्यांसह एचआर मधे प्रवेश करुन होते आणि त्यांनी प्रशासनातील लोकांना मारहाण केली. पण कोर्टात साक्ष देतांना कोणाच्याही तोंडी असा उल्लेख नाही की कामगारांकडं लाठ्याकाठ्या होत्या.

४. एक अजून असं सांगण्यात आलं की प्लांटच्या प्रत्येक मॅनेजरला जवळपास ४-५ कामगारांनी घेराव घालून हत्यारांनी मारले. यावरुन प्रशासन हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहे की कामगारांनी जीवे मारन्याचा प्रयत्न केला होता. पण जर असं असतं तर प्रत्येक मॅनेजरला गंभिर जखमा झाल्याची तक्रार आली असती. पण त्यांपैकी बहुतेकांस बिलकुलच इजा झाली नव्हती, असं शक्य तरी आहे का? बचावपक्षाकडून यावर प्रश्न उपस्थित केला गेल्यानंतर असं सांगितलं गेलं की कामगारांनी त्यांना सोडून दिलं म्हणून त्यांना इजा झाली नाही. या वरुन हेच सिद्ध होतं की कामगारांनी खुनाचा प्रयत्न केला नव्हता.

५. यावरील पूर्ण कारवाई दरम्यान एक बाब लक्षात घेण्यायोग्य आहे. १४७ मधून ८९ कामगारांची नावे ४ ठेकेदारांकडून अनुक्रमणिकेसह देण्यात आली होती. कोर्टात दाखल केलेल्या कागदपत्राच्या आधारे असं दिसून आलं की विरेंदर नामक एका साक्षिदाराने ज्या २५ कामगारांची नावे दिली त्यांची नावं A-G पासुन सुरु होतात, याप्रकारे एका दुसऱ्या साक्षीदार यादरामने अन्य २५ कामगारांची नावं दिली, ज्यांची नावे G-P पासून सुरु होतात. अशोक राना यांनी २६ कामगारांची नावं दिली जे की P-S ने सुरु होतात. अजून एकानं बाकीची १३ कामगारांची ज्यांचं नाव S-Y ने सुरु होतं. असं कसं शक्य आहे? याप्रकारे वर्णानुक्रमे नावं दिली जाणं हे सिद्ध करतं की पोलिसांना ही नावं कंपनीकडून दिली गेली आहेत. म्हणजे उघडपणे पोलिस, प्रशासनासोबत मिळून कामगारांस खोट्या खटल्यामध्ये अडकवत आहे.

६. बाकी जो आग लावण्याच्या घटनेचा आरोप कामगारांवर लावण्यात आलेला आहे, त्याला कोणताही पुरावा नाही ना कोणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे सांगू शकला की ती आग कशी लागली आणि कोणी लावली. आधी तर चौकशीदरम्यान परस्परविरुद्ध बोलणी पहायला मिळाली. मयत अवनीश देव यांची बॉडी एम १ रुम मधून मिळाली होती आणि साक्षीदारांनी आधी असा दावा केला की रुममध्ये आतूनच आग लावली होती जिथं की घटना घडली होती. पण तपासाअंती त्यांचे तर्क बदलत गेले. मग ते आपली साक्ष फिरवू लागले, बदलू लागले की ती आग बाहेरून लावण्यात आली. तसेच माचिसनं आग लावण्यात आली, हा तर्कसुद्धा शंकास्पद आहे. घटनेनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १९ जुलैला सकाळी ६ वाजता जेव्हा सुरक्षा रक्षक ओमप्रकाश ने त्या खोलीचा तपास घेतला असता तिथं कुठलीही काडीपेटी सापडली नाही मग अचानकच त्याच दिवशी १२ वाजता एफएसएल चे अधिकारी यांना काडीपेटी कुठून मिळाली. ह्या आगीच्या घटनेबाबत जबान देणाऱ्या १६ व्यक्तींमधील ज्या ३ व्यक्तींनी नावासह कामगारांना जबाबदार ठरवले होते, परंतु कोर्टात मात्र कामगारांना हे व्यक्ती चेहरापाहून देखील ओळखू शकले नाहीत.

७. १८ जुलै च्या घटनेमध्ये अवनीश देव ज्यांचा मृत्यु झाला होता, शव विच्छेदनच्या अहवालानुसार तो ऑक्सिजन न मिळू शकल्याच्या कारणाने झाला होता. पण मारझोडीच्या वेळी जी जखम झाली होती ती त्याच्या उजव्या घुडघ्याला झाली होती. यावरून हे सिद्ध होऊ शकत नाही की अवनिश देव यांच्या मृत्यू हा हत्या होता. म्हणजे ३०२ व ३०७ ची जी कलमे लावली आहेत ती अन्यायपूर्ण आहेत.

कोर्टात चाललेल्या या पूर्ण कारवाई नंतर जेव्हा १३ कामगारांना ३०२ आणि ३०७ कलम लागू करण्यात येत आहे, तेव्हा बेर्टोल्ट ब्रेष्ट च्या 'मदर' नाटकातील काव्यपंक्ति लक्षात येतात. त्या म्हणजे न्यायधीश आणि जेलर सुद्धा त्यांचे, सगळे अधिकारी सुद्धा त्यांचेच. ह्या पूर्ण घटनेचा मिडियातल्या रिपोर्टिंगपासून ते केसच्या कारवाईपर्यंत कामगारांविरोधात सादर केल्या गेलेल्या ह्या केसचा सार पाहता क्षणी कळून येतं. कोर्टात केस सुरु होण्या आधीच मिडियाने कामगारांना खुनी ठरवलं. २०१२ मधील फॅक्टरीत झालेल्या मॅनेजरच्या खुनाची जबाबदारी तपासाविना मारुती कामगारांवर लादण्यात आली. पण जो त्रास, जी जखम, जी वेदना, यातना हे कामगार सहन करीत आले आहेत, त्यांचे परिवार, घरदार यांनी जे सहन केलंय चार वर्षापासून त्यासाठी ही व्यवस्था कोणाला जबाबदार ठरवणार आहे? व्यवस्थापनाच्या एका व्यक्तीच्या मरणाचेनिमित्त सांगून १४८ कामगारांना तुरुंगात सडवन्यात येते. परंतु कामगारांचे हक्क हिसकावले म्हणून, फॅक्टर्यांमधे कामगारांचे झालेले अपघाती मरण बघून, मोठ्या भांडवलदाराना, उद्योगपतिंना कधी साधी अटक तरी झाली आहे काय? कारखान्यांमध्ये होणारे कामगारांचे दमन कोणत्याही वर्तमानपत्रात बातमी म्हणून छापले जात नाही परंतु आपल्या रक्त आटवून, घाम घालून केलेल्या कष्टाचे मोल मागण्यासाठी जर कामगार रस्त्यांवर आला तर गुन्हेगार म्हणवला जातो.

नफ्या-तोट्याच्या बाजारात कामगारांच्या जीवनाचा काडीची देखील किंमत नसते. हे न्यायालय ठोस पुरावा नसताना कामगारांना चार वर्षापर्यंत तुरुंगात सडवू शकते परंतु ऑटोमोबाईल सेक्टरमधे कामगारांवर होत असलेल्या अत्याचारांबाबत तसेच कायद्याची पर्वा न करता कामगारांचे होणारे शोषन, दमन थांबविण्यासाठी मात्र न्यायालयाची ही तत्परता हवेमध्ये विरुन जाते. मारुतीच्या या घटनेवरून कामगारांना एक प्रकारे इशाराच दिला आहे की जो संघर्षात होण्यासाठी किंवा भांडवलाच्या चक्राला थोपविण्याचा प्रयत्न करेल, त्याला ही व्यवस्था चिरडून टाकेल. स्वत: कोर्टाने ह्या दबावाला खरे ठरवले, जेव्हा त्याने एक निर्णय दिला होता की, जेव्हा कामगारांना जामीन देण्यास नाकारण्याचे कारण कोर्टाने सांगितले की भांडवली गुंतवणुकीला खतरा होइल तसेच तिथून फॅक्ट्या निघुन जातील. म्हणुन कामगारांना अद्दल घडविण्याचा सल्ला सुद्धा कोर्टाने दिला. परंतु हे नफेखोर कामगारांच्या प्रतिकार करण्याच्या जिद्दीला तोडु शकले नाहीत. मारुती कामगारांच्या संघर्षाच्या सुरुवातीनंतर पुढे गुडगाव, धारुहेडा, बावल, निमराना, टप्पूकडा चा संपुर्ण ऑटोमोबाइल बेल्ट मध्ये कामगारांचे अशेच आंदोलनांचे साक्षी बनले ज्यांना पोलिस प्रशासना द्वारे बर्बर पद्धतीने दाबून टाकले. मारुती कामगारांच्या आंदोलनानंतर भांडवलशहांनी अत्यंत निष्ठूरपणे अन्य कामगार संघर्षांना दाबून-चिरडून टाकले आहे. परंतु हे दमन ह्या संघर्षांना थांबवू शकत नाही. उलट हा जंगलाची आग आणखीनच भडकणार आहे. मारुतीच्या कामगारांना तुरुंगात डांबून ही व्यवस्था आगीत तेल ओतण्याचे काम करत आहे आणि ही आग भांडवली जंगलालाच जाळून खाक करेल यात किंचीत ही शंका नाही.

# नकली देशभक्तीचा कलकलाट आणि लष्करातील जवानांचे उठणारे सूर

तपीश मैंदोला
मराठी अनुवाद :- गजानन कदम

साधारणता लोक लष्कराला, गायीला आणि गंगेला पवित्र मानतात.पावित्र्याचं हे मिथक लोकांच्या मन आणि मेंदूत खोलवर रुजलेलं आहे. सरकार, लष्कर, मीडिया आणि अंधराष्ट्रवादी पार्टी इत्यादींच्या प्रचाराने या भ्रमाला आणखी खोलवर रुजवण्यामध्ये मोठी भूमिका पार पाडली आहे. हेच कारण आहे की जेव्हा कधी संयोगाने अशी एखादी घटना घडते जी लष्कराच्या पवित्रतेच्या मिथकावर आघात करते, तेव्हा पहिल्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात लोक घटनेच्या सत्यतेला स्विकारण्याचाही प्रयत्न करत नाहीत, मात्र अशा गोष्टींना अपवाद समजून स्वतःला त्या पासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. लष्कर, सरकार आणि मीडियाची तर गोष्टच वेगळी, सामान्य लोक सुद्धा स्वीकारत नाहीत की भारतीय लष्करामध्ये भ्रष्टाचार, अस्पृश्यता आणि वर्ग-भेदाचा बोलबाला आहे. लष्कर ना केवळ सामान्य जनतेचं दमन-उत्पीडन करत आहे तर वर्गवर्चस्वतेच्या या संस्थेमध्ये अधिकारी सैनिकांचं शोषण सुद्धा करत असतात.

थोड्याच दिवसापूर्वी एक व्हिडिओ समोर आला होता, ज्यामध्ये आर्मीच्या सहायक व्यवस्थेचा भाण्डाफोड केला होता. त्या विडिओमध्ये असलेले आर्मी जवान रॉय मैथ्यू यांचे शव नंतर महाराष्ट्राच्या देवळाली कॅम्पमध्ये संदिग्ध परिस्थितीत आढळले. ह्या घटने अगोदर काही दिवसापूर्वीच बीएसएफचा जवान तेज बहादूर याने सोशल मीडियावर एक व्हिडिओ अपलोड करून लष्करात होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचाराकडे सगळ्यांचे ध्यान आकर्षित केलं. त्या नंतर सीआरपीफ आणि लष्करातील जवानांचे आणखी दोन व्हिडिओ आले तरी ग्रह मंत्रालय आणि लष्करानं निर्लज्जपणे भ्रष्टाचाराच्या आरोपांना फेटाळून लावलं आहे. काही 'देशभक्तांनी' या जवानांना देशद्रोही घोषित केले तर काहींनी लष्कराला बदनाम करण्याची योजना असल्याचे सांगितले.

आपल्याला विसरून चालणार नाही की या बातम्या अधिक चर्चेत येण्याचं कारण सोशल मीडियावर त्या वायरल झाल्या होत्या. प्रिंट आणि इलेक्ट्रोनिक मीडिया सारख्या माध्यमातून दुर्लक्षित करण्यासारखं राहील नाही. अश्या घटना भारतीय लष्करासाठी नवीन नाहीत. देशाच्या सुरक्षेच्या नावावर त्या दाबल्या जातात. कदाचित वाचकांना आठवत असेल की १७ ऑगस्ट २०१२ या दिवशी के. मैथ्यू नावाचा मिलिट्री इंजिनिअरींग रेजिमेंटचा एक जवान दिल्ली मध्ये २०० फूट उंच टॉवरवर चढला होता. त्याची मागणी होती की संरक्षण मंत्र्याला भेटून आपल्या सोबत होणाऱ्या भेदभावा बद्दल तक्रार करायची होती. त्याला संरक्षण मंत्र्याला भेटू दिले नाही. पाचव्या दिवशी जेव्हा तो भूकेने व तहानेने व्याकूळ होऊन बेशुद्ध झाला तेंव्हा त्याला खाली उतरवून दवाखान्यात दाखल केलं. कोणालाही माहीत नाही की या घटनेनंतर त्या शिपायाचे आणि त्याच्या तक्रारीचे काय झालं. ८ ऑगस्ट २०१२ ला जम्मू-कश्मीर मधील सांबा येथे कार्यरत तिरुअनंतपूरमच्या के. अरुण वी. ने अधिकाऱ्या कडून झालेल्या छळाला कंटाळून स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्याच्या आत्महत्येची बातमी पसरताच युनिट मध्ये कडाडून विरोध झाला आणि अधिकाऱ्यांनी घरांमध्ये स्वतःला बंद करून आपला जीव वाचवला. जवळच्या क्षेत्रामधून दोन युनिट पाठवून या विद्रोहाला दाबून टाकण्यात आलं. जवान आणि लष्कराच्या अधिकाऱ्यांमध्ये होणाऱ्या खुनी संघर्षाचं हे एकमेव उदाहरण नाही.

परिस्थिती किती वाईट आहे याचा अंदाज सुरक्षेवर गठीत केलेल्या संसदीय समितीच्या ३१ व्या रिपोर्ट वरून लावू शकतो. हा अहवाल सांगतो की २००७ पासून २०१० च्या कालखंडात जिथे २०८ जवानांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यु झाला तिथे ३६८ नी आत्महत्या केली आणि १५ ते ३० नी आत्महत्येचा असफल प्रयत्न केला. वास्तविकता ही आहे की लष्कराचे अधिकारी सैनिकांसोबत त्याच प्रकारचे वर्तन करतात जसं वर्तन मालक आपल्या नोकरांसोबत करतात. या गोष्टींना नीट समजण्यासाठी माजी सैनिकांच्या त्या मागण्यांकडे पाहणे आवश्यक आहे, पेन्शन आंदोलनाच्या वेळेस जंतर-मंतरवर आंदोलन करत असताना, 'वॉईस ऑफ एक्स सर्विसमॅन' नावाच्या सैनिकांच्या एका संघटनेने १९ सूत्री मागणी केल्या होत्या त्यातल्या चार मागण्या लष्करात पसरलेली असमानता आणि होणाऱ्या त्रासाचं प्रातिनिधीक उदाहरणे आहेत. या मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१. अस्पृश्यता आणि राहण्याच्या जागेतील भेदभाव बंद करणे.(या मागणीचे कारण आहे की लष्करातील सैनिकांसाठी घर बांधणी संस्था 'आर्मी वेल्फेयर हाउसिंग ऑर्गनायझेशन' अधिकारी आणि सैनिकांच्या उपयोगासाठी वेगवेगळी क्लस्टर बांधतात.)

२. सेवा घेणे बंद करणे. (अधिकारी आपल्याला झाडू लावणे, साफ-सफाई करणे, दुध मागवणे, स्वयंपाक बनवणे, कपडे धुणे, बूट पॉलिश इत्यादी कामे करवून घेतात.)

३. अधिकारी आणि सैनिकांची बाथरुम वेगवेगळी का?

४. लष्करातील भ्रष्टाचार संपवणे आणि अशी संस्था निर्माण करणे जिथे सैनिकांना भयभीत न होता अधिकाऱ्याची तक्रार करता यावी.

तर अशी आहे भारतीय लष्करातील सत्य परिस्थिती. जे लोक याला पवित्र आणि आदर्श संस्था मानतात त्यांना हे सर्व बघून धक्का बसू शकतो. खुप लोकांचा विश्वास आहे की जवान लष्करामध्ये देशभक्तीसाठी जातात. एक संशोधन सर्वे सांगतो की ७७ टक्के लोक लष्करामध्ये वेतन आणि सुख सुविधेच्या आकर्षणामुळे जातात.१७ टक्के लोक यासाठी जातात की या पेशामध्ये समाजात त्यांना मोठा मान मिळतो आणि ६ टक्के लोक यासाठी जातात की देशाची सेवा करायची असते.

प्रत्यक्ष परिस्थिती ओरडून सांगत आहे की भारतीय समाजातील इतर् सर्व वर्गसंस्थे प्रमाणे भारतीय लष्कर सुद्धा आतून कुजत आहे. श्रीमंत वर्गातील खात्या-पित्या घरचे काही थोडे-अधिक लोक यामध्ये अधिकारी होतात आणि उद्धवस्त होत असलेले शेतकरी आणि मजूर किंवा निम्न मध्यवर्गातील मुले-मुली शिपाई आणि लिपिक होत असतात. इतिहास साक्षी आहे की जेंव्हा तेलंगाणा, तेभागा, नक्सलबाडीचे मोल-मजूरी करणार्यांनी आणि शेतकऱ्यांनी अन्याय आणि शोषणा विरुद्ध प्रत्यक्ष कारवाई सुरु केली तेंव्हा भारताची लुट करणाऱ्या राज्यकर्त्यांनी आपली सत्ता वाचवण्यासाठी याच भारतीय लष्कराला जनतेचं दमन करण्यासाठी मैदानात उतरवलं होतं. आज पण शेतकरी आणि आदिवासींची जंगले-जमिनी व त्या खाली लपलेल्या खनिज संपत्तीच्या लुटीला सुरक्षित करण्यासाठी भारताच्या खुनी सरकारने आपल्याच लोकांच्या विरोधात भारतीय लष्कराला मैदानात पाचारण केल आहे.

न्यायाचा आदर करणाऱ्या प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे की भारताच्या लष्करातील शिपायाच्या वर्दीमागे कामगार, शेतकऱ्याच्या घरातून येणारा एक नवयुवक उभा आहे. ज्याचा उपयोग त्याच्याच वर्ग-भावांचा प्रतिकार दाबून टाकण्यासाठी केला जातोय. मोबदल्यात तो अधिकाऱ्याच्या हाताखाली स्वतः वर्ग शोषणाचा शिकार होतो. आवाज उठवणाऱ्या सैनिकांना देशभक्त आणि देशद्रोह्याच्या चष्म्यातून पहाणे बंद केलं पाहिजे आणि त्यांच्या प्रत्येक योग्य त्या जनवादी मागणीचे समर्थन करण्यासोबतच, लष्कराच्या प्रत्येक जनविरोधी, दमनकारी कारवाईला निर्भिकपणे उघडे पाडून विरोध केला पाहिजे.

# सरत्या वर्षात झारखंड मधील कोळसा खाणीत वेदनादायक दुर्घटना. पुन्हा एकदा नफ्याच्या लालसेने खाण कामगारांचा घेतला जीव

पराग
मराठी अनुवाद :- जोगदंड शिवाजी रघुनाथराव

गेल्या २९ डिसेंबरला जेव्हा देशातील प्रमुख टी.व्ही. चैनलवरती नोटबंदीची मुदतसंपण्याची तसेच नवीन वर्षा निमित्त आयोजित होणाऱ्या पार्ट्यांची चर्चा सुरू होती, सायंकाळी साडे सात वाजता झारखंडच्या गोड्डा जिल्हयातील लालमटिया ओपन कास्ट माइन्सच्या डोंगराळ चटई क्षेत्रात भूमी खचल्याने तेथे काम करत असलेले खाण कामगार आणि खाणीतील मशीनी लाखों मेट्रीक टन कोळस्याच्या ढिगा खाली दबून गेले. नंतर दोन दिवसापर्यंत कोळस्याचे ढिग हाटविण्याचे कार्य चालू असून सुद्धा एक ही कामगार जीवंत सापडला नाही. इतके होऊन ईसीएल (ईस्टर्न कोलफील्डस लिमिटेड) जिच्या अंतर्गत या खाणी आहेत तिने मृतकांच्या एकूण संख्ये ची घोषणा केली नाही. त्या ठिकाणी कार्य करणाऱ्या कामगारांच्या म्हणण्यानुसार आपघाताच्या वेळी खाणी मध्ये जवळपास ७० कामगार कार्यरत होते आणि ४० उत्खनन मशीनी सुरू होत्या. आश्चर्याची बाब अशी की खाणीसाठी खोदलेल्याजमीनवर भेगा पडल्याने जमीन खचण्याची आशंका कामगारांना अगोदरच होती,त्याबाबत व्यवस्थापनांना सूचित ही केले गेले परंतु अधिकाऱ्यांनी त्यास नजरेआड करून काम सुरु ठेवले आणि शेवटी तेच घडले ज्याची कामगारांना भिती होती. या नफेखोर लोकांना जिथे जास्तीत-जास्त उत्पादनातून अमाप नफा कमविण्याचा उन्माद असतो तिथे कामगारांच्या तक्रारीला असेच नजरेआड करून त्यांच्या जीवांची किंमत कवडीमोल ठरते. जरी कामगारांच्या अमाप संख्येतून काही कामगारांनी आपला जीव दुर्घटनेत गमावला तरी भांडवलदारांना व ठेकेदारांना काय फरक पडणार! त्यांच्यासाठी तर नफाच सर्वोपरि आहे!

लालमटिया ओपन कास्ट माइन्स ईसीएल (ईस्टर्न कोलफील्डस लिमिटेड) च्या अंतर्गत येते,ती कोल इंडिया लिमिटेड ची सहयोगी कंपनी पैकी एक आहे. या खाणी मध्ये उत्खननाचे कार्य महालक्ष्मी नावाच्या खाजगी कंपनीला करारावर (कंत्राट) दिलेगेले आहे. कामगारांच्या सुरक्षे बाबतीत खाजगी कंपन्या सतत बेफिकीरीने वागतात. त्यांचा असा प्रयत्न असतो की उत्पादन खर्च कमीत-कमी करून जास्तीत-जास्त नफा प्राप्त करावा; या उद्देश्याने ठेकेदार कामगारांचे भरपूर शोषण करतात. कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षेवर होणारा खर्च उदा. कार्यक्षेत्रात नवीन यंत्रांचा वापर किंवा त्यांना सुरक्षित वातावरणात काम करण्यासाठी होणारा अमाप खर्च. कंपन्या या खर्चाला बगल देत कामगारांना अपघात प्रवण क्षेत्रात काम करण्यासाठी मजबूर करतात. लालमटियाची हा हृदयविदारक अपघात खाणकाम इतिहासात घडलेला पहिलाच अपघात नाही. एकट्या २०१६ या एका वर्षामध्ये कोळसा व अन्य खाणी मध्ये यासारख्या दुर्घटनामुळे मरणाऱ्या कामगारांची संख्या ६५ होती. मागील वर्षातील आकड्यांच्या आधारावर प्रत्येकी तीन दिवसात खाणीमध्ये एका गंभीर अपघाताची नोंद मिळते. भारतात लिखित प्रमाणाचा संदर्भ बघितला तर त्यानुसार वर्ष २००९ ते २०१३ मध्ये ७५२ खाण-दुर्घटनानोंदविल्या गेल्या आहेत.

आश्चर्याची बाब अशी की १९७३ मध्ये कोळसा खाण (राष्ट्रीयकरण) अधिनियम अंतर्गत सर्व कोळसा खाणींचे राष्ट्रियकरण यामुळेच केले गेले होते की खासगी क्षेत्रातील खणन-कंपन्या मार्फत खाणकामातील सहभागामुळे कामगारांच्या सुरक्षेच्या संदर्भात प्रश्न नीट हाताळला जात नाही आणि अशाने कार्यस्थळावरील अपघातात कामगारांच्या मृत्यूचे प्रकरण राजकीय मुद्दा बनत होते. परंतु सरत्या वेळेत असे दिसून आले की राष्ट्रीय कोळसा कंपन्याही कामगारांच्या सुरक्षेबाबतीत काही गंभीर नाहीत त्यांनी यासंदर्भात कुठलीही व्यवस्था केली नाही उलट कोल इंडिया लिमिटेड व तीच्या सहायक कंपन्या उदा. आयएसटी इंडिया कोल फिल्ड्स याही नफेखोरीच्या स्पर्धेत सामील होऊन उत्खननच्या कामाला ठेक्यावर देत आहेत ज्यामुळे खाणीत काम करणाऱ्या खाण कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पून्हा फिरून तिथेच आला जिथे कामगार वर्गाच्या सुरक्षेची कसलीच पर्वा केली जात नाही.

आऊटसोर्सिंग/सबकंट्रॅक्टिंग/ठेकेदारी त्या प्रक्रियेचा भाग आहे जिच्या अंतर्गत कोणत्या ही संस्थेचे काम बाहेरील एजेंसीला किंवा कंपनीला दिले जाते. जगभरामध्ये ही पद्धत मोठ्या मालक कंपनीकडून स्वीकारली जात असते कारण

पान १२ वर

# अमेरिकी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्पची धोरणे आणि जनतेचा प्रतिकार

लता

ट्रम्पसारखा अत्यंत खालच्या दर्जाच्या लंपट आणि स्त्रीविरोधी व्यक्ति जगातील सर्वात मोठ्या भांडवली शिखरावर बसणे, म्हणजे भांडवलशाहीच्या पतनाची अंतिम टोक गाठणारी अभिव्यक्ति आहे. पतनाला लागलेली भांडवली व्यवस्था जनवाद आणि मानवतेचा पातळ पडदा स्वच्छ प्रतिमेच्या बुर्जुआ नेत्यांच्या माध्यमातून स्वत:वर पांघरण्याचा जो प्रयत्न करत असते, तोच पडदा ट्रम्प सारखा लंपट नेता गुंडाळून ठेवण्याचे काम करतो. संपुर्ण जग अजुनही आश्चर्यचकीत झाले आहे कि ट्रम्प सारख्या नेता सत्तेत कसा येऊ शकतो, ज्याने निवडणूकीच्या प्रचारात अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन स्त्री विरोधी भाष्य, स्थलांतरांविरोधी तसेच इस्लाम विरोधी घोषणा दिल्या होत्या. परंतु रचनात्मक संकटाच्या काळात भांडवलशाहीची राजकीय अभिव्यक्ती फासीवादी वृत्तीनां अनेक रूपात आणते,यात अजीबात आश्चर्यचकित करणारी गोष्ट नाही. अमेरिकी निवडणूकीतील ट्रम्पीय परिणामावरून हे आपण समजुन घेऊ शकतो.

अमेरिकेत ट्रम्प सत्तेत आला म्हणजे तिथे फासीवाद सत्तेत आला असे म्हणने थोडे अतिशयोक्ती होइल. कारण एकतर ट्रम्प हा कोणत्याही फासीवादी पक्षाचे नेतृत्व करत नाही अन् त्याच्या पाठीमागे फासीवादी सिद्धांतावर आधारित कोणतेही संघटन नाही. परंतु ट्रम्पच्या विजयाने नक्कीच फासीवादी प्रवृत्तींना आणि तत्वांना बळ मिळाले आहे. ट्रम्प ज्या पक्षातुन येतो तो रिपब्लिकन पक्ष हा अमेरिकेत प्रतिगामी विचारधारेचे अनुकरण करणारा पक्ष मानला जातो. ट्रम्पने आपल्या निवडणूकांच्या प्रचारात जे हातकंडे वापरले ते नक्कीच एका फासीवादी नेत्या समानच होते. त्याने एक सशक्त आणि निर्णायक नेता म्हणून स्वत:ला प्रस्तुत केले जो की अमेरिकेला "पुन्हा एकदा महान" बनवणार. फासीवाद ज्या पद्धतीने कोणत्यातरी काल्पनिक महान इतिहासाची रचना करून जनतेच्या निराशेला आपल्या बाजुने करत असतो, त्याच पद्धतीने ट्रम्पने सुद्धा अमेरिकाला पुन्हा एकदा महान राष्ट्र बनवण्याचे अश्वासन दिले आहे. बेरोजगारी, गरिबीचा सामना करत असलेल्या अमेरिकी जनतेला डोनाल्ड ट्रम्प ने पुन्हा एकदा सोनेरी स्वप्ने दाखवली आहेत. एका महान इतिहास आणि तो हरण्याच्या कथानकात एका शत्रुची आवश्यकता लागते. त्यानंतर त्या काल्पनिक सुवर्ण युगाच्या शत्रुला वर्तमानातील समस्यांना जबाबदार धरले जाते. जसे भारतात फासीवादी संघी मुसलमानांना शत्रुच्या रूपात जनतेसमोर आणतात. तसेच अमेरिकेत सुद्धा ट्रम्पने स्थलांतरितांवर आसुड उगारला आहे. ह्या शत्रुच्या विरोधात घोर द्वेष निर्माण करून त्याला समाजाच्या संकटाला जबाबदार धरून खऱ्या समस्येवर पडदा टाकला जातो. ट्रम्पच्या अनुसार स्थलांतरित, अमेरिकी जनतेची नोकरी आणि संसाधन हिसकावून घेतात आणि त्यामुळेच सामान्य अमेरिकी जनता बेरोजगारी आणि सुविधांपासून वंचित आहे.

ह्या परिप्रेक्षातुन ट्रम्प आणि त्याच्या धोरणांना समजुन घेता येऊ शकते. फक्त हेच नाही तर भांडवलशहांकडे जनतेचे ध्यान मुळ मुद्द्यांकडून भटकविण्यासाठी अजुन एक वापरलेला टोटका पण आहे - दहशतवाद. अमेरिका जो की संपुर्ण जगात दहशतवादाचा सगळ्यात मोठा जन्मदाता आणि संरक्षक सुद्धा आहे, तो खुप हुशारिने आपल्या संचार तंत्राचा, मीडिया आणि सिनेमाच्या माध्यमातुन जनतेमध्ये दहशतवादाप्रति एक सतत भिती कायम ठेवण्याचे काम करत असतो. ह्याचीच पुढची पायरी म्हणजे ट्रम्पचे सात मुस्लीम राष्ट्रांना अमेरिकेच्या सुरक्षेतसाठी खतरनाक घोषित करणे.

आता हे ठरवलच आहे कि स्थलांतरण आणि दहशतवाद हे अमेरिकेच्या भविष्य सुधारणेच्या आणि महान राष्ट्र बननण्याच्या कामात मोठा अडथळा निर्माण करताहेत, त्यामुळे त्यांना निपटवनं खुप गरजेचं झालंय. त्यामुळेच राष्ट्रपती पदाचा कार्यभार स्वीकारताच ट्रम्पने त्यांच्या विरोधात आक्रमक धोरणे आखायला सुरूवात केली. खरं तर अमेरिकीच्या ४५ टक्के जनतेने दोघांमध्ये (हिलेरी क्लिंटन आणि ट्रम्प) कुठल्याच उमेदवाराला मत दिले नाही. परंतु जनतेला भ्रमात ठेवण्यासाठी ट्रम्पकडुन असलेल्या धोरणांना आक्रामक पद्धतीने मांडणे गरजेचे होते. म्हणून तर कुणालाच निराश न करता जनतेला सांगितल्याप्रमाणे स्वत:ला खरे ठरवत आपल्या कार्यकाळाच्या पहिल्याच आठवड्यात सात मुसलमान बहुल राष्ट्र ईरान, इराक, सीरिया, यमन, लीबिया, सुदान आणि सोमालिया यांच्यावर ९० दिवसांसाठी स्थलांतरण प्रतिबंध लावला आणि जे निर्वासित आहेत त्यांच्यावर १२० दिवसांचा पुर्ण प्रतिबंध लावला. त्याच बरोबर अमेरिका-मेक्सिको सीमेवर भिंत बांधण्याची घोषणा केली. ट्रम्पने अमेरिकेतील ११० लाख अवैध स्थलांतरितांना निर्वासित करण्याची धमकी दिली त्याचबरोबर तो हे सुद्धा म्हणाला की जी शहरे अवैध स्थलांतरितांना थोडे फार संरक्षण देतात त्यांच्या फेडरल फंडामध्ये घट केली जाईल उदा. न्युयॉर्क, लॉसएंजेलेस, शिकागो, फिलाडलफिया, बोस्टन, डेनवर, वॉशिंगटन, सैनफ्रांसिस्को, सिएटल.

सात देशांवरिल निर्बधाचे कारण ट्रम्प ने दिले कि राष्ट्रीय सुरक्षा आणि अमेरिकी-मेक्सिको सीमेवर भिंतीच्या निर्माणाचे कारण अमेरिकी रोजगार आणि संसाधनांना अमेरिकी जनतेसाठी सुरक्षित ठेवणे हे सांगितले. त्याचबरोबर भिंतीचा खर्च सुद्धा मेक्सिको कडुन घेतला जाईल असे वारंवार ट्रम्पने सांगितले आणि विशेष म्हणजे ट्रम्पने या निर्णयासंबंधी किंवा घोषणा करण्या अगोदर मेक्सिकोच्या राष्ट्रपती पेन्या नेयतो यांच्याशी एकदा सुद्धा चर्चा केली नाही. त्यांना विश्वासात न घेताच ट्रम्पने ही घोषणा केली. पेन्या नेयतोनी ह्याला साफ नकार दिला. ते म्हणाले, जर गरज अमेरिकेची असेल तर खर्च मेक्सिकोने का करावा? उशीरा का होइना हा साधा सरळ मुद्दा ट्रम्पच्या लक्षात आल्यावर त्याने सांगितले की आता ३२०० किमी लांब भींत बांधण्याचा खर्च फेडरल फंडातुन केला जाईल जो की खुपच खर्चीक प्रोजेक्ट आहे.

स्थलांतरितांवर निर्बंध करणे निश्चितच या सात देशांच्या विश्वासाहर्यतेवर ठेच पोहचवणारा निर्णय आहे. अगोदर पासुन जगात जी मुस्लीम विरोधी लाट पसरली आहे, त्यात या निर्णयामुळे आणखीच भर पडणार आहे. युद्ध प्रभावित क्षेत्र मुख्यत: सीरिया मधुन आलेल्या स्थलांतरितांसाठी खूप कठीण परीस्थिती होऊन बसली आहे आणि खूपच असे लोक आहेत ज्यांना निर्वासितांचा दर्जा दिला गेला होता आणि ज्यांनी आपल्या देशातील नोकरी सोडुन, जवळची संपत्ती विकुन, अमेरिकेत येण्याची तयारी करत होते अशा लोकांचे जीवनसुद्धा स्थलांतरितांवर केलेल्या निर्बंधामुळे अंधारात सापडले आहे.

ह्याच बरोबर एच-१बी वीजावर निर्बंध आणि त्याच्या किमान वेतनात दुप्पट वाढ केल्यामुळे अमेरिकेतील आईटी सेक्टर चांगलेच प्रभावित होणार आहे. हा तेथील मोठ्या कंपन्यांचा चिंतेचा विषय झाला आहे, कारण उच्च प्रशिक्षण प्राप्त कामगारांना नोकरीवर ठेवणे कंपन्यांना अवघड आणि महाग होणार आहे. ह्या निर्णयामुळे त्यांच्या गुणवत्ते बरोबरच नफ्यावर देखील त्याचा परिणाम होणारच आहे. त्यामुळेच ट्रम्पच्या या निर्णयाला भांडवलशहा वर्गातील एका हिश्शातुन देखील विरोध होत आहे.

स्थलांतरितांसंबंधी एक तथ्य हे देखील आहे की प्रवासी विशेषकरून लातिन अमेरिकेतुन येणारे अवैध आणि वैध प्रवासी अमेरिकेत खुपच स्वस्त श्रमाचे स्रोत आहेत. या प्रवासींकडुन खुप कठीण काम करून घेतले जाते आणि त्यांना अगदीच नाममात्र रोजंदारीवर राबवले जाते. ट्रम्पच्या स्थलांतरितांविषयी धोरणांचा विरोध राजकीय आणि आर्थिक या दोन्हीं गोटांतुन होत आहे. तेथील भांडवलदार स्वस्तात मिळणाऱ्या श्रमाच्या स्त्रोताला इतक्या सहजपणे सोडणार नाही.

अमेरिकेतील अनेक फेडरल न्यायाधिशांनी स्थलांतरित आणि निर्वासितांसंबंधी निर्णयाला थांबवले आहे, परंतु अजुन देखील कळायला मार्ग नाही की हा निर्णय मागे घेतला जाऊ शकतो की नाही. कारण ट्रम्पच्या न्याय विभागाने फेडरल न्यायाधिशांच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. न्यायाधिशांचे म्हणणे आहे कि आतापर्यंत असा कोणताही पुरावा नाही की अमेरिकेतील आतापर्यंत झालेल्या आंतकी हल्ल्यातील दहशतवादी ह्या देशातुन आले होते. म्हणून ठोस कारणांशिवाय फक्त मुस्लीम बहुल देश आहे, म्हणून त्या देशावर निर्बंध नाही लावले जाऊ शकत. वीजा देतानाही अमेरिकी कायद्यानुसार धर्म किंवा वंशाच्या आधारावर भेदभाव करता येऊ शकत नाही. परंतु देशाच्या सुरक्षेच्या नावावर सरकारच्या हाती फेडरल न्यायालयापेक्षा अधिक अधिकार आहेत. यातुन असा गैरसमज बिलकुल करू नये की तेथील फेडरल न्यायाधीश किंवा न्यायपालिका निष्पक्ष किंवा न्यायपुर्ण आहेत.




उलट हे सुद्धा निश्चितच भांडवली लोकशाहीच्या मर्यादीत परिघामध्येच काम करत असतात. म्हणून तर अमेरिकन कारागृहात ७० टक्के अश्वेत लोक आहेत.

### ट्रम्प आणि जनतेचा प्रतिकार

अमेरिकेत लागु होणाऱ्या ट्रम्पीय धोरणामुळे हे तरी लक्षात येते आहे की येणारे दिवस अमेरिकी जनतेसाठी खुप कठीण असणार आहेत. हे ट्रम्पवर देखील लागु होते. अशा व्यवस्थेमुळे अगोदरच ४५ टक्के अमेरिकी जनतेचा मोहभंग झालेला आहे आणि राहिलेली जनता या धोरणांना पुर्णपणे पाठींबा देईल असे दिसत नाही.

इतकी घोर लोकशाही, मुसलमान, वंश आणि स्थलांतरण विरोधी धोरणांना समर्थन मिळेल अशी जी अपेक्षा ट्रम्पला आहे, सध्यातरी ही आशा आशाच राहणार, असे दिसत आहे. हे अमेरिकेतील रस्त्यांवर देखील दिसत आहे. ज्या वेळेपासुन ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्रपती होणार अशी घोषणा झाली आणि ट्रम्पने व्हाइट हाऊस मध्ये पाऊल ठेवले तेव्हापासुनच अमेरिकेत ट्रम्पविरोधी लाट उसळली आहे. ट्रम्पच्या अशा धोरणांमुळे अमेरिकेत अनेक शहरांमधील विमानतळांवर विरोध प्रदर्शन होत आहे. शिकागो, डेनवर, सैन फ्रांसिस्को, जॉन एफ केनडी विमानतळ, न्युयॉर्क इत्यादी ठिकाणी जनतेने या लोकशाहीविरोधी तसेच हुकूमशाही वृत्तीच्या धोरणांविरूद्ध विरोध प्रदर्शन केले गेले. एवढेच नाही तर रिपब्लिकन पार्टी मध्ये सुद्धा ट्रम्पच्या या धोरणांना विरोध होत आहे. रिपब्लिकन नेता एरिजोनाचे सिनेटर, जॉन मैकेन आणि दक्षिण कैरोलिना चे सेनेटर लिन्डसे ग्राहम ने ट्रम्पच्या धोरणांना विरोध केला आहे. जरी अमेरिकी जनतेसाठी ट्रम्पच्या येण्यामुळे येणारे दिवस कठीन असले तरी ट्रम्पसाठी सुद्धा पुढील काळ सोपा असणार नाही. ट्रम्पचे चरित्र फासीवादी जरी असले तरी तो कोणत्याही फासीवादी पक्षातुन येत नाही. तसेच त्याच्या धोरणांना समर्थन आणि अंमलात आणण्यासाठी त्याच्याकडे पिवळा चेहरा असलेली हताश तरुणांची फौज देखील नाही. त्याच्या बरोबरच त्याचा पक्ष फासीवादी सिद्धांत पेरण्याचे काम करण्यासाठी केडर आधारित संघटनेच्या माध्यमातुन काम देखील करत नाही. अमेरिकी जनतेमध्ये त्याच्या धोरणांना इतक्या सहजतेने मान्यता मिळणार नाही, हे दिसत आहे. ही शक्यता पण नाकारता येणार नाही की ट्रम्प कू-क्लक्स-क्लान सारख्या घोर प्रतिगामी संघटनेचा वापर आपल्या हितासाठी करू शकतो. मरणासन्न भांडवलशाही स्वत:ला वाचविण्यासाठी अनेक हातकंडे वापरणार हेही तितकेच खरं आहे.

जागतीक भांडवलशाहीचा नात्याने "मालक"असल्या कारणाने अमेरिकेच्या धोरणांचा प्रभाव जगावर सुद्धा पडणार. याची झलक आपल्याला बघायला मिळतच आहे. ट्रम्पच्या धोरणांना इंग्लंड आणि फ्रांस मध्ये देखील विरोध होत आहे. हजारोंच्या संख्येने या देशातील जनतेने विरोध प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. लोक मस्करीने म्हणतात "आम्ही अनेक वर्षांपासुन मोदीला झेलत आलोय, आता सगळ्या जगाला मोदी मिळाला आहे". संघटनात्मक राजकीय पाया भिन्न असला तरीही ट्रम्प आणि मोदी सत्तेत येण्यासाठी भौतिक परस्थिती एकच होती. पण दोघात गमतीदार समानता आहे. दोघे जितके लोकविरोधी आहेत, तितकेच थापाडे, मूर्ख आणि लबाड सुद्धा आहेत. **आमचा ट्रम्प जुना आहे, त्यांचा मोदी नवा आहे.**

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

गेल्या काही वर्षापासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणूकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.

एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वातील भाजपाचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वात भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. २००९ मध्ये जे लोक म्हणत होते की फासीवादाचा धोका आता टळला आहे तेच लोक २०१४ मध्ये मोदी सत्तेवर येताच रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणूकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणूकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?

या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हाला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.

हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.

**संपादक**

**भाग - ४**

लेखक : अभिनव

मराठी अनुवाद : अमित शिंदे

आतापर्यंत आपण फासीवादाच्या उदयाची सर्वसाधारण पृष्ठभूमी आणि आर्थिक, सामाजिक परिस्थिती अभ्यासली. त्याच बरोबर, जर्मनी आणि इटली मधील फासीवादाच्या क्लासिकल प्रयोगाविषयी जाणून घेतले. आता आपण भारतातील फासीवादाच्या उदयामागाचा इतिहास, पृष्ठभूमी, त्याच्या विशेषता आणि त्याची वर्तमान परिस्थिती ह्या विषयी बोलूयात.

जर्मनी किंवा इटली प्रमाणे फासीवादी भारतात कधीही सत्तेत आलेले नाहीत. परंतु भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी ६ वर्षे सत्तेमध्ये राहून गेली आहे परंतु त्यांचे सत्तेत येणे मुसोलिनी किंवा हिटलरच्या सत्तेत येण्या पेक्षा वेगळे होते. ह्या व्यतिरिक्त, भाजपने स्वबळावर सत्ता मिळवली नव्हती. ते एक आघाडी सरकार होते आणि त्याच्या स्वतःच्या अश्या अंतर्गत कुरबुरी आणि ताणतणाव होते ज्यामुळे भाजप त्याच्या स्वतःचा कार्यक्रम उघडपणे लागू करू शकत नव्हता. परंतु भाजपने आघाडी सरकार असतानाच इतके काही केले की त्यावरूनच स्पष्ट व्हावे की त्यांचे सरकार पूर्ण बहुमताने आले असते तर त्यांनी काय केले असते. जर्मनी किंवा इटली प्रमाणे फासीवादी भारतात कधीही सत्तेवर आलेले नसले तरी तळागाळात रुजलेल्या शक्तीच्या रुपात दीर्घ काळापासून त्याचे अस्तित्व राहिले आहे. सर्वप्रथम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल काही मुलभूत माहिती देणे उपयुक्त ठरेल. त्यानंतर आपण भारतामधील फासीवादाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उत्प्रेरकांची माहिती घेऊ.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ - भारतीय फासीवाद्यांची खरी जन्मकुंडली

भारतातील फासीवादाचा इतिहास जवळपास जर्मनी आणि इटली इतकाच जुना आहे. जर्मनी आणि इटलीमध्ये फासीवादी पक्षांची स्थापना १९१० च्या दशकाच्या शेवटी किंवा १९२० च्या दशकाच्या सुरुवातीस झाली. भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये नागपूर मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक होते केशव बळीराम हेडगेवार. हेडगेवार ज्या व्यक्तीच्या प्रभावाखाली फासीवादी विचारांच्या संपर्कात आले होते त्याचे नाव मुंजे. मुंजे १९३१ मध्ये इटलीमध्ये गेला होता आणि त्याने तिथे मुसोलिनीची भेटही घेतली होती. १९२४ ते १९३५ च्या दरम्यान संघाशी जवळीक असलेले वृत्तपत्र दैनिक 'केसरी' मुसोलिनी आणि त्याच्या फासीवादी सत्तेचे गुणगान करणारे लेख सतत छापले. मुंजेने हेडगेवार यांना मुसोलिनीद्वारा तरुणांच्या डोक्यात विष कालवून त्यांना फासीवादी संघटनेत भरती करण्याबद्दलच्या क्लृप्त्या सांगितल्या. हेडगेवार यांनी त्या क्लृप्त्यांचा तत्काळ उपयोग करण्यास सुरुवात केली आणि संघ आजही त्याच क्लृप्त्यांचा उपयोग करतो. १९३० च्या दशकाच्या शेवटी भारतीय फासीवाद्यांनी मुंबईस्थित इटालिअन काउन्सलेटशी संपर्क साधला होता. पुढेसुद्धा तिथल्या इटालिअन फासीवाद्यांनी हिंदू फासीवाद्यांशी संपर्क कायम ठेवला.

जवळपास त्याच वेळी एक अन्य हिंदू कट्टरपंथी विनायक दामोदर सावरकर यांनी, ज्यांचे मोठे बंधू संघाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते, जर्मनीमधील नात्झींशी संपर्क साधला. सावरकरांनी जर्मनीमध्ये हिटलर कडून केल्या गेलेल्या ज्यूंच्या कत्तलीचे समर्थन सुद्धा केले आणि भारतातील मुस्लिम "समस्ये"वर हेच समाधान सुचवले. जर्मनीमधील 'ज्यूंच्या प्रश्नां'चे "अंतिम समाधान" सावरकरांसाठी एक मॉडेल होते. सावरकरांच्या दृष्टीकोनातून नात्झी राष्ट्रवादी होते तर ज्यू राष्ट्रद्रोही आणि धर्मांध. लेनिनने खूप आधीच सांगितले होते की वांशिक अंधराष्ट्रवादी सनकीपणा नेहमी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा बुरखा घालून अवतरतो. भारतामध्येसुद्धा हिंदू धर्मांध राष्ट्रवाद हा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा बुरखा ओढूनच समोर येत होता.

आर.एस.एस. ने सुद्धा जर्मनीमध्ये नात्झींनी ज्यूंचे जे शिरकाण केले त्याचे उघड समर्थनच केले होते. हेडगेवार यांनी त्यांच्या मृत्युपूर्वी गोळवलकर यांना स्वतःचा उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. गोळवलकर यांनी 'व्ही, ऑर अवर नेशनहूड डिफाइण्ड' ह्या पुस्तकामध्ये आणि नंतर प्रकाशित झालेली 'बंच ऑफ थॉट्स' मध्येही जर्मनीमध्ये नात्झींकडून केल्या गेलेल्या ज्यूंच्या शिरकाणाचे समर्थन केले आहे. गोळवलकर आर.एस.एस.च्या स्वयंसेवकांसाठी सर्वाधिक पूजनीय सरसंघचालक होते. संघाचे लोक त्यांना आदराने 'गुरुजी' म्हणत असत. गोळवलकर यांनी बनारस हिंदू विश्वविद्यालयामधून मेडिकलचे शिक्षण घेतले होते आणि तेथेच काही काळ शिकवण्याचे कामही केले. इथेच त्यांना 'गुरूजी' हे नाव मिळाले. हेडगेवारांच्या म्हणण्यानुसार गोळवलकरांनी संघाची दीक्षा घेतली आणि काही काळ संघाचे काम केले. त्यांच्या धार्मिक ओढीतून ते काही काळ आर.एस.एस. मधून बाहेर गेले आणि कोण्या एका गुरूच्या मार्गदर्शनामध्ये संन्यास घेतला. त्यानंतर १९३९ च्या आसपास गोळवलकर पुन्हा आर.एस.एस. मध्ये परत आले. ह्या वेळपर्यंत हेडगेवार मृत्युशय्येवर होते आणि त्यांनी गोळवलकरांना स्वतःचा उत्तराधिकारी घोषित केले. १९४० पासून १९७३ पर्यंत गोळवलकर आर.एस.एस.चे सुप्रीमो राहिले.

गोळवलकरांच्या नेतृत्वाखालीच आज आपणास ज्ञात असलेल्या आर.एस.एस.च्या सर्व संघटना अस्तित्वात आल्या. आर.एस.एस.ने ह्याच दरम्यान त्यांच्या शाळांचे जाळे देशभरात पसरवले. संघाच्या शाखासुद्धा मोठ्या प्रमाणावर ह्याच दरम्यान संपूर्ण देशात पसरल्या. विश्व हिंदू परिषद सारख्या आर.एस.एस.च्या अग्रणी संघटना ह्याच काळात स्थापन झाल्या. गोळवलकरांनीच आर.एस.एस.च्या फासीवादी विचारधारेला व्यवस्थित आकार दिला आणि त्यांच्या नेतृत्वाखालीच आर.एस.एस.ची पोहोच महाराष्ट्रातील ब्राम्हण जातीच्या बाहेर गेली. गोळवलकरांच्या नेतृत्वाखालीच आर.एस.एस. एक अखिल भारतीय संघटना म्हणून उभी राहिली. ह्याच कारणांमुळे गोळवलकर आजही संघाच्या लोकांमध्ये सर्वाधिक आदरणीय मानले जातात आणि काही वर्षांपूर्वी संघवाल्यांनी त्यांची जन्मशताब्दी देशभरात साजरी केली होती.

आर.एस.एस. ने ब्रिटीशांच्या विरोधात स्वातंत्र्य आंदोलनात कुठलाही सहभाग घेतला नाही. संघ नेहमी ब्रिटीश साम्राज्यवाद्यांसोबत संगनमताचे राजकारण करण्यासाठी तयार होता. त्यांचे लक्ष्य नेहमीच मुस्लिम, कम्युनिस्ट आणि ख्रिश्चन होते. परंतु ब्रिटीश साम्राज्याला त्यांनी कधीही लक्ष्य केले नाही. 'भारत छोडो आंदोलना' दरम्यानच्या देशव्यापी उलाथापालथी मध्येही संघ निष्क्रिय राहिला. उलट संघाने ठीकठिकाणी ह्या आंदोलनावर बहिष्कार टाकला आणि ब्रिटीशांची साथ केली. श्यामाप्रसाद मुखर्जींचे बंगालमध्ये ब्रिटीशांच्या बाजूने उघडपणे बोलणे ह्याचे सर्वात मोठे उदाहरण होते. जर चुकून संघाचा माणूस ब्रिटीश सरकार कडून पकडला गेला किंवा तुरुंगात गेला तेव्हा प्रत्येक वेळी त्यांनी माफीनामे लिहून ब्रिटीश साम्राज्याप्रती स्वतःच्या निष्ठा व्यक्त केल्या आणि नेहमी निष्ठा कायम ठेवण्याचे वचननामे लिहून दिले. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयीने सुद्धा स्वतः असा माफीनामा लिहून दिलेला आहे. अशा संघवाल्यांची यादी खूप मोठी आहे जे माफीनामे लिहून लिहून ब्रिटीश तुरुंगांमधून बाहेर आले आणि ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या विरुद्ध ब्रिटीशांच्या बाजूने हेरगिरी करण्याचे नीच कृत्य केले. ब्रिटीश वसाहतवादी राज्याने सुद्धा ह्या इमानदारीचा योग्य मोबदला त्यांना दिला आणि हिंदू धर्मांध फासीवाद्यांना कधीही लक्ष्य केले नाही. आज संघाने स्वतःस कितीही राष्ट्रवादी म्हणून घेतले तरी स्वातंत्र्य संग्रामात सहभागी न झाल्याचा आणि ब्रिटिशांना सहकार्य करण्याचा कलंक संघ कधीच मिटवू शकणार नाही. इतिहासाचे पुनर्लेखन करण्याच्या संघाच्या प्रयत्नांमागचे खरे कारण हेच आहे. ते स्वतःच्याच इतिहासाला घाबरतात. त्यांना माहिती आहे की त्यांचा इतिहास हा विश्वासघात आणि पळपुटेपणाचा काळा इतिहास आहे. हिंसेवर त्यांचे प्रचंड प्रेम आहे पण तेही फक्त झुन्डीमध्ये पुरुषत्वाचे प्रदर्शन केले जाणाऱ्या हिंसेवर! ते कधीही कुठल्याही जन-आंदोलनात सहभागी झाले नाहीत आणि त्यांच्यात कुठल्याही प्रकारचे दमन झेलण्याची क्षमता नाही. नेहमी सत्तेबरोबर नाळ जोडून व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या लोकांवर हिंस्र हल्ले करणे हेच ह्यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. मग ते मुसलमान असोत, ख्रिश्चन असोत किंवा राजकीय विरोधक असोत. नीडर, शौर्यपूर्ण संघर्षांशी यांचे दूर दूर पर्यंत नाते नाही.

सुरुवातीपासूनच संघाची संपूर्ण बांधणी फासीवादी पद्धतीची राहिली आहे. प्रदीर्घ काळासाठी संघाची दारे केवळ पुरुषांसाठी उघडी होती. संघाची महिला शाखा खूप नंतर अस्तित्वात आली. संघाची अंतर्गत बांधणी हिटलर आणि मुसोलिनीच्या पक्षांच्या बांधणीशी पूर्णपणे मेळ खाते. संघाचा प्रत्येक सदस्य ही शपथ घेतो की तो सरसंघचालकांच्या प्रत्येक आज्ञेचे पालन कुठलाही प्रश्न न

पान ११ वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान १० वरून

विचारता करेल. सरसंघचालक सर्वात वर असतो, त्याच्या खाली एक सरकार्यवाह असतो ज्याची नियुक्ती सरसंघचालकच करतो. एक केंद्रीय कार्यकारी मंडळ असते ज्याची निवड स्वतः सरसंघचालक करतो. आपला उत्तराधिकारी सुद्धा सरसंघचालक स्वतःच निवडतो. म्हणजेच हे एका प्रकारचे 'कमांड स्ट्रक्चर' आहे ज्यामध्ये लोकशाहीला जागा नाही. नात्झी आणि फासीवादी पक्षाची संपूर्ण बांधणी ह्याच प्रकारची होती. नात्झी पक्षामध्ये 'फ्यूहरर'च्या नावाने आणि फासीवादी पक्षामध्ये 'ड्यूस'च्या नावाने शपथ घेतली जात असे.

हे सांगायची गरज नाही की संघाची दारे फक्त हिंदूंसाठी खुली राहिली आहेत. संघ उघडपणे हे मान्य करतो की तो हिंदूंच्या हितांची सेवा करण्यासाठी आहे. संघाने कधीही खालच्या जाती किंवा खालच्या वर्गांमधील हिंदूंसाठी काम केले नाही. संघाचा जनाधारसुद्धा कीरकोळ भांडवलदार वर्ग, नव-श्रीमंत आणि लंपट सर्वहारा वर्गामध्ये राहिला आहे. संघाच्या सामाजिक आधाराची चर्चा आपण नंतर करूयात. आर.एस.एस. ने भारतामध्ये फासीवादाची मूल्यवान आवृत्ती तयार केली आहे. त्यांचे हिटलर आणि मुसोलिनीच्या फासीवादाशी बरेच साम्य आहे आणि त्यापासून संघाने बऱ्याच गोष्टी आत्मसात केल्या. गोळवलकर लिहितात - "आज दुसरे राष्ट्र, जे सगळ्या जगाच्या कुतूहलाचा विषय ठरले आहे ते आहे जर्मनी. हा देश राष्ट्रवादाचे ज्वलंत उदाहरण आहे. आधुनिक जर्मनी कार्यमग्न आहे आणि ज्या कार्यात तिने स्वतःला झोकून दिले आहे, तो कार्यभाग तिने बऱ्याच अंशी साध्य केला आहे... पितृभूमिप्रती जर्मन लोकांचा गर्वबोध, जिच्या प्रति त्या वंशाचा परंपरागत जिव्हाळा आहे, खऱ्या राष्ट्रीयत्वाचे अनिवार्य तत्व आहे. आज ते राष्ट्रीयत्व जागृत झाले आहे, तसेच त्याने नव्याने विश्वयुद्ध सुरु करण्याची जोखीम घेत आपल्या "पूर्वजांच्या पावन भूमीत" एकत्रित, विवादरहित जर्मन साम्राज्याची स्थापण्याचा निर्धार केला आहे...." (गोळवलकर व्ही, ऑर अवर नेशनहूड डिफाइण्ड' पृ. क्र. ३४-३५)

गोळवलकरांनी ह्याच पुस्तकात ज्यूंच्या शिरकाणाचे पुरेपूर समर्थन केले आहे आणि भारताने ह्यातून काही शिकावे हे सांगताना लिहिले आहे - "... (गोळवलकर, व्ही, ऑर अवर नेशनहूड डिफाइण्ड' पृ. क्र. ३५). हिटलरचे आपल्या वंशाची आणि संस्कृतीची शुद्धता जपण्यासाठी जर्मनीने देशामधून अशुद्ध वंशाचा - ज्यूंचा संहार करून सगळ्या जगाला चकीत केले आहे. त्यांच्या वंशावरील (त्यांचा) गर्वबोध इथे सर्वोच्च रुपात व्यक्त झाला आहे. जर्मनीच्या उदाहरणावरून हेही स्पष्ट आहे की सर्व सदिच्छा असूनही ज्या वंशामध्ये आणि संस्कृतीमध्ये मुलभूत फरक असतो, त्या कधीही एकरूप होऊ शकत नाहीत. भारतामध्ये आपल्यासाठी हा एक चांगला धडा आहे." हे विचार गोळवलकर भारतावर कसे लागू करतात ते बघा "....वंश आणि संस्कृतीच्या गौरवाव्यतिरिक्त दुसरा कुठलाही विचार मनात येऊ नये, अर्थातच हिंदू राष्ट्रीय बनावे लागेल आणि हिंदू वंशामध्ये समाहित होऊन आपले स्वतंत्र अस्तित्व संपवावे लागेल. ह्या देशामध्ये, पूर्णपणे हिंदू राष्ट्राच्या सेवेमध्ये, कुठलाही स्वार्थ न ठेवता, कुठल्याही प्रकारचे विशेषाधिकार न मागता, कुठल्याही विशेष व्यवहाराची तर अपेक्षा सुद्धा नको, प्रसंगी नागरिक अधिकारांच्या शिवाय राहावे लागेल. त्यांच्या समोर ह्या शिवाय इतर कुठलाही मार्ग सोडता कामा नये. आपण एक प्राचीन राष्ट्र आहोत. आपल्या देशात राहणाऱ्या विदेशी वंशाबरोबर आपल्याला त्याच मार्गाने निपटावे लागेल ज्याप्रमाणे प्राचीन राष्ट्र विदेशी वंशांचा बंदोबस्त करत असत." (गोळवलकर, व्ही, ऑर अवर नेशनहूड डिफाइण्ड' पृ. क्र. ४७-४८). हे अगदी स्पष्ट आहे. हिटलरचे ज्युंबद्दलचे जे विचार होते तेच विचार संघाचे मुस्लिम आणि ख्रिश्चनांबद्दलचे आहेत.

संघाचे राष्ट्र कोण आहेत हिंदू, पण सगळे हिंदू नव्हे! उच्चवर्णीय पुरुष हिंदू! स्त्रियांना हिटलर आणि मुसोलिनी प्रमाणेच पुरुषांची गुलाम आणि मुलांना जन्म देणारी मशीन ह्या पेक्षा अधिक दर्जा नाही. हिंदूंमध्ये सुद्धा ते हिंदू ज्यांच्याकडे समाजातील संसाधनांची मालकी आहे. कामगार वर्गाचे काम आहे महान हिंदू राष्ट्राच्या प्रगती आणि उन्नतीसाठी प्रश्न न विचारता घाम गाळणे - १२ तास आणि कधी कधी १४-१५ तास सुद्धा! ह्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणे किंवा श्रम अधिकारांची भाषा करणे राष्ट्रद्रोही मानले जाईल. प्रत्येकाने आपापले 'कर्म' करावे, प्रश्न विचारू नये. कर्म तुमच्या जन्मावरून ठरते. तुम्ही जिथे, ज्या घरात जन्मलात त्याप्रमाणे कर्म तुम्हाला करावे लागेल. किंवा राष्ट्र, धर्म किंवा जातीचे नेते तुम्हाला जे कर्म करावयास सांगतील ते कर्म तुम्हाला करावे लागेल. ह्याचा प्रतिकार, विरोध आणि ह्यावर प्रश्न उभे करणे राष्ट्रद्रोही आहे. श्रद्धाभाव ठेवून कर्म करा. कामगारांचा धर्म हाच आहे की त्यांनी 'राष्ट्र निर्माणात' हाड-मांस गाळावे. सांगायची गरज नाही की संघ आणि भाजप ह्यांच्यासाठी राष्ट्र ह्या संकल्पनेचा अर्थ फक्त आणि फक्त भांडवलदार, दुकानदार आणि कीरकोळ व्यापाऱ्यांचा वर्ग इतका मर्यादित आहे. जेव्हा हे नफेखोर प्रगती करतात तेव्हा देशाची प्रगती होते. हिटलर आणि मुसोलिनीने त्यांच्या देशातील कामगारांच्या बाबतीत हीच भूमिका घेतली होती. ह्या देशांमध्ये फासीवादी सत्ता आल्यानंतर ट्रेड युनियन्सवर बंदी घालण्यात आली. जर्मनी आणि इटलीमध्ये ट्रेड युनियन चळवळीवर हिंसक हल्ले फासीवाद्यांनी सत्तेबाहेर असताना सुद्धा केले होते. मुंबईमधील ट्रेड युनियनच्या नेतृत्वावर, कामगारांवर आणि त्यांच्या संपांवर अशे हल्ले शिवसेनेने (जीचे फासीवादी प्रेम जगजाहीर आहे) सुद्धा केले होते. देशभरामध्ये बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेच्या गुंडांनी ठिकठिकाणी, वेळोवेळी भांडवलदारांच्या बाजूने कामगार, त्यांचे नेते आणि संप तोडण्याचे काम केले आहे. जेव्हा ते अशा प्रकारच्या हिंसक कारवाया करत नसतात तेव्हा ते कामगार वर्गाची वर्गीय एकता




तोडण्याचा भरपूर प्रयत्न करतात. उदाहरणार्थ, कामगारांच्या मध्ये अश्या संघटना उभ्या केल्या जातात ज्या कामगारांच्या दुरावस्थेला भांडवलदारांना जबाबदार धरत नाहीत. भांडवलदारांकडून भिक मागून आणि कामगारांमधून पैसे गोळा करून 'फंड पूल' बनवले जातात ज्यातून कामगारांना बेरोजगारी आणि भूक ह्यापासून वाचवण्यासाठी थोडा बहुत पैसा देतात.

बऱ्याच वेळा हे पैसे व्याजाने दिले जातात. ह्या व्यतिरिक्त धार्मिक प्रसंगी कामगारांमध्ये पूजेचे आयोजन वगैरे करणे, किर्तन आयोजित करणे - हे अशा संघटनांचे मुख्य काम असते. त्याच बरोबर कामगारांच्या डोक्यात हि गोष्ट भरवली जाते की त्यांच्या दयनीय परिस्थितीस अल्पसंख्यांक जबाबदार आहेत कारण ते त्यांच्या रोजगाराच्या संधी हिरावून घेत आहेत. फासीवादी संघटनांच्या नेत्यांच्या तोंडून नेहमी असली वाक्ये ऐकायला मिळतात - "१७ करोड मुसलमान म्हणजे १७ करोड हिंदू बेरोजगार". ह्यावरून आपोआपच फ्रांसमधील फासीवादी नेता मेरी लॉ पेन च्या वक्तव्याची आठवण येते ज्यात त्याने म्हटले होते - "दहा लाख प्रवासी घुसखोर म्हणजे १० लाख फ्रान्सीसी बेरोजगार". कामगारांमध्ये सुधारवादी कार्य करत ह्या संघी संघटना कामगारांची वर्गीय चेतना बोथट करतात. ते त्यांना हिंदू कामगार म्हणून संघटीत करण्याचे प्रयत्न करतात, आणि त्यातून हे कामगारांची वर्गीय एकता तोडतात. त्याच बरोबर 'कमेटी' उघडण्यासारखे (व्याजावर पैसे देणारी संघी संघटना जी संघी, कामगारांच्याच पैश्यातून उभी करतात, जी वर वर बघता कामगारांच्या सहकारी संस्थेसारखी भासते) उद्योग करून थोड्या वेळासाठी का होईना पण भांडवली वर्गाबरोबरचे अंतर्विरोध तीव्र होऊ देत नाहीत. संघाची अशीच एक संघटना आहे 'सेवा भारती'. त्याच बरोबर संघी ट्रेड युनियन भारतीय मजदूर संघ मुसोलिनीच्या धर्तीवरच औद्योगिक विवादांच्या सोडवणुकीसाठी 'कॉर्पोरेट' समाधान सुचवते. त्यात फासीवाद्यांच्या नेतृत्वाखाली एक संघीय कमेटी बनवली जाते ज्यात कामगार आणि भांडवलदारांचे प्रतिनिधी असतात. फासीवादी पक्ष विवादांचा निवडा करतो आणि नेहमी तो निवडा करताना भांडवलदारांच्या बाजूने झुकलेला निर्णय घेतात. किंवा हिटलर प्रमाणे कामगारांवर संपूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी वेग वेगळ्या दहशतवादी संघटना स्थापन करण्याच मार्ग आर.एस.एस. नेहमी खुला ठेवते. बजरंग दल ही अशीच आतंकवादी संघटना आहे जी संघाने राजकीय विरोध असंवैधानिक मार्गाने, हिंसेच्या माध्यमातून मोडून काढण्यासाठी स्थापन केली आहे. ही संघटना कम्युनिस्ट, उदारमतवादी, साहित्यिक ह्यांच्या बरोबरच कामगार आणि ट्रेड युनियन्सचा प्रतिरोध गुंड टोळ्यांच्या हिंसक हल्ल्यांच्या माध्यमातून संपवण्यावर विश्वास ठेवते. म्हणजेच भारतातील फासीवाद्यांनी जर्मनी आणि इटली मधील फासीवाद्यांच्या मार्गांचा सुवर्णमध्य साधला आहे.

थोडक्यात सांगायचे तर फासीवाद नेहमीच राष्ट्रवादाच्या नावाखाली भांडवलदारांची सेवा करतो. राष्ट्राचा त्यांचा अर्थ भांडवलदार वर्ग आणि उच्च मध्यम वर्ग इतकाच आहे, बाकीच्या वर्गांची स्थिती ह्या वर्गांच्या अधीनस्थ असते आणि त्यांना महान राष्ट्राची सेवा करावयाची असते हेच त्यांचे कर्तव्य आणि उत्तरदायित्व असते. प्रतिरोध करणाऱ्यांना श्दैहिक आणि दैविक त्रासातून पूर्ण मुक्ती' दिली जाते. समाजात प्रभुत्व निर्माण करण्यासाठी फासीवाद नेहमीच रस्त्यांवर जमावाकडून केल्या जाणाऱ्या हिंसेचा आधार घेतो. जर्मनी आणि इटलीमध्ये हेच झाले होते आणि भारतामध्येही संघाने हीच रणनीती अवलंबली. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल ह्या सारख्या संघाच्या अग्रणी संघटना हीच रणनीती उपयोगात आणतात. भोपाल मधील प्राध्यापक सभरवाल यांची हत्या याचेच एक उदाहरण आहे.

## भारतीय फासीवादाची कार्यपद्धती आणि त्याच्या उद्याचा इतिहास

फासीवादाने भारतामध्ये जी कार्यपद्धती उपयोगात आणली त्याचे जर्मनी आणि इटलीमधील फासीवाद्यांच्या कार्यपद्धतीबरोबर खूप साम्य आहे. जर्मनी आणि इटली प्रमाणेच आपल्याकडे सुद्धा फासीवाद्यांनी ज्या मार्गांचा उपयोग केला ते होते - रस्त्यांवर केली जाणारी जमावाची हिंसा पोलिस, नौकरशाही, सैन्य दल आणि माध्यमांचे फासीवादीकरण कायदे धाब्यावर बसवून आपल्या हिंसक कारवाया करत राहणे आणि त्यावर उदारमतवाद्यांचे मौन, सुरुवातीस अल्पसंख्यांकास हल्ल्यांचे लक्ष्य बनवणे आणि नंतर हल्ल्यांचा परीघ अधिक व्यापक बनवून सर्व राजकीय विरोधकांना हल्ल्यांचे लक्ष्य बनवणे, शाखा, शिशु-मंदिर, सांस्कृतिक केंद्र आणि धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाजामध्ये मिथकांना सामान्यज्ञान (कॉमन सेन्स) म्हणून स्थापित करणे (जसे, आज उदारमतवादी हिंदूंमध्ये सुद्धा ही धारणा दृढ आहे के मुस्लिम एका पेक्षा जास्त विवाह करतात, जास्त मुलांना जन्म देतात, धूर्त असतात, हिंदू राष्ट्र संपवू इच्छितात, खूप अस्वच्छ असतात, इत्यादी-इत्यादी. ज्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नसतो). खोटा प्रचार ही जगभरातील फासीवाद्यांची एक कॉमन रणनीती आहे. फासीवादी हल्ल्यांचे लक्ष्य संस्था-संघटना नसतात तर व्यक्ती असतात आणि भारतात सुद्धा विरोधकांना आतंकित करण्यासाठी हीच रणनीती फासीवाद्यांकडून वापरली गेली आहे. अफवांचा कौशल्याने वापर करणे हेही भारतीय फासीवाद्यांचे वैशिष्ट्य आहे. जर्मनी आणि इटली प्रमाणेच एकाच वेळी अनेक गोष्टी बोलण्याचा मार्ग भारतीय फासीवाद्यांनी पुरेपूर उपयोगात आणला आहे. त्यांचा एक मुखवटा सौम्य,तर एक उग्र असतो,एक मध्यममार्गी असतो आणि जेव्हा ज्या मुखोट्याची गरज पडते तो मुखोटा समोर केला जातो.

पान १२ वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ११ वरून

भारतामध्ये सुद्धा संघाचे स्थायी असे संविधान राहिलेले नाही. जेव्हा जे गरजेचे असेल तशी चाल-चेहरा-चरित्र स्वीकारण्यास ते तयार असतात. कारण सगळे फासीवादी संधिसाधू असतात आणि तात्कालिक राजकीय हितांसाठी ते कुठल्याही थराला जाऊ शकतात.

ही संघी फासीवाद्यांची सर्वसाधारण कार्यपद्धती राहिली आहे. ह्या सगळ्या पद्धती अधिकांश संघ स्वयंसेवकांनी त्यांच्या जर्मन आणि इटालिअन पूर्वजांकडून आत्मसात केल्या आहेत. ह्या कार्यपद्धतीच्या माध्यमातून भारतीय फासीवाद्यांनी समाजामध्ये स्वतःची मूळे रुजवली.

स्वातंत्र्यपूर्व काळात १८९० व १९०० च्या दशकात हिंदू आणि मुस्लिम पुनरुत्थानवाद्यांच्या कारवायांमुळे हिंदू-मुस्लिम तणाव तयार झाले होते. परंतु त्या काळात राष्ट्रवादी नेत्यांकडून केल्या गेलेल्या प्रयत्नांमुळे हे तणाव तीव्र झाले नाहीत. १९१० च्या दशकामध्ये सुद्धा असे तणाव तयार झाले पण १९१६चा 'लखनौ करार', 'खिलाफत चळवळ' आणि 'असहयोग आंदोलना'च्या एकत्र येण्यामुळे हिंदू-मुस्लिमांमध्ये सौहार्दपूर्ण स्थिती होती. ते ब्रिटीश वसाहतवाद्यांना सामाईक शत्रू म्हणून बघत होते. ह्या दरम्यान सुद्धा 'हिंदू महासभा' नामक एक सांप्रदायिक संघटना अस्तित्वात होती. परंतु राष्ट्रवादी आंदोलनाने तयार केलेली सांप्रदायिक एकता असहयोग आंदोलनापूर्वी पर्यंत पूर्णपणे भंगली नव्हती. परंतु त्यात चरे जाण्यास सुरुवात झाली होती. असहयोग आंदोलन अचानक रद्द झाल्यानंतर ही एकता भंगण्यास सुरुवात झाली. हाच तो कालखंड आहे ज्या वेळी देशाच्या विविध भागांमध्ये हिंदू पुनरुत्थानवाद्यांचा प्रभाव वाढण्यास सुरुवात झाली होती. सावरकर बंधूंचा हाच काळ आहे. जवळपास हाच तो कालखंड आहे त्यावेळी बंकीम चंद्र यांची 'आनंदमठ' प्रकाशित झाली आणि राष्ट्रवादाच्या स्वरूपाबद्दल सबंध देशभरात चर्चा सुरु झाली. त्यात एक प्रवाह काँग्रेस मधील राष्ट्रवाद्यांचा होता जो भांडवलदारांच्या नेतृत्वाखाली सर्वसाधारण जनतेला साम्राज्यवाद विरोधी लढ्यात सोबत घेण्याच्या मताचा होता. हा एक तडजोडवादी प्रवाह होता. हा प्रवाह सेक्युलर तर होता पण त्याचा सेक्युलरीजम स्वतः हिंदू पुनरुत्थानवादाकडे झुकलेला होता. जे काँग्रेसी नेतृत्व पुनरुत्थानवादी नव्हते त्यांचा सेक्युलरीजम पुंसत्वहीन होता आणि सांप्रदायिक कट्टरतेविरुद्ध कधीच लढू शकत नव्हता. दुसरा प्रवाह, कम्युनिस्टांनी स्वीकारलेल्या साम्राज्यवाद विरोधाचा होता. त्यांनी निरंतर जनतेला एकजूट करून संघर्ष केला परंतु बहुतांश रणनीती विषयक आणि कुटनितिक मुद्द्यांवरती स्पष्टता नसल्या कारणाने सबंध स्वातंत्र्य आंदोलनात त्यांच्या कडून विविध चुका झाल्या, ज्यामुळे ते कधीही आंदोलनाचे नेतृत्व स्वतःच्या हाती घेऊ शकले नाहीत. तिसरा प्रवाह होता, हिंदू सांप्रदायिकतावाद्यांचा - ज्यांनी त्यांच्या फासीवादी विचारधारेला हिंदू राष्ट्रवादाच्या बुरख्यात सादर केले. ते कीती राष्ट्रवादी होते हे तर आपण बघितलेच आहे. ह्यांचे खरे ध्येय फासीवादच होते ज्याला राष्ट्रवादाच्या बुरख्या आड लपवण्यात आले होते.

१९२५ मध्ये आर.एस.एस. ची स्थापना होई पर्यंत काँग्रेसी राष्ट्रवादी सांप्रदायिक सौहार्द कायम राखण्याची इच्छा आणि धैर्य दोन्ही गमावू लागले होते. ब्रिटीश साम्राज्यावाद्यांनी हिंदू आणि मुस्लिम कट्टरपंथ्यांना आपापसात लढवण्याचे प्रयत्न सुरुवातीपासूनच केले होते. बरेच इतिहासकार तर असेही मानतात की भारतामधील हिंदू मुस्लिम कट्टरता ब्रिटीशांनीच निर्माण केली. ब्रिटीश येण्यापूर्वी कुठल्याही धार्मिक दंगलीचे पुरावे मिळत नाहीत. हि धार्मिक कट्टरता ब्रिटीश आणि पुनरुत्थानवाद्यांच्या सामुहिक प्रयत्नातून निर्माण झाली होती. बंगालचे विभाजन करण्यामागचा ब्रिटीशांचा हेतू हाच होता. कुठे ते हिंदू फासीवाद्यांचे समर्थन करायचे तर कुठे मुस्लिम कट्टरपंथीयांचे समर्थन करायचे. ब्रिटिशांनी जनगणनेचा उपयोगही धार्मिक तेढ वाढवण्यासाठी पुरेपूर केला. कम्युनिस्टांनी ह्या प्रयत्नांचा विरोध केला परंतु फासीवाद्यांविरुद्ध लढण्याची कुठलीही सुसंगत रणनीती नसल्यामुळे त्यांचा विरोध यशस्वी होऊ शकला नाही.

धर्मांधतेचा प्रभावी विरोध आणि नायनाट करू न शकल्याचा परिणाम म्हणून १९२५ मध्ये संघाच्या स्थापनेनंतरच्या १५ वर्षातच संघाची सदस्य संख्या १ लाखाच्या वरती पोहोचली होती. ह्या वेळपर्यंत संघ हिंदू पुनरुत्थानवादी आणि कट्टरपंथी भूमिकेत होता आणि त्या भूमिकेचा प्रचार करत होता. प्रामुख्याने मुस्लिम त्यांच्या निशाण्यावर होते. वसाहतवादी सत्तेचा विरोध करणे संघाने कधीच आपले कर्तव्य मानले नाही आणि नेहमीच ब्रिटीशांशी इमानदार राहिला. परंतु हिंदू राष्ट्रवादाची भूमिका घेण्यास त्याने सुरुवात केली होती. त्यांच्या प्रचारामध्ये प्राचीन भारतातील 'हिंदू गौरवाचे' गुणगान असे. त्यावेळी फासीवादी विचार लागू करण्यासाठी संघ प्रशिक्षित होऊ पाहत होता. १९३०च्या दशकाच्या अखेरीस गोळवलकरांच्या नेतृत्वाखाली संघाने आधुनिक फासीवाद आणि कार्यपद्धती भारतीय संदर्भात लागू करण्यास सुरुवात केली होती. संघ शाखांचे विशाल जाळे देशभरात पसरवण्यास सुरुवात झाली होती. स्वातंत्र्य आंदोलनातील लाजिरवाणे योगदान संघाने स्वातंत्र्यानंतर खोटा प्रचार करून झाकण्यास सुरुवात केली होती. हे काम संघ आजही करत आहे कारण संघाच्या नेतृत्वाच्या ऐतिहासिक विश्वासघाताचे कागदोपत्री पुरावे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत – उदाहरणार्थ; माफीनामे, हेरगिरी आणि निष्ठेची वचनपत्रे इत्यादी - जे संघी फासीवाद्यांनी ब्रिटिशांशी केले होते.

स्वातंत्र्यानंतर सत्ता काँग्रेसच्या हातात आली. नेहरू पंतप्रधान झाले. गोळवलकर ह्यामुळे खूप निराश झाले आणि त्यांनी ह्याला मुस्लिमांकडून झालेला पराभव मानले. त्यानंतर संघाने आपल्या बहुतांश संघटनांची स्थापना करण्यास सुरुवात केली ज्यात विश्व हिंदू परिषद प्रमुख होती. त्यानंतर बजरंग दल, वनवासी कल्याण परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, दुर्गा वाहिनी ह्या सारख्या संघटनांची स्थापना केली. ह्या संघटनांच्या माध्यमातून संघाने देशाच्या प्रत्येक भागात आणि प्रत्येक सामाजिक स्तरामध्ये पाय रोवण्यास सुरुवात केली. १९८० पर्यंत संघ देशातील सर्वात मोठी संघटना बनला होता. भाजप सत्तेमध्ये येवो किंवा न येवो, भांडवली व्यवस्थेच्या अस्तित्वामुळे संघी फासीवाद धोक्याच्या रुपात कायम राहील. अर्थशास्त्रज्ञ मायकल कालेलीने सत्तेच्या बाहेरील फासीवादाला साखळीने बांधलेल्या कुत्र्याची उपमा दिली होती. ही उपमा भारतात तंतोतंत लागू होते. जर हा कुत्रा साखळीमध्ये न बांधता खुला सोडला तर काय होते ते जर्मनी आणि इटली मध्ये दिसून आले. परंतु साखळीमध्ये बांधले गेल्यामुळे होणाऱ्या चिडचिडीमधून हा कुत्रा बरेच कृष्णकृत्य करू शकतो हे भारताच्या इतिहासावरून दिसून येते.

भारतातील संघी फासीवादाच्या अभूतपूर्व विस्ताराचे कारण काय होते भारतामध्ये फासीवादासाठी अनुकूल परिस्थिती होती का ? कोण-कोणते वर्ग फासीवादाचा आधार बनले ? हे समजून घेणे फासीवादाविरुद्ध लढण्यासाठीची रणनीती बनवण्यासाठी सर्वात महत्वाचे आहे. **त्यावर आपण पुढील अंकात चर्चा करू.**

# पुन्हा एकदा नफ्याच्या लालसेने खाण कामगारांचा घेतला जीव

पान ८ वरून

कामगारांवर होणारा खर्च कमी केला जावा आणि कामगारांच्या जीवनाची संपूर्ण जबाबदारी कंपनीची न राहता ठेकेदाराची बनते अशा प्रकारे जास्तीत-जास्त नफा कमवला जातो. नफ्याच्या अंधाधुंद स्पर्धेमध्ये ठेकेदार कामगारांना केवळ नाममात्र मजुरी देतो की ज्याच्यामुळे तो जीवित राहून पुढच्या दिवसी पून्हा मजुरी करण्यासाठी उपस्थित होऊ शकतो आणि त्यांच्या आरोग्य व सुरक्षेला पूर्णतः नजरेआड करतो. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये भांडवलदार वर्गाकडून कामगारांचे श्रम शोषण चालू असते म्हणून कामगारामध्ये युनियन बनवून आपल्या हक्कांची मागणी करण्याचा धोका मोठ्या भांडवलदारांना सत्वत असतो. आऊटसोर्सिंग किंवा ठेकेदारी च्या कारणामुळे कामगारांशी मोठ्या कंपनी चा सरळ कसला ही संपर्क होत नाही आणि कामगार ठेकेदारकडे काम करणारा असंगठीत कामगार बनून जातो. आऊटसोर्सिंग नियोजनामुळे मालक आणि ठेकेदारांना कामगारांच्या शोषणास अनिर्बंध अडविण्यापासून सूट मिळते. या कारणांमुळे ठेकेदारांची खाजगी कंपनी असंगठीत कामगारांना एक साधारण मजुरी च्या व्यतिरिक्त कसलीच सुविधा दिली जात नाही तसेच त्यांना संगठन बनविण्याची भणक लागतात किंवा आपल्या हक्कांसाठी आवाज उठविल्यावर त्या असंगठीत कामगारा विरुद्ध सरळ हायर अँड फायर (वाटेल तेव्हा ठेवले वाटेल तेव्हा काढणे) नियोजनाचा प्रयोग करून त्यांची हकालपट्टी केली जाते. जगभरामध्ये भांडवलदारांनी कामगार संगठन न बनवू देण्यासाठी किंवा त्यांची शक्तीला निष्प्रभावी करण्यासाठी ठेकेदारीला एक नियोजित नियोजनाच्या रूपात स्वीकारले आहे. गेल्या अडीच दशकामध्ये नव-उदरवादी आर्थिक नियोजनांच्या अंतर्गत आऊटसोर्सिंग व ठेकेदारी सारख्या पद्धती स्वीकारल्यामुळे संघटित कामगारांची संख्या कमी होत राहिली आहे आणि असंघटित कामगारांची संख्या वाढत गेली. या असंघटित कामगारांसाठी कसल्या ही सेवा व अटी नसतात, श्रम कायदे ही लागू होत नाहीत आणि सामाजिक सुरक्षा देण्यासाठी सरकार छळ करत होती ते ही आत थोडे-थोडे करून संपविण्यात येत आहेत. ठेक्यावर ठेवलेल्या कामगारांना समान कामासाठी समान वेतन पण दिले जात नाही आणि काही कामगारांना किमान मजुरी ही दिली जात नाही. ठेक्यावर ठेवलेल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना वयाच्या ४० व्या वर्षी कामावरून हकालपट्टी केली जाते आणि त्यांना निरुपयोगी व्यक्ति घोषित केले जाते कारण त्यांना अन्य कोणत्या ठिकाणी कामावर घेतले जाऊ नये.

स्पष्ट दिसून येते की लालमटिया सारख्या अपघात सलग घडणे ह्या नफ्यावर आधारित व्यवस्थेची देन आहे,ज्यात नफ्यासमोर माणसाच्या जिवाची कसली ही किंमत नसते. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये कामगारांना उत्पादांनाच्या क्षेत्रात मात्र उपकरण समझले जाते. एखादे उपकरण बिघडले असता ते तुरंत बदलले जाते तसे एक कामगार मरण पावतो त्याच्या दुसऱ्या दिवसी त्याची जागा घेण्यासाठी बेरोजगारीच्या संकटात सापडलेला दूसरा कामगार हजर राहतो. दुर्घटने नंतर प्रशासन आणि सरकार द्वारा भरपाई ची घोषणा केली जाते आणि काही दिखावटी निर्णय घेतले जातात परंतु नफा कमविण्याचा उद्देश्य सर्वोपरि असल्यामुळे अशी दुर्घटना होण्याची संभावना टिकून असतेच. निश्चितच या व्यवस्थेच्या परिघात काम करणाऱ्या मजुरांच्या कार्यस्थळी सुरक्षेसंबंधी मागण्याना पूर्ण ताकदीनिशी समोर आणले पाहिजे परंतु कामगारानी ह्या भ्रमात राहू नये की अशा मागण्या पूर्ण झाल्याने भविष्यात लालमाटीया सारख्या अपघातांना आळा बसेलच. नफ्यावर अवलंबित या व्यवस्थेला मुळासकट उखडून टाकूनच अश्या घटनांना आळा घातला जाऊ शकतो. जे कामगार जमीनीतून कोळसा काढण्यासाठी आपला जीव जोखमीत टाकून ३०० फूट खोल खाण खोदून अमानवीय परिस्थितीत दिवस-रात्र काम करू शकतात ते मानवतेला ओझं बनलेल्या या घृणित व्यवस्थेचे सरण रचून तिला बेचिराख ही करू शकतात. गरज आहे ती केवळ जमिनीच्या खाली खदाणीत काम करणाऱ्या आणि जमिनीवर काम करणाऱ्या औद्योगिक व कृषी कामगारांच्या वर्ग आधारित अतूट एकजूटतेची.

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**

www.marathi.mazdoorbigul.net

**फेसबुक पेज**

www.facebook.com/kamgarbigul

# विधानसभा निवडणूक निकाल – फासिस्ट शक्तींची सत्तेवर वाढती पकड

पान १ वरून

जातीय ध्रुवीकरणाच्या राजकारणालासुद्धा नवसंजीवनी देणार आहे. आणि एकूण देश पुन्हा एकदा मंडल-कमंडलच्या राजकारणाच्या भोवऱ्यात सापडणार आहे. उत्तर प्रदेश निवडणूकांमध्ये या प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. जागतिक भांडवली व्यवस्थेसमोर असलेले संकट जगभरात फासिस्ट शक्ती किंवा फासिस्ट प्रवृत्तींच्या शासकांना बळकट करते आहे. अमेरिकेमध्ये ट्रम्प यांचा विजय, ग्रीस, फ्रान्स, इटली, जर्मनी इत्यादी देशांमध्ये फासिस्ट- अर्धफासिस्ट शक्तींचे वाढणारे बळ ही काही आश्चर्याची बाब नाही. भारतात भांडवली लोकशाही आरंभापासूनच अपुरी आणि विकलांग राहिलेली आहे. फासिस्ट शक्ती सुरुवातीपासूनच येथे समाज आणि राज्यव्यवस्थेच्या रचनेमध्ये उपस्थित राहिलेल्या आहेत. वेगवेगळ्या काळांमध्ये भांडवली संकट वाढण्याबरोबरच त्यांची शक्ती वाढलेली आहे. गेल्या अडीच-तीन दशकांमध्ये व्यवस्थेचे संकट एक संरचनागत संकट बनण्याबरोबरच त्यांचे बळ वाढत गेले आहे. रामजन्मभूमीचे कुलूप उघडणे आणि बाबरी मशिदीच्या ध्वंसापासून सुरू झालेल्या प्रक्रियेची तार्किक परिणती २००२ च्या गुजरात दंगलीमध्ये झाली. ही प्रक्रिया सतत सुरू आहे. संघ परिवार सत्तेत असो अथवा नसो, त्याच्या संघटना सुनियोजित पद्धतीने समाजामध्ये असत्य आणि द्वेषाचे विष पसरवीत असतात. मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांची ताकद वाढली आहे. मोठ्या कार्पोरेट घराण्यांशी साटेलोटे असल्यामुळे त्यांनी मिडियाला आपल्या प्रचाराचा भोंगा बनवले आहे, आणि वादळी प्रचाराद्वारे लोकांमध्ये एक खोटी जाणीव पेरण्यात ते यशस्वी झाले आहेत. हिटलरचा प्रचारमंत्री गोबेल्स म्हणत असे, एक असत्य शंभर वेळा उच्च स्वरात सांगितले की ते सत्य होऊन जाते. आज त्यांच्याकडे या कामासाठी पूर्वीपेक्षा अधिक उन्नत उपकरणे उपलब्ध आहेत. वारंवार वेगवेगळ्या प्रकारे खोटे तर्क आणि लोकरंजक घोषणा लोकांच्या मनामध्ये खोलवर पेरण्यात येतात. सामान्य कष्टकरी माणसाचे हालहाल करणाऱ्या नोटबंदीसारख्या विषयावर सुद्धा त्यांनी लोकांना हे पटवून देण्यात यश मिळवले आहे की आता तात्पुरते नुकसान होत असले तरी खरे नुकसान श्रीमंतांचे होत आहे आणि पुढे जाऊन सामान्य माणसाचा त्यातून फायदाच होणार आहे.


लोकांना चकवण्यासाठी भाजप आर्थिक बाबतींतसुद्धा काही लोकरंजक पाउले उचलू शकते. परंतु येत्या काळात संकट अधिक तीव्र होत जाणार आहे, हे निश्चित आहे. जनतेवर कोसळणारे महागाई आणि बेरोजगारीचे तडाखे ह्यांना अडवता येणार नाहीत. अशा परिस्थितीत, कधी राम मंदिर, कधी आंतरिक दहशतवाद, कधी सीमेपलिकडील तणावाची स्थिती, अंधराष्ट्रवादाचा कैफ निर्माण करण्यासारख्या चलाख्या त्यांच्या कामी येणार आहेत. धार्मिक अल्पसंख्यकांना वेगवेगळ्या प्रकारे निशाणा बनवून जनसमुदायाच्या एका मोठ्या हिश्श्याला दुय्यम नागरिक असल्यासारख्या अवस्थेत ढकलून दिले जाणार आहे. मुसलमानांचा मताधिकार हिसकावून घेऊन त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनवले जाईल, अशा अर्थाची विधाने योगी आदित्यनाथांच्या मंचावरून याआधीसुद्धा झालेली आहेत. दलित, स्त्रिया आणि वेगवेगळ्या वंचित गटांवर होणारे अत्याचार आणखी वाढेल. गुजरातमध्ये २००२ च्या नरसंहारानंतर अजून दंगे झालेले नाहीत कारण त्याची गरज भासली नाही. तेथे अल्पसंख्यकांना दडपून, त्यांच्यावर दहशत बसवून, त्यांना परिघावर ढकलून त्यांची अवस्था दुय्यम दर्जाची बनवण्यात आली आहे. हेच गुजरात मॉडेल आता उत्तर प्रदेशमध्ये लागू करण्याचे प्रयत्न केले जातील. संघ परिवाराच्या विचारधारेमध्ये दलित आणि स्त्रियांच्या विरोधात ज्या प्रकारचे विष भरलेले आहे त्याचे प्रदर्शन वेळोवेळी पाहायला मिळालेले आहे. येणारा काळ खरोखरच गंभीर असणार आहे. लोकशाही अधिकारांवर हल्ले वाढणार आहेत, आणि सामान्य जनतेसाठी आवाज उठवणाऱ्यांना तऱ्हेतऱ्हेने बदनाम करण्याचे आणि निशाणा बनवण्याचे प्रकार वाढणार आहेत. फासीवादी लाटेसाठी त्या पथभ्रष्टवाद्यांना, संसदमार्गी नकली कम्युनिस्टांना आणि सामाजिक लोकशाहीवाद्यांना इतिहास कधीच माफ करणार नाही, ज्यांनी गेल्या कित्येक दशकांमध्ये फक्त आर्थिक संघर्ष आणि संसदीय भ्रमांमध्ये अडकवून कामगार वर्गाची वर्गजाणीव बोथट करण्याचेच काम केले आहे. हे दुरुस्तीवादी फासीवाद विरोधी संघर्ष म्हणजे फक्त निवडणूकांतील जय-पराजय, असेच दाखवण्याचा प्रयत्न करतात किंवा फार फार तर रस्त्यावर काही प्रतिकात्मक विरोध प्रदर्शनांपर्यंत स्वतःला मर्यादित करून ठेवतात. भूतकाळातसुद्धा यांच्या सामाजिक लोकशाहीवादी, काउत्स्कीपंथी पूर्वजांनी हेच महापातक केले होते. खरे तर हे दुरुस्तीवादी आज फासीवादाला झुंजार आणि प्रभावी विरोध करूच शकत नाहीत, कारण ते मानवी चेहरा असणाऱ्या नवउदारवादाचा किंवा किन्सियन उपायांच्या कल्याणकारी राज्याचाच पर्याय समोर ठेवत असतात. आज भांडवली संरचनेमध्ये अशा पर्यायाची शक्यता अगदीच कमी प्रमाणात शिल्लक असल्यामुळे भांडवलशाहीच्या दृष्टीनेसुद्धा हे दुरुस्तीवादी बऱ्याच प्रमाणात अप्रासंगिक ठरले आहेत. आता त्यांची एकच भूमिका शिल्लक राहिलेली आहे – कामगार वर्गाला अर्थवाद आणि संसदवादाच्या चौकटीत बंदिस्त करून त्यांची वर्गजाणीव बोथट करीत राहायचे, आणि हे काम ते करत राहतील. जेव्हा फासीवादी दहशतीचा परमोत्कर्ष होईल तेव्हा हे दुरुस्तीवादी मूग गिळून गप्प राहतील. भूतकाळातसुद्धा बाबरी मशीद पाडली जाण्याच्या मागेपुढे पसरलेल्या उन्मादाचा प्रश्न असेल किंवा गुजरातमध्ये काही आठवडे सुरू राहिलेल्या नरसंहाराचा, ह्यांनी फक्त शब्दांच्या तलवारी चालवायचे काम केले आणि टीव्ही आणि वर्तमानपत्रांमध्ये शब्दांचे बुडबुडे फोडत राहीले. फासीवादी टोळ्यांशी आणि लंपटांशी समोरासमोरची लढाई लढण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची ना ह्यांची छाती आहे, ना ह्यांची तेवढी लायकी राहिलेली आहे. ह्यांच्याप्रमाणेच बोरूबहाद्दूरी गाजवणारे आणि सोशल मिडियावर क्रांती करणाऱ्या नकली डाव्या बुद्धिजीवींपैकी कित्येक जण तर स्वतःला घरांमध्ये कोंडूनसुद्धा घेणार आहेत. येत्या काळात काही डाव्या विचारवंतांनी बाजू बदलली तर आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. भांडवली संकटाला जर समाजवादी पर्याय मिळाला नाही तर फासीवादी पर्याय समोर येतो. हे इतिहासाने पूर्वीसुद्धा वारंवार सिद्ध केले आहे. फासीवाद प्रत्येक प्रश्नावर झटपट उपायांच्या लोकरंजक घोषणांबरोबरच मध्यमवर्ग, लहान व्यापारी, पांढरपेशा कर्मचारी, लहान उद्योजक आणि मालक शेतकऱ्यांना भुरळ पाडतो. उत्पादन प्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेलेल्या कामगार समुदायाचा एक मोठा हिस्सासुद्धा फासीवादाच्या झेंड्याखाली मोर्चाबंद होतो, कारण त्यांच्यापाशी वर्गजाणीव नसते आणि त्यांच्या जगण्याच्या परिस्थितीने त्यांचे लंपटीकरण केलेले असते. निम्न मध्यमवर्गातील बेरोजगार तरुण आणि भांडवलाचे तडाखे खाणाऱ्या कामगारांचा एक हिस्सासुद्धा अंदाधुंद प्रचारामुळे मोदीसारख्या नेत्यांनी दाखवलेल्या स्वप्नांना भुलतो. जेव्हा कोणतेही सर्वहारा नेतृत्व त्यांच्या लोकरंजक घोषणांचा बुरखा फाडून खराखुरा पर्याय त्यांच्या समोर ठेवण्यासाठी तयार नसतो तेव्हा फासीवाद्यांचे काम आणखीनच सोपे होते. आरएसएस सारख्या संघटनांनी दीर्घ काळापासून केलेल्या प्रचाराची त्यांना मदत होते. संघाच्या प्रचारतंत्राचा प्रभाव कामगार वस्त्यांपर्यंत आहे, हे विसरून चालणार नाही. संघाचे विडियो आणि ऑडियो टेप कामगारांच्या मोबाइल फोनमध्ये पोहोचलेले आहेत. कित्येक ठिकाणी गरीब कॉलनींमध्ये आणि कामगार वस्त्यांमध्येसुद्धा संघाच्या शाखा सुरू झालेल्या आहेत. फासीवाद म्हणजे निम्न भांडवली वर्गाचे अत्यंत प्रतिक्रियावादी आंदोलन असते, व त्याच्यापाशी एक सामाजिक आधार आणि कार्यकर्त्यांची एक फळीसुद्धा असते. त्याला प्रत्युत्तर शांतता आणि समरसतेच्या गोड घोषणांनी देता येत नाही, तर कामगार वर्गाच्या आणि तरुणांच्या झुंजार तुकड्यांद्वारेच दिले जाऊ शकते. या प्रतिक्रियावादी सामाजिक चळवळीच्या विरोधात एक झुंजार प्रगतिशील चळवळ उभारूनच तिचा सामना केला जाऊ शकतो. क्रांतिकारी डाव्या चळवळीची शक्ती आज विखुरलेली आहे. एक हिस्सा पोथीनिष्ठा, अतिरेकी मार्ग आणि दुस्साहसवादाला बळी पडला आहे, आणि एक हिस्सा वास्तवाकडे उघड्या डोळ्यांनी पाहायचे नाकारून संधीसाधूपणा आणि विखुरलेपणाने ग्रस्त आहे. ज्या काही शक्ती खरोखर विचार करीत आहेत त्यांनी आपले बळ कमी आहे की जास्त आहे, याबद्दल विचार करून चालणार नाही तर आपल्या कर्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतःला या कामात झोकून दिले पाहिजे. त्यांनी कामगारांमध्ये आर्थिक, वैचारिक, सांस्कृतिक काम पुढे नेत कामगारांच्या झुंजार तुकड्या तयार करण्याची सुरुवात केली पाहिजे. त्याचबरोबर मध्यम वर्गाची जी माणसे घरात लपून बसणारी सेक्युलर नाहीत, त्यांनासुद्धा सोबत घेतले पाहिजे.

धार्मिक तणाव आणि अंधराष्ट्रवादी लाटेसारख्या परिस्थितीत राज्यसत्तेला निरंकुश आणि स्वेच्छाचारी होऊ देणे सोपे होणार आहे आणि जनतेच्या उरल्यासुरल्या अधिकारांनासुद्धा काही अर्थ राहणार नाही. संरक्षणाच्या तयारीच्या नावाखाली जनतेला महागाई सहन करण्याचे आवाहन केले जाईल आणि जनता पोटाला चिमटा घेऊन देशभक्तीचे मोल चुकवणार आहे.

नवउदारवादाच्या या काळामध्ये भांडवली व्यवस्थेचे संकट जसजसे तीव्र होते आहे, तसतसे जगभरात फासीवादी उभाराचा एक नवा टप्पा दिसू लागला आहे. ग्रीस, स्पेन, इटली, फ्रान्स आणि उक्रेन सारख्या युरोपच्या देशांमध्ये फासिस्ट स्वरूपाच्या घोर उजव्या पक्षांची ताकद वाढते आहे. अमेरिकेमध्ये 'टी-पार्टी'सारख्या घोर उजव्या शक्तींचा प्रभाव वाढतो आहे. नव नाझी गटांचे धुमशान तर इंग्लंड, जर्मनी, नार्वे यांसारख्या देशांमध्ये वाढते आहे. टर्की, इंडोनेशिया यासारख्या देशांमध्ये अगोदरच निरंकुश सत्ता स्थापन झालेल्या आहेत. ज्या भांडवलदारांच्या हितासाठी जनतेचे कठोरपणे दमन करीत आहेत. अलीकडच्या वर्षांमध्ये कित्येक ठिकाणी अशा शक्ती थेट किंवा एखाद्या भांडवली पक्षाच्या सोबत सत्तेत आल्या आहेत. जेथे त्या सत्तेत पोहोचलेल्या नाहीत तेथेसुद्धा भांडवली लोकशाही आणि फासीवादामधली विभाजक रेषा धूसर होत चालली आहे आणि रस्त्यावर फासीवादी धुमशान वाढते आहे.

भाजप सत्तेत असो वा नसो, भारतात सत्तेचे निरंकुश आणि दमनकारी होणे स्वाभाविक आहे, हे आम्ही अगोदरसुद्धा लिहिलेले आहे. रस्त्यावर फासीवादी धिंगाणा वाढत जाणार आहे. फासीवाद विरोधी संघर्षाचे ध्येय फक्त भाजपला सत्तेत येण्यापासून रोखणे एवढेच असू शकत नाही. इतिहासाने आजवर हेच दाखवून दिले आहे की फासीवाद विरोधी निर्णायक लढाई रस्त्यावरच होईल आणि कामगार वर्गाला क्रांतिकारी पद्धतीने संघटित केल्याशिवाय, संसदेत आणि निवडणूकांच्या माध्यमातून फासीवादावर मात केली जाऊ शकत नाही. फासीवाद विरोधी संघर्षास भांडवलशाही विरोधी संघर्षापासून वेगळे करून पाहता येऊ शकत नाही. भांडवलशाहीशिवाय फासीवादाचा विचार केला जाऊ शकत नाही. फासीवाद विरोधी संघर्ष एक दीर्घ संघर्ष आहे आणि त्याच दृष्टीकोणातून त्यासाठीची तयारी केली पाहिजे. आज जेव्हा फासिस्ट सत्तेवर आपली पकड मजबूत करीत आहेत, तेव्हा स्वाभाविकपणे एक तात्कालिक आव्हान उभे राहिले आहे. आपण त्यासाठी सुद्धा तयार राहिले पाहिजे. फासिस्ट वातावरणामध्ये क्रांतिकारी शक्तींच्या प्रचाराच्या आणि संघटनाच्या कामांसाठी मिळणारा लोकशाही अवकाश संकुचित होणार आहे. परंतु याचीच दुसरी बाजू म्हणजे नवउदारवादी धोरणे जोरकसपणे आणि वेगाने लागू केल्यामुळे तसेच प्रत्येक प्रतिरोध चिरडून टाकण्याच्या प्रयत्नांमुळे भांडवली संरचनेचे सगळे अंतर्विरोध जास्तीत जास्त उग्र होत जातील. कामगार वर्ग आणि एकूण कष्टकरी जनता कणाहीन गुलामांसारखी सारे काही सोसत राहणार नाही. शेवटी ती रस्त्यांवर उतरणार आहे. व्यापक कामगार उभारांसाठी भूमी तयार होईल. जर त्यांना नेतृत्त्व देणाऱ्या क्रांतिकारी शक्ती तयार असतील आणि धडाडीने त्यांच्या आंदोलनांमध्ये सहभागी होऊन नेतृत्त्व आपल्या हातात घेतील तर क्रांतिकारी संकटाच्या त्या परिस्थितीचा चांगल्यात चांगला उपयोग करून संघर्ष व्यापक बनवण्याचे आणि त्याला योग्य दिशा देण्याचे काम केले जाऊ शकते. आपल्या देशामध्ये आणि जगभरात भांडवली लोकशाहीचे पतन आणि नव फासीवादी शक्तींचा उभार दूरगामी पातळीवर नव्या क्रांतिकारी शक्यतांच्या स्फोटांच्या दिशेनेसुद्धा संकेत मिळतो आहे. येणारा काळ कष्टकरी जनता आणि क्रांतिकारी शक्तींसाठी कठीण आणि आव्हानांनी भरलेला आहे. आपल्याला फक्त राज्यसत्तेच्या दमनाचाच नव्हे तर रस्त्यावर फासीवादी गुंडांच्या टोळ्यांचासुद्धा सामना करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. मार्ग एकच आहे. आपण अगदी प्राथमिक जमिनीवर कामगार समुदायाला झुंजार युनियन बनवून संघटित करण्याबरोबरच त्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या संघटना, मंच, झुंजार स्वयंसेवक तुकड्या वगैरे तयार केल्या पाहिजेत. आज ज्या काही डाव्या लोकशाही शक्ती खरोखरच फासीवादी आव्हानाला तोंड देण्याची हिंमत आणि क्षमता बाळगून आहेत, त्यांनी लहानसहान मतभेद बाजूला सारून एक झाले पाहिजे. इतिहासात कामगार वर्गाच्या पोलादी मुष्टीने नेहमीच फासीवादाच्या ठिकऱ्या उडवलेल्या आहेत, येणारा काळसुद्धा त्याला अपवाद असणार नाही, हे आपण विसरता कामा नये. आपण आपल्या भरपूर शक्तीसह त्याच्या तयारीला लागलं पाहिजे.

२०१९ मध्ये भाजपचा पराभव होण्याच्या इच्छेत जगणे किंवा प्रार्थना करीत बसणे आत्मघातकी ठरणार आहे. खरे तर, फासिस्ट सत्तेत राहोत किंवा ना राहोत, त्यांचे धुमशान सुरूच राहणार आहे. भारतीय भांडवलदार वर्ग साखळीत बांधलेल्या शिकारी कुत्र्याप्रमाणे जनतेला घाबरवण्यासाठी आणि तिला काबूत ठेवण्यासाठी, कष्टकऱ्यांच्या आणि क्रांतीच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या सर्व वर्गांची एकता मोडून काढण्यासाठी आणि त्यांची जाणीव भ्रष्ट करण्यासाठी फासीवादाचा वापर करीतच राहणार आहे. विचार करण्याची खरीखुरी क्रांतिकारी पद्धत म्हणजे वास्तव ओळखणे आणि त्याला तोंड देण्याची तयारी करणे. खोट्या आशेला पर्याय म्हणू नका. पर्यायाला क्रांतिकारी मार्ग कठीण आहे, परंतु त्या मार्गावर चालण्याखेरीज दुसरा कोणताही मार्ग नाही. **इतिहासाने हे सत्य पुनःपुन्हा सिद्ध केले आहे की जनतेचे अग्रदूत जेव्हा शोषित उत्पीडित जनसमुदायाला आवाहन करतात आणि मोजक्या लोकांना घेऊनच परिवर्तनाच्या मार्गाने पुढे पुढे जाऊ लागतात तेव्हा लांबचा आणि कठीण रस्तासुद्धा सोपा वाटू लागतो.**



# ऑक्टोबर क्रांतीचा वारसा आणि एकविसाव्या शतकातील नव्या समाजवादी क्रांत्यांचे आव्हान

## मागच्या अंकातील संपादकीय लेखाचा उर्वरीत भाग

**ऑक्टोबर क्रांतीच्या महान वारसाकडे आज आपण कसं पाहिलं पाहिजे ?** आपल्या देशातील काही कम्युनिस्ट क्रांतिकारक डोळे बंद करून चीनच्या क्रांतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात, तसे अंधानुकरण आपण ऑक्टोबर क्रांतीचेही करणार आहोत काय ? क्रांतीची पुनरावृत्ती होत नाही, आणि तिची कार्बन कॉपीसुद्धा काढता येत नाही. कामगार वर्गाची प्रत्येक नवीन पिढी आपल्या पूर्वजांनी केलेल्या प्रयोगांचे नीरक्षीर विवेकाने (नीरक्षीर=पाण्याला पाणी व दुधाला दुध) परीक्षण करते आणि त्यांच्याशी एक चिकित्सक संबंध जोडते. ती त्यांच्यापासून सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही धडे घेत, नव्या, बदललेल्या परिस्थितीनुसार नव्या क्रांतीची रणनीती आणि रणकौशल्य आखते. तर,मग आज आपण ऑक्टोबर क्रांतीपासून काय धडा घेऊ शकतो? त्यासाठी लेनिन आणि स्तालिन यांनी ऑक्टोबर क्रांतीच्या वैशिष्टया बद्दल काय म्हटले आहे यावर थोडक्यात चर्चा करू.

ज्या विशिष्ट राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये ऑक्टोबर १९१७ ला रशियामध्ये समाजवादी क्रांती झाली, त्याचा उल्लेख लेनिन यांनी केला होता. लेनिन यांच्या म्हणण्यानुसार दोन कारणे त्यावेळी ऑक्टोबर क्रांतीसाठी प्रामुख्याने जबाबदार होती. एक म्हणजे पहिल्या महायुद्धामुळे रशियात निर्माण झालेले आर्थिक, सामाजिक आणि राजकीय संकट. दुसरं म्हणजे, देशामध्ये उत्स्फूर्तपणे 'कामगार सोविएतांचा' उदय आणि त्याचबरोबर 'भूमी समित्यांनी' भूमीवर आणि 'कारखाना समित्यांनी' कारखान्यांवर कब्जा करण्याची सुरू केलेली मोहीम. अशा परिस्थितीमध्ये बोल्शेविक पार्टीला अशा एका देशामध्ये कामगार वर्गाच्या नेतृत्त्वाखाली सत्ता हस्तगत करावी लागली जिथे कामगारांची संख्या फक्त १० ते ११ टक्के इतकी होती, व लोकसंख्येच्या ८५ टक्के हिस्सा शेतकरी होता, अजून भूमीसुधारणा आणि इतर लोकशाही कार्येसुद्धा पूर्ण झाली नव्हती. जर बोल्शेविक पार्टीने असे केले नसते तर त्यावेळी लोकशाही क्रांतीचा खून झाला असता आणि त्याचबरोबर समाजवादी क्रांतीची शक्यता दीर्घ काळासाठी संपुष्टात आली असती. या दोन गोष्टी ऑक्टोबर क्रांतीला वैशिष्ट्यपूर्ण बनवतात. हे वैशिष्ट्य समजून घेणे फार गरजेचे आहे.

स्तालिन यांनी १९२४ मध्ये ऑक्टोबर क्रांती आणि रशियाच्या कम्युनिस्टांची कार्यनीती नामक आपल्या लेखामध्ये रशियन क्रांतीच्या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचे विस्तारपूर्वक विवेचन केले आहे. रशियन क्रांतीच्या अंधानुकरणाद्वारे एकविसाव्या शतकातील नव्या समाजवादी क्रांतीची रणनीती आणि सामान्य रणकौशल्य आखले जाऊ नयेत म्हणून, आज कामगार क्रांतिकारकांनी ते समजून घेतले पाहिजे. स्तालिन एक प्रकारे येत्या पिढ्यांतील कम्युनिस्ट क्रांतिकारकांना अशा एका धोक्याबद्दल अप्रत्यक्षपणे इशारा देत आहेत असे वाटते. स्तालिन म्हणतात, ज्या तीन बाह्य कारणांनी रशियाच्या क्रांतीची मदत केली ती म्हणजे १. साम्राज्यवादी युद्ध (पहिले महायुद्ध) ज्याने दोन प्रमुख साम्राज्यवादी गटांना (ब्रिटन-फ्रान्स आणि जर्मनी-ऑस्ट्रिया) रशियातील सर्वहारा वर्गाच्या क्रांतिकारी आंदोलनाकडे लक्ष देण्याची संधीच दिली नाही २. साम्राज्यवादी युद्धाने रशियातील कष्टकरी जनतेच्या सहनशक्तीचा अंत पाहिला होता आणि लोकांनाही युद्धाचा उबग आला होता समाजवादी क्रांतीच युद्धापासून सुटका करून घेण्याचा एकमेव मार्ग आहे हे त्यांना कळून चुकले होते. ३. युरोपमध्ये एक बळकट कामगार आंदोलन सुरू होते आणि जर्मनीसह कित्येक देशांमध्ये क्रांतिकारक परिस्थिती निर्माण होत होती. (परंतु तिथल्या नेतृत्व देणाऱ्या पक्षसंघटनाच्या चुकांमुळे रशियासारखी क्रांती तेथे पूर्ण होऊ शकली नाही) म्हणूनच रशियन क्रांतीला कित्येक देशांमध्ये आपले शक्तीशाली मित्र मिळाले होते. या तीन बाह्य कारणांच्या जोडीला सहा आंतरिक कारणंही होती,ज्यांनी बोल्शेविक क्रांती शक्य करून दाखवली. १. बोल्शेविकांना कामगार वर्गाचे व्यापक समर्थन मिळालेले होते. भूमी आणि शांततेच्या प्रश्नाबाबत क्रांतिकारी भूमिकेमुळे पार्टीला शेतकरी आणि सैनिकांचेही समर्थन मिळाले. ऑक्टोबर क्रांतीमध्ये कामगार वर्गाला नेतृत्त्व देण्यासाठी एक तावूनसुलाखून निघालेली, अनुभवसंपन्न, अनुशासित आणि परिपक्व कम्युनिस्ट पार्टी अस्तित्त्वात होती. ऑक्टोबर क्रांतीच्या समोर एक कमकुवत झालेला शत्रू होता – रशियाचा भांडवलदार वर्ग आताच सत्तेत आला होता आणि अजून भांडवली राज्यसत्ता स्वतःला बळकट करू शकलेली नव्हती.ती काही औद्योगिक केंद्रे आणि शहरांमध्येच प्रभावी होती. शेतकरी उठावांमुळे भांडवली भूस्वामींच्या सत्तेला तडा गेलेला होता आणि जे भांडवली आणि निम्नभांडवली पक्ष अस्थायी सरकारमध्ये होते ते भूमी आणि शांततेच्या प्रश्नावर तडजोड आणि गद्दारी करीत होते. रशियाचे साम्राज्य विशालकाय होते आणि त्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत एका युवा भांडवली राज्यसत्तेची पोहोच नव्हती. त्यामुळे क्रांतिकारकांना मुक्तपणे रणकौशल्य आखणे, आवश्यकतेनुसार मागे हटणे आणि विश्राम करून पुन्हा आक्रमणाच्या तयारीची जास्त संधी होती. प्रतिक्रांतिकारकांच्या विरोधात आणि साम्राज्यवाद्यांच्या वेढ्याला यशस्वीपणे तोंड देण्यास परिस्थिती अनुकूल नसूनसुद्धा सोविएत रशियाकडे कामचलाऊ खाद्यान्न पुरवठा व इतर संसाधने उपलब्ध होते.

पुढे स्तालिन यांनी दोन प्रतिकूल बाबींचा उल्लेख केला आहे. १. ऑक्टोबर क्रांतीने सोविएत रशियाच्या रूपात जगातील पहिली समाजवादी सत्ता स्थापन केली आणि त्यावेळी जगात दुसरे कोणतेच समाजवादी राज्य अस्तित्त्वात नव्हते ज्यावर बोल्शेविक समाजवाद निर्माणासाठी अवलंबून राहू शकत होते. त्यामुळे सोविएत सत्ता काहीशी बाजूला पडली. रशियाच्या लोकसंख्येमध्ये सर्वहारा वर्ग एक लहान अल्पसंख्येच्या रूपात होता आणि विशिष्ट परिस्थितीमध्ये रशियात समाजवादी क्रांतीची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे तिला रॅडिकल भूमी सुधारणा कराव्या लागल्या आणि शेतीमध्ये समाजवादी उत्पादन संबंध स्थापन करण्यास बरीच वाट बघावी लागली. त्यानंतरदेखील अनेकानेक अडचणी आणि गुंतागुंतीच्या समस्यांना तोंड देतच शेतीमध्ये समाजवादी संबंध पस्थापित होऊ शकले. भांडवली लोकशाही क्रांतीचे अनेक कार्यभार पूर्ण करावे लागल्याने समाजवादी क्रांती आणि निर्माण पुढे न्हेताना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. यामुळेच रशियाच्या क्रांतीची स्तालिन यांच्या मते दोन मुख्य गुणवैशिष्ट्ये अशी होती. १. ही क्रांती बळकट कामगार शेतकरी युतीच्या आधारेच संपन्न होऊ शकत होती व त्यात व्यापक शेतकरी वर्गाचे नेतृत्त्व अल्पसंख्य सर्वहारा वर्ग करीत होता २. ही क्रांती एका देशात समाजवादाचे निर्माण आणि सर्वहारा अधिनायकत्वावर आधारलेली होती. हा देश शेतकरी बहुसंख्या असणारा आणि मागास देश होता, जेथे भांडवली लोकशाही क्रांतीची अनेक कार्यभार अपूर्ण राहिले होते. युरोपच्या इतर देशांमध्ये, प्रामुख्याने जर्मनीमध्ये, क्रांत्या अयशस्वी झाल्यामुळे रशियाच्या क्रांतीचा आणि समाजवादी निर्माणाचा मार्ग अतिशय बिकट आणि कठीण झाला होता.

स्तालिन सांगत असलेली ही वैशिष्ट्ये आणि चरीत्रात्मक लक्षणांमुळेच लेनिन यांनी म्हटले होते की समाजवादी क्रांती संपन्न करणे सोपे आहे, परंतु ती टिकवून ठेवणे जास्त कठीण आणि गुंतागुंतीचे आहे. उलट तुलनेने अधिक उन्नत आणि औद्योगिकीकरण झालेल्या देशांमध्ये, जेथे सर्वहारा वर्ग मोठा आहे, उदाहरणादाखल जर्मनी किंवा फ्रान्स, तेथे क्रांती करणे जास्त कठीण होईल परंतु एकदा समाजवादी क्रांती झाली तर या देशांमध्ये समाजवादी निर्माणाचा मार्ग तुलनेने जास्त सुलभ असेल. याचे कारण म्हणजे या देशांमध्ये सर्वहारा वर्ग लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा बनला होता, शेतीचे भांडवली रूपांतर प्रामुख्याने क्रांतिकारी किंवा बिगर क्रांतिकारी मार्गांनी पूर्ण झालेले होते, देशातील उत्पादक शक्तींच्या विकासाचा स्तर अधिक उंचावलेला होता आणि इतर लोकशाही कार्यभारसुद्धा मुख्यतः पूर्ण झालेले होते, देशातील



सर्वहारा वर्गापाशी संघटना आणि संघर्षाचा तुलनेने जास्त अनुभव होता आणि त्यांच्या राजकीय जाणीवा तुलनेने अधिक परिपक्व होत्या. या प्रगत भांडवली देशांमध्ये भांडवली राज्यसत्तेचा सामाजिक आधार तुलनेने अधिक व्यापक होता, तेथे भांडवलदार वर्गाकडे राज्य करण्याचा जास्त अनुभव होता आणि त्याच्या राज्यसत्तेची पोहोच समाजात खोलवर रुजलेली होती. म्हणूनच या अधिक कुशल, अधिक अनुभवी आणि अधिक संघटित भांडवलदारवर्गाच्या आणि त्याच्या राज्यसत्तेच्या विरुद्ध क्रांती करणे रशियासारख्या मागास भांडवलदार देशाच्या तुलनेत अधिक कठीण होते.परंतु एकदा क्रांती झाल्यावर उपरोक्त कारणांमुळे ती टिकवणे आणि समाजवादी निर्माणाचे कार्य करणे तुलनेने जास्त सुगम होते. रशियाच्या बाबतीत घडलेली एक शोकांतिका म्हणजे युरोपच्या तुलनेने जास्त प्रगत देशांमध्ये कित्येक ठिकाणी क्रांतिकारक परिस्थिती निर्माण होऊनसुद्धा सर्वहारा वर्ग क्रांती करू शकला नाही. त्यामुळे रशियातील कामगार सत्तेला आणि समाजवादाला कोणीही मजबूत मित्र लाभला नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये एका देशात समाजवाद निर्माण करणे हाच स्तालिन यांच्या नेतृत्त्वात केलेला एक चमत्कार होता. परंतु रशियायन क्रांतीच्या या विशिष्ट प्रतिकूल आणि अनुकूल अशा ऐतिहासिक परिस्थितींचे कारण त्याचे इतिहासातील विशिष्ट स्थान हेच आहे आणि म्हणूनच तिचे अनुकरण करणे शक्य नाही.

लेनिन यांनी तेव्हाच सांगितले होते की साम्राज्यवाद आणि मक्तेदार भांडवलशाहीच्या काळात सर्वहारा क्रांत्यांच्या वादळाचे केंद्र युरोपच्या प्रगत भांडवली देशांकडून सरकून आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेच्या देशांकडे गेले आहे. हे होत असतानाच पूर्व आणि पश्चिमेच्या सेतूवर, म्हणजेच रशियामध्ये (ज्याला युरेशियासुद्धा म्हटले जायचे) सर्वहारा वर्गाने अंतर्विरोधांची एक गाठ तयार झाल्याच्या स्थितीचा फायदा घेत क्रांती केली आणि पहिल्या समाजवादी सत्तेची स्थापना केली. या प्रयोगाचे ऐतिहासिक महत्त्व, तिचे वैशिष्ट्य आणि त्याचबरोबर तिच्या ऐतिहासिक मर्यादांबद्दल आपण बोललो आहोत. आजच्या काळात क्रांत्यांच्या वादळाचे केंद्र पूर्णपणे अशा देशांमध्ये सरकले आहे ज्यांना गुलामीचा इतिहास लाभलेला आहे. लेनिन यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सांगितले होते की या देशांमध्ये (जे त्या काळी गुलाम किंवा अर्धगुलाम होते) दोन टप्प्यांमध्ये क्रांती होईल, अगोदर सर्वहारा वर्ग एकूण शेतकरी वर्गाला सोबत घेऊन साम्राज्यवाद आणि सामंतवाद विरोधी राष्ट्रीय लोकशाही क्रांती करेल आणि नंतर गरीब शेतकरी समुदायाला सोबत घेऊन भांडवलशाही विरोधी समाजवादी क्रांती करेल. १९७० च्या दशकाच्या अखेरपर्यंत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील बहुतेक देश राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाले होते. अर्थातच, आर्थिकदृष्ट्या ते साम्राज्यवादावर विसंबून होते. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात ही आर्थिक निर्भरता एका नव्या रूपात समोर आली आहे, परंतु राजकीय दृष्ट्या भारत, इजिप्त, टर्की, इडोनेशिया, ब्राझील, अर्जेंटिना इत्यादी देशांमध्ये भांडवलदार शासक वर्गाने आपले राजकीय स्वातंत्र्य टिकवून ठेवले आहे. काही विशिष्ट काळामध्ये या देशांची साम्राज्यवादावरची आर्थिक निर्भरता त्याच्या राजकीय स्वातंत्र्यावर मात करताना दिसते, परंतु प्रामुख्याने ते राजकीयदृष्ट्या स्वतंत्र आहेत. या देशांचा भांडवलदार वर्ग साम्राज्यवादाचा (कुठल्याही एका साम्राज्यवादी देशाचा नाही तर वेगवेगळ्या साम्राज्यवादी गटांशी मोलभाव करताना समस्त साम्राज्यवादाचा) ज्युनियर पार्टनर आहे. तो साम्राज्यवादी देशांवर तंत्रज्ञान आणि भांडवलासाठी विसंबून आहे जेणेकरून आपल्या देशातील कामगार वर्गाचे अधिक कौशल्याने शोषण करता येईल व त्याच्या बदल्यात तो साम्राज्यवादी देशांसाठी आपल्या देशातील बाजाराचे दरवाजे उघडे करतो. साम्राज्यवादी देशसुद्धा बाजार आणि थेट गुंतवणुकीच्या संधीसाठी या देशांवर अवलंबून आहेत कारण त्या देशांमधे एक विशाल उपभोक्ता मध्यमवर्ग आहे.

या सर्व तुलनेने मागास असलेल्या भांडवली देशांमध्ये सामंती उत्पादन संबंधांचे फार फार तर काही अवशेष शिल्लक आहेत. क्रांतिकारी पद्धतीने (राष्ट्रीय लोकशाही क्रांती आणि रॅडिकल भूमी सुधारणा) किंवा गैर क्रांतिकारी मार्गाने (सामंती भूस्वामींनाच भांडवली कुलक किंवा फार्मर होण्याची संधी देणाऱा प्रशियन प्रकारच्या भूमीसुधारणा) या देशांतील सामंती उत्पादन संबंध मुख्यतः समाप्त केले आहेत. ज्या देशांमध्ये ही प्रक्रिया गैर क्रांतिकारी मार्गाने झालेली आहे तेथे सामंती अवशेष दीर्घ काळपर्यंत अस्तित्त्वात राहिले आणि जेव्हा ते संपुष्टात आले तेव्हादेखील शेतीमध्ये मागासलेपण टिकून राहिले. यामुळेच कित्येक कम्युनिस्ट क्रांतिकाऱ्यांमध्ये सामंती उत्पादन संबंध असल्याचा भ्रम निर्माण होतो. परंतु आज फक्त एखादा आंधळा आणि चपलाच्या मापानं पाय कापणारा, पोथिनिष्ठ कम्युनिस्टच भारतात शेतीमध्ये सामंती उत्पादन संबंध आहेत असे म्हणू शकतो. या सर्व पूर्वीच्या गुलाम देशांमध्ये एका विशिष्ट प्रकारची, तुलनेने मागासलेली, भांडवलशाही विकसित झाली आहे. या देशांमध्ये उद्योगांचा बऱ्यापैकी विकास झालेला आहे, तसेच 'संरचनात्मक साचा' सुद्धा बऱ्यापैकी विकसित झालेला आहे, कामगारांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४० ते ५० टक्के इतकी झालेली आहे, शहरीकरणाचा वेग चांगला आहे आणि २०२० पर्यंत यांपैकी बहुतेक देशांच्या लोकसंख्येचा मोठा भाग शहरी होणार आहे. याचा अर्थ अशा देशांमध्ये मुख्य अंतर्विरोध, शेतीपासून उद्योगांपर्यंत, श्रम आणि भांडवला मध्येच आहे,अशा देशांमध्ये भांडवलशाहीविरोधी

# ऑक्टोबर क्रांतीचा वारसा आणि एकविसाव्या शतकातील नव्या समाजवादी क्रांत्यांचे आव्हान

समाजवादी क्रांतीचा टप्पा आलेला आहे.

परंतु हेसुद्धा खरे आहे की या देशांची स्थिति रशियाहून खूप वेगळी आहे. रशिया स्वतः एक दुसऱ्या रांगेतला साम्राज्यवादी देश होता, आणि ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि अमेरिकेच्या मागे असूनदेखील पूर्वी युरोप आणि बाल्कन देशांसाठी तो एक साम्राज्यवादी देश होता. पण भारत, इजिप्त, इंडोनेशिया, टर्की, ब्राजीलसारख्या देशांना आता साम्राज्यवादी म्हणता येणार नाही. निश्चितपणे या उगवत्या अर्थव्यवस्थांच्याही साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा आहेत आणि काही शेजारील देशांसाठी त्यांची स्थिति एका उदयोन्मुख साम्राज्यवादी शक्तीसारखी झाली आहे. परंतु तरीही जागतिक पातळीवर त्यांना अजून साम्राज्यवादी देश म्हणता येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे या देशांवर अजूनही अमेरिका, जपान आणि युरोपीय संघातील साम्राज्यवादाच्या लुटीचा दबाव आहे. म्हणूनच त्यांची अवस्था गुंतागुंतीची आहे. मुख्य म्हणजे या देशांतील जनता आजसुद्धा म्हणजे स्वातंत्र्यानंतरदेखील साम्राज्यवादी आर्थिक शोषण आणि उत्पीडनाची बळी ठरते आहे आणि आता हे साम्राज्यवादी शोषण देशी भांडवलदारांशी हातमिळवणी करून चालू आहे. म्हणूनच साम्राज्यवादाशी या देशांच्या जनतेचा अंतर्विरोध ही फार दूरच्या इतिहासातील बाब नाही, तर आजसुद्धा तात्कालिक महत्त्वाची अशी ही बाब आहे. या देशांमध्ये ज्या समाजवादी क्रांत्या अपेक्षित आहेत, त्या फक्त भांडवलशाही विरोधी नसतील तर भांडवलशाही विरोधी, साम्राज्यवाद विरोधी क्रांत्या असतील. या अर्थाने त्या गुणात्मकदृष्ट्या एका नव्या प्रकारच्या समाजवादी क्रांत्या असतील आणि या नव्या वैशिष्ट्यामुळे क्रांतीच्या रणनीतीत आणि सामान्य रणकौशल्यात महत्त्वाचे बदल अपेक्षित आहेत.

आणखी एक मोठे परिवर्तन आज आपल्यासमोर आहे. लेनिन आणि स्तालिन यांच्या लिखानात आपण पाहिल्याप्रमाणे रशियामध्ये भांडवली राज्यसत्ता अजून अतिशय कमकुवत होती, भांडवलदार वर्गाचे शासन अजून बळकट झालेले नव्हते आणि युद्धाने त्याला आणखीनच कमकुवत आणि पोकळ करून टाकले होते. त्याच वेळी सर्वहारा वर्गाने आपल्या अग्रदूत पार्टीच्या नेतृत्त्वाखाली त्या राज्यसत्तेवर प्रहार केला आणि भांडवली राज्यसत्ता ध्वस्त करून आपली राज्यसत्ता स्थापन केली. ही राज्यसत्ता काही शहरांमध्येच मर्यादित होती आणि रशियासारख्या विशालकाय देशाच्या दूरवरच्या भागांमध्ये तिची पकड मजबूत झालेली नव्हती. समस्त रशियन समुदायामध्ये या राज्यसत्तेचा सामाजिक आधार अगदीच मर्यादित होता. लोकसंख्येतील पाच-सहा टक्क्यांहून जास्त माणसे या नवजात भांडवली सत्तेची समर्थक नव्हती. आज स्थिति तशी नाही. उदाहरणादाखल आज आपल्या देशात भांडवली राज्यसत्तेच्या सामाजिक अवलंबाची भूमिका पार पाडणाऱ्या वर्गाचीच एकूण लोकसंख्या १५ ते २० टक्के इतकी आहे. मोठा भांडवलदार वर्ग, छोटा भांडवलदार वर्ग, नोकरशहा वर्ग, शेअर बाजारांच्या दलालांपासून प्रापर्टी डिलरसारख्या मध्यस्थांचा वर्ग, छोट्या-मोठ्या व्यापाऱ्याचा निमभांडवलदार वर्ग आणि त्याचबरोबर सुखवस्तू शेतकरी आणि श्रीमंत शेतकऱ्यांच्या एकूण वर्गाची लोकसंख्या एकत्र केली तर ती एकूण लोकसंख्येच्या १५ ते २० टक्के इतकी होते. म्हणूनच आजच्या भांडवली राज्यसत्तेची सामाजिक मुळं अधिक खोलवर रुजलेली आहेत. तिची राजकीय आणि प्रशासकीय मुळं सुद्धा अधिक खोल गेलेली आहेत. आजची भांडवली राज्यसत्ता काही प्रमुख शहरे आणि औद्योगिक केंद्रे यांच्यापुरती मर्यादित राहिलेली नाही तर गाव पंचायतीच्या प्रधानापासून लेखपाल, तलाठी, ब्लाक डेवलपमेंट आफिसर, नगरसेवक, आमदारापासून संसदेपर्यंत तिच्या नसा आणि शीरा गाव, गल्ली आणि वस्त्यांपर्यंत पसरलेल्या आहेत. तिच्या सैन्यशक्तीची पोहोच काही मिनिटांत देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात पोहोचण्याइतकी व्यापक आहे. थोडक्यात, ही राज्यसत्ता म्हणजे समाज आणि राजकीय ताणतणावापासून वेगळी असलेली, वरून लादलेली अशी गोष्ट नाही तर देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय ताणतणावात एकरूप झालेली अशी व्यवस्था आहे. म्हणूनच रशियामध्ये जितक्या सहजपणे समाजवादी क्रांती झाली तेवढ्या सहजपणे येथे क्रांती होऊ शकत नाही आणि इथल्या क्रांतीला अगदी वेगळ्या मार्गाने जावे लागेल. परंतु त्यामुळे निराश व्हायचे कारण नाही. कारण रशियाच्या क्रांतीच्या तुलनेत एक मोठी सकारात्मक बाब आज समाजवादी क्रांतीच्या बाजूने उभी आहे. रशियामध्ये समाजवादी क्रांतीच्या वेळी कामगार वर्ग एकूण लोकसंख्येच्या फक्त १० ते १२ टक्के होता. म्हणजेच क्रांतीचे खुलेपणाने आणि निःसंशयपणे समर्थन करणारा भाग फक्त १० ते १२ टक्के होता. शेतकऱ्यांच्या व्यापक लोकसंख्येला आपल्यासोबत घेण्यासाठी बोल्शेविक पार्टीला रॅडिकल भांडवली भूमिसुधारणांचा कार्यक्रम राबवावा लागला. हा इच्छेचा प्रश्न नव्हता. त्या वेळी इतिहासाने लादलेली ती अनिवार्यता होती. शेतकऱ्यांची विशाल जनसंख्या त्याशिवाय क्रांतीच्या बाजूने उभी राहिली नसती. रॅडिकल भांडवली भूमीसुधारणांनी दूरगामी स्तरावर समाजवादी निर्माणाच्या पुढ्यात एक आव्हान आणि गुंतागुंत निर्माण केली. कारण क्रांतीनंतर समाजवादी कामगारसत्तेला शेतीमध्ये समाजवादी सामूहिक शेतीचे उत्पादन संबंध स्थापित करण्यास अतिशय कठिण आणि गुंतागुंतीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. आजच्या नव्या समाजवादी क्रांतीसमोर हे आव्हान नाही. देशामध्ये मालक शेतकऱ्यांची एकूण संख्या लोकसंख्येच्या फक्त २७ टक्के इतकीच आहे. या २७ टक्क्यांपैकी दोन तृतियांश भाग अर्धसर्वहाराच्या अवस्थेला पोहोचलेला आहे कारण त्यांच्यापाशी इतकी कमी वा नापीक जमीन आहे की त्यांच्या कुटुंबियांना दुसऱ्यांच्या शेतावर किंवा औद्योगिक केंद्रांवर जाऊन मजुरी करावी लागते. वास्तविक त्यांच्या कुटुंबाची अर्थव्यवस्था मुख्यतः शेतीवर चालत नाही तर पगारी श्रमावर म्हणजेच मजुरीवर चालते. ते मुख्यतः कामगार बनले आहेत आणि लहानशा जमिनीची मालकी फक्त औपचारिकदृष्ट्या त्यांना गरीब शेतकरी म्हणून टिकवून आहे. अर्थातच यामुळे त्यांची सर्वहारा जाणीव धूसर होते. तरीही एक गोष्ट निश्चित आहे की त्यांचे श्रीमंत शेतकरी, कुलक आणि सुखवस्तू मध्यम शेतकऱ्यांशी वर्ग अंतर्विरोध स्पष्ट आहेत आणि ते अधिक टोकदार होत आहेत आणि तेवढ्याच प्रमाणात कामगार वर्गाशी त्याची जवळीक वाढत जाते आहे. कामगारांची लोकसंख्या पाहिली तर ती ५५ कोटीच्या जवळपास आहे. यांपैकी सुमारे ३३ कोटी ग्रामीण कामगार आहेत तर सुमारे २० ते २२ कोटी शहरी आणि औद्योगिक कामगार आहेत. शुद्ध रूपात सर्वहारा असा हा समुदाय आहे.जर आपण या ग्रामीण आणि शहरी सर्वहारा वर्गाला गरीब शेतकरी, ग्रामीण आणि शहरी अर्धसर्वहारा आणि निम्न मध्यमवर्गाची लोकसंख्या जोडली तर ती ८० कोटीच्या वर जाते. थोडक्यात, आज भारत आणि भारतासारख्या इतर देशांची अवस्था १९१७ च्या रशियाहून खूप वेगळी आहे. जर राज्यसत्तेच्या सामाजिक अवलंबांचा विस्तार झालेला असेल तर त्याहून जास्त वेगाने समाजवादी क्रांतीच्या मित्र वर्गांचा विस्तार झालेला आहे. या बदललेल्या परिस्थितीमुळे आपण असे म्हणू शकतो की आजच्या नव्या समाजवादी क्रांत्या अधिक कठीण मार्गावरून जातील परंतु यशस्वी झाल्यानंतर त्या टिकण्याची व तुलनेने अधिक सुगम समाजवाद निर्माणाची शक्यता जास्त आहे. आपल्या देशामध्ये लोकशाही क्रांतीचा शिल्लक कार्यभारसुद्धा १९१७ च्या रशियाच्या तुलनेत फारच कमी आहेत. आजच्या समाजवादी क्रांतीसमोर व्यापक शेतकरी जनतेला सोबत घेण्यासाठी रॅडिकल भूमीसुधारणांचा कार्यक्रम राबवण्याची सक्ती नाही. उलट कसणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत खूपच कमी आहे आणि त्यांच्यामध्येसुद्धा परिघावरच्या शेतकऱ्यांचा आणि अर्धसर्वहारा समुदायाचा वाटा दोन तृतियांशपेक्षाही जास्त आहे. म्हणूनच ग्रामीण व शेतकरी समुदायाच्या मोठ्या हिश्श्याला सामूहिक शेतीसाठी सहमत करणे अधिक सोपे आहे. अर्थातच एखाधी कम्युनिस्ट शक्ती आजसुद्धा त्यांच्यामध्ये जमिनीची भूक निर्माण करण्यासाठी हट्टाला पेटली तर ही भूक निर्माण केली जाऊ शकते. जमिनीची मालकी हे खाजगी मालमत्तेचे सर्वात आदिम रूप आहे आणि तिच्याबद्दल ओढ निर्माण करणे मागास शेतकरी समुदायामध्ये समाजवादी क्रांतीच्या टप्प्यात शक्य आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर,आज जर देशात आर्थिक पातळीवर शेतकरी जनतेसमोर समाजवादी शेतीचा कार्यक्रम हा योग्य असला तरी त्याचा अर्थ असा नाही की सर्वच शेतकरी जनता उत्स्फूर्तपणे राजकीयदृष्ट्या त्याचसाठी तयार होऊन बसली आहे आणि कम्युनिस्टांची वाट बघते आहे. याचा अर्थ असाही नाही की समाजवादी शेतीचा कार्यक्रम सादर करताच ते त्याचा विरोध करतील. याचा अर्थ असा की आज त्यांना समाजवादी कार्यक्रमासाठी राजी करणे आज जास्त सोपे आहे कारण लहानसा जमिनीचा तुकडा त्यांना काय देऊ शकतो ते त्यांनी पाहिले आहे. सामूहिक शेतीच्या व्यवस्थेद्वारेच त्यांना गरिबी, बेरोजगारी आणि उपासमार यांपासून मुक्ती मिळू शकते, हे ते समजू शकतात. लेनिनला हे चांगलच ठाउक होते. आर्थिक पातळीवर शेतकऱ्यांचे विभेदीकरण आणि सामूहिक शेतीसाठी आर्थिक पातळीवर त्यांच्या तयार होण्याचा अर्थ हा नाही की ते उत्स्फूर्तपणे राजकीय दृष्ट्या समाजवादी सामूहिक शेतीसाठी तयार होऊन बसले आहेत. आर्थिकदृष्ट्या विभेदीकरणानंतरसुद्धा शेतकरी जनतेला कम्युनिस्ट पार्टी सामूहिक समाजवादी शेतीसाठी तयार करते व ते अशा प्रकारेच तयार होऊ शकतात. भारतात आज अशी परिस्थिती आहे की शेतकऱ्यांच्या मोठ्या हिश्श्याला म्हणजेच गरीब शेतकऱ्यांना त्यासाठी तयार केले जाऊ शकते. या दृष्टीनेसुद्धा, २१ व्या शतकातील नव्या समाजवादी क्रांत्या ज्या देशांमध्ये संभावित आहे, तेथील सामाजिक आर्थिक आणि राजकीय परिस्थिती १९१७ च्या रशियाहून फार वेगळी आहे. यामुळेसुद्धा या समाजवादी क्रांत्यांचे चारित्र्य, स्वरूप आणि मार्ग रशियाच्या समाजवादी क्रांतीहून वेगळे असतील.

आपण येथे दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक भांडवलाच्या कार्यप्रणालीमध्ये झालेल्या बदलांवर विस्ताराने चर्चा करू शकत नाही व त्याबद्दल आम्ही पुढे कामगार बिगुलमध्ये लिहू. परंतु सध्या एवढे सांगणे पुरेसे आहे की १९४५ नंतर जागतिक भांडवली व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये काही महत्त्वाचे बदल झाले आहेत. त्यामुळे समाजवादी क्रांत्यांच्या कार्यनीतीमध्येसुद्धा काही बदल होणे स्वाभाविक आहे. या बदलांपैकी प्रमुख बदल पुढीलप्रमाणे होत – उत्तर फोर्डवाद (म्हणजेच एकीकृत कारखाना लहान लहान एककांमध्ये तोडून कामगार जनतेला कार्यस्थळावर विखुरणे, आज हे जागतिक पातळीवर होत आहे), कामगार वर्गाचे अगोदर मोठ्या प्रमाणावर औपचारिकीकरण (१९४५ ते १९७०) आणि त्यानंतर त्याहून मोठ्या प्रमाणात अनौपचारिकीकरण, वित्तीय आणि प्रामुख्याने सट्टेबाज भांडवलाचे अधिपत्य आणि कार्यप्रणाली यांमध्ये लेनिनच्या काळाच्या तुलनेत अभूतपूर्व बदल, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण आणि संपर्काच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे भांडवलाच्या वाटचालीमध्ये आणि गतीमध्ये झालेला बदल, आजच्या साम्राज्यवाद आणि भांडवलशाहीकडून मिडिया आणि प्रचारतंत्राचा व्यापकतम, सूक्ष्मतम आणि कुशलतम उपयोग आणि संस्कृतीच्या क्षेत्राचे वर्गसंघर्षाचे पूर्वीच्या तुलनेत जास्त प्रमुख क्षेत्र म्हणून समोर येणे इत्यादी. आता आपण या बदलांवर चर्चा करणार नाही आणि पुढच्या अंकांमध्ये ऑक्टोबर क्रांतीच्या शताब्दी वर्षात या मुद्द्यांवर विस्तारपूर्वक लिहू. आता एवढेच म्हणता येईल की आजची जागतिक भांडवली व्यवस्था शंभर वर्षे किंवा सत्तर वर्षांपूर्वीच्या जागतिक भांडवली व्यवस्थेहून अगदी वेगळी आहे. हा बदल गुणात्मक नसला तरी महत्त्वपूर्ण मात्रात्मक बदल नक्कीच आहे. त्यामुळे ज्या रणनीतींवर आणि सामान्य रणकौशल्य मार्गाचा वापर विसाव्या शतकातील क्रांत्यांनी केला ते आता कालबाह्य झाले आहेत. उपरोक्त बदलांचा अभ्यास करताना व ते समजून घेताना आज कामगार वर्गाला नवीन रणनीती, रणकौशल्य व मार्ग शोधून काढावे लागतील, एवढेच नव्हे तर क्रांतीच्या आधीसुद्धा आपल्या आर्थिक आणि राजकीय संघर्षांसाठी वेगळे रणकौशल्य आखावे लागतील.

या सर्व बदलांकडे पाहता आम्ही असे मानतो की विसाव्या शतकातील समाजवादी क्रांती, विशेषतः ऑक्टोबर क्रांतीच्या तुलनेत एकविसाव्या शतकातील समाजवादी क्रांत्यांमध्ये परिवर्तनाचा पैलू प्रधान असेल आणि म्हणूनच हा परिवर्तनाचा पैलू रेखांकित करण्यासाठी आणि तो नजरेआड होऊ नये यासाठी आम्ही त्याला नवी समाजवादी क्रांती म्हणतो. या क्रांतीमध्येसुद्धा कोणत्याही समाजवादी क्रांतीप्रमाणेच मूलतः तीन वर्गांची (कामगार वर्ग, गरीब आणि मध्यम शेतकरी वर्ग आणि निम्न मध्यमवर्ग) युती असेल. परंतु तिचे स्वरूप आणि प्रक्रिया ऑक्टोबर क्रांतीहून खूप वेगळी असेल. त्यामागच्या कारणांवर आपण चर्चा केलेलीच आहे.

आज ऑक्टोबर क्रांतीच्या महान वारशाचे स्मरण करण्याची गरज आहे. कारण कामगार वर्गाचा मोठा हिस्सा हा हताश आणि निराश झालेला आहे. त्याच्या पूर्वजांनी कामगारांचे राज्य स्थापन केले होते आणि असे काही असामान्य प्रयोग केले होते ज्यांच्याबद्दल आज वाचतानासुद्धा चकित व्हायला होतं, हे त्याला माहीत नाही. शेवटी त्या प्रयोगांचे अपयश आणि त्यामागची कारणेसुद्धा समजून घेतली पाहिजेत. परंतु या महान क्रांतीपासून प्रेरणा आणि बळ घेताना, तिच्याकडून सकारात्मक आणि नकारात्मक धडा घेताना हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की या क्रांतीचा वारसा जणू आपल्याला सांगतो आहे, माझ्याकडून शिका. माझ्या उपलब्ध्या आणि माझ्या चुका, दोन्हींकडून शिका. परंतु माझी नक्कल करू नका. माझे अंधानुकरण करू नका. आपल्या देशकाळाचे वैशिष्ट्य ओळखा आणि माझ्या नव्या आवृत्तीच्या रचनेची तयारी करा. माझ्या विराट छायेत नव्या लोकक्रांत्यांच्या अंकुरांना आणि पालवीला कोमेजू देऊ नका. माझ्याकडून धडा घ्या आणि हा धडा घेण्यासाठी काळ आणि स्थळ या दोन्ही बाबतीत माझ्यापासून अंतर राखून राहणे गरजेचे आहे. तरच ऑक्टोबरच्या नव्या आवृत्त्या निर्माण होऊ शकतील. आज आपण हाच संदेश समजून घेतला पाहिजे आणि येणाऱ्या नव्या समाजवादी क्रांतीच्या तयारीला लागले पाहिजे. खूप काम करायचे आहे, खूप चालायचे आहे. म्हणूनच क्षणाचा विलंबसुद्धा फार मोठा अपराध ठरेल.

**सजेंगे फिर नये लश्कर**
**मचेगा रणमहाभीषण**
**उठो संग्रामियो जागो!**
**नयी शुरुआत करने का समय फिर आ रहा है**
**कि जीवन को चटख़ गुलनार करने का समय**
**फिर आ रहा है।**

# कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतीकारी प्रतिनिधीत्वाचा प्रश्न

पान १ वरून

यादव शहरांत केलेली विकासकामे आणि गावांतील रस्ते व इतर निर्माणाच्या आधारावर, सोबतच निवडणूकीत फुकट वाटलेल्या घोषणांच्या जोरावर आपल्या मतांना पक्के करण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक राजकीय विश्लेषकांच मत आहे की सपाच्या अंतर्गत कलहाचा अखिलेश यादवला एका बाजूला फायदाही मिळाला आहे. अखिलेशची प्रतिमा सपाला गुंड व अराजक शक्ती पासून मुक्त करणारा अशी झाली आहे आणि अशात जर त्यांना सत्ता मिळाली तर ते तमाम विकासाची कामे मार्गी लावतील.

या समिकरणांवर खुप जास्त चर्चा खरंतर कामगार वर्गासाठी फार प्रासंगिक आहे असे नाही. कारण या सर्व पार्ट्यांचे वर्गचरित्र कामगार विरोधी आहे. प्रत्येक गट, पार्टी, संगठन आणि प्रत्येक विचारधारा व राजकारणाचं एक वर्गचरित्र असतं. दुसऱ्या शब्दांत सांगायच तर कुठलीही विचारधारा व राजकारण कुठल्या न कुठल्या वर्गाची सेवा करत असतं. त्याआधारे जर उ.प्रदेश च्या निवडणूकीच्या आखाडयात उतरलेल्या तमाम पार्ट्यांकडं पाहीले तर समजेल की त्या कुठल्या वर्गाचं प्रतिनिधीत्व करत आहेत.

कांग्रेस व भाजपा बड्या भांडवलदार वर्गाचं प्रतिनिधीत्व करताहेत. कांग्रेसच ती पार्टी आहे जीने देशात आणि त्यांच्या शासनात तमाम राज्यांमध्ये खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणांची सुरूवात केली होती. १९९१ मध्ये देशात आणि त्यापूर्वीपासून काही राज्यांत कांग्रेसने या धोरणांची सुरूवात केली होती. याच धोरणांमुळे कष्टकऱ्यांच्या अजोड मेहनतीतून उभारलेल्या सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमांना चवली पावलीवर देशी-विदेशी भांडवलाच्या हवाली करायला सुरुवात झाली होती. कांग्रेस या धोरणांना त्यांच्या तथाकथित धर्मनिरपेक्षता आणि दिखाऊ उदार सामाजिक नीती सोबत लागू करत असते. याच धोरणांना भाजपाने आपल्या सांप्रदायिक फासीवादी नीती सोबत लागू केलं आणि तेही खुप जोरात, दडपशाही करत अगदी नागडेपणाने. भाजपाची सामाजिक धोरणे ही अल्पसंख्यांक विरोधी, दलित व स्त्री प्रश्नांवर कट्टरतावादी, सांप्रदायिक, ब्राह्मण्यवादी आणि पितृसत्ताक आहेत. म्हणजेच या व अशा इतर समुदायांचे हक्क हिसकावणे आणि त्यांना हीन मानणारे विचार बाळगून आहेत. प्रसंगी कांग्रेसही सवर्णवादी आणि सांप्रदायिक तुष्टीकरण करायचं सोडत नाही, जसे १९८० च्या दशकामध्ये सांप्रदायिक फासीवाद्यांच्या राममंदीर आंदोलनाच्या वेळेस त्यांनी केलं होतं. पण तरीही भाजपा एक फासीवादी संघटनेचा (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) निवडणूकीतील चेहरा आहे. कामगार वर्गाला आपल्या तात्कालिक प्रतिरोधाच्या आंदोलनाची नीती म्हणून कांग्रेस सारख्या नरम दक्षिणपंथी उदार भांडवली पार्टीत आणि भाजपा सारख्या आक्रामक फासीवादी पार्टीत फरक करण्याची गरज आहे. निश्चितपणे दोन्हीही बड्या भांडवलाचे प्रतिनिधीत्व करत आहेत, पण दोन्हींची बड्या भांडवलाचे प्रतिनिधीत्व करण्याची पद्धत आणि अंदाज वेगळा आहे.

दुसऱ्या बाजूला समाजवादी पार्टी विषयी बोलायचे तर, मुख्यत्वे गावातील श्रीमंत शेतकरी व उच्चमध्यम शेतकरी आणि शहरातील ठेकेदार प्रॉपर्टी डिलर, निम्नभांडवली वर्गाच्या एका विभागासोबतच बड्या भांडवलदाराचेही एका विभागाचं ती प्रतिनिधीत्व करते आहे. मतांसाठी ती स्वत:ला मुस्लिमांचे सर्वात मोठे हितचिंतक सिद्ध करण्याचा प्रयत्न करते. सोबतच यादवांच्या वोट बँकेला आपला प्रमुख आधार बनवते. मुज्जफरनगर दंगलीत अखिलेश यादवच्या योग्य हस्तक्षेप न करण्यांने व भाजपा सांप्रदायिक हल्ल्यांपासून सुरक्षितता न देण्यामुळे मुस्लीमांमध्ये सपाची प्रतिमा बिघडली होती, पण गेल्या काही दिवसांत अखिलेश यादवने ती सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यात कांग्रेसशी हातमिळावल्यामुळे अखिलेशला मदत मिळाली आहे. जीथवर बसपाचा प्रश्न आहे तर ती मुख्यत्वे दलित अस्मितेचं राजकारण करून मते मिळणवण्याचा प्रयत्न करते. सोबतीला सतीशचंद्रा सारखा एक ब्राह्मण चेहराही समोर आणला आहे, ज्याच्या आधारावरच २००७ मध्ये ब्राम्हणांची मते भाजपाकडून घरंगळत आपल्या बाजूला आणण्यात बसपाला यश मिळाले होते. यावेळेस मुस्लिम मतांवरही बसपा गिधाड दृष्टि लावून आहे. परंतु वास्तवत: बसपा दलित जातीतून आलेल्या एका छोट्या कुलीन वर्गाचे प्रतिनिधीत्व करते. याशिवाय शहरी मध्यमवर्ग, मुस्लिम आणि उच्च जातीच्या एक हिश्शाकडूनही मते मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. मुख्यत्वे बसपा ही निम्न मध्यमवर्ग, मध्यमवर्ग आणि सोबत भांडवलदार वर्गाच्या एका विभागाचं प्रतिनिधीत्व करणारी पार्टी आहे. तीचा निशाणा मुख्यत्वे 'सोशल इंजिनीअरींग' द्वारे दलित अस्मितेचा वापर करून दलित मते, सतिश चंद्राची ब्राम्हणप्रतिमा वापरून ब्राम्हणमते आणि मुस्लिम उमेदवारांना अधिक तिकटे देऊन मुस्लीम मते मिळवण्यावर आहे. उत्तर प्रदेशच्या या विधानसभा निवडणूकीत हा त्रिकोणीय संघर्ष राहील.

पण संघर्षात जे पक्ष उतरलेत ते सर्व भांडवलदार वर्ग, निम्न भांडवली वर्गाच्या कुठल्या न कुठल्या विभागाचं प्रतिनिधीत्व करत आहेत. कामगार वर्गाचा पक्षच गायब आहे. असा कुठलाच पक्ष नाही जो कामगारांचे प्रतिनिधीत्व करतोय. म्हणायला डावे पक्ष आहेत... जसे भाकपा, माकपा, भाकपा (माले) इ. या तीन प्रमुख डाव्या पक्षांनी इतर पेटीबुर्झ्वा पक्षांशी जसे 'एसयूसीआई' सोबत एक आघाडी बनवली आहे. त्यांची अवस्था अशी आहे की ४०३ जागेवर उभे करण्यासाठी त्यांच्या जवळ उमेदवारच नाहीत. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे कामगारवर्गाच्या पाठीत सुरा घुपसणाऱ्या पार्ट्या आहेत. प. बंगाल मध्ये यांचे सरकार होते, त्रिपुरा आणि केरळात यांची सरकारे आहेत. या राज्यांत भांडवलदारांची सेवा करणारी धोरणे लागू करण्यात हे पक्ष कांग्रेस व भाजपा पेक्षा तसू भरही कमी पडले नाहीत. प्रसंगी दडपशाही करण्याच्या बाबत तर या भांडवली पक्षापेक्षाही पूढे गेलेत. वास्तवात हे संसदीय डावे पक्ष छोटे भांडवलदार, छोटे दुकानदार, मध्यम व धनी शेतकरी वर्गाचं प्रतिनिधीत्व करत असल्याचाच दावा ठोकू शकतात. कामगारांच्या मतांसाठी फक्त लालझेंड्याचा वापर करतात, पण यांच्या झेंड्याचा रंग फिक्कट होत होत आता गुलाबी झालाय. आता कामगाराच यांच्यावर अविश्वास दाखवतात. कामगार वर्गाचा एक अल्प विभाग यांचा मतदाता आहे. पण व्यापक श्रमिक वर्गाची मते पर्यायहीनतेमूळे कधी या तर कधी त्या भांडवली पक्षाकडे जातात.

खरंतर एकुण मतदारांच्या फक्त ६०-७० टक्केच मते गेल्या संसद व विधानसभेच्या निवडणूकीत टाकली गेली, पण असं मानावं लागेल की खोट्या मतदानाला बाजूला जरी केले तरी कामगार वर्गातील एक मोठा विभाग अजूनही या संसदीय व्यवस्थेत काही आशा शिल्लक ठेवून आहे. अशा परिस्थितीत भांडवली निवडणूकांमध्ये कामगारांचे क्रांतीकारी प्रतिनिधीत्वच गायब असणं आणि कामगार वर्गाची स्वतंत्र राजकीय बाजू सादर न होणे आज देशातील क्रांतीकारी कम्युनिस्ट आंदोलनातली एक गंभीर कमतरता आहे. यावर पुढे बोलूया.

उत्तराखंड मध्ये मुख्य लढा भारतातील मोठ्या भांडवलदारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या दोन राष्ट्रीय पार्ट्यांमध्ये आहे - काँग्रेस व भाजपा. आज कांग्रेसचे सरकार सत्तेवर आहे. काही महीन्यापूर्वी काँग्रेसच्या हरीश रावत यांचे सरकार पाडण्याचा प्रयत्न भाजपाने केला होता, पण तो सफल झाला नाही. उत्तराखंड मध्ये बसपाने सुद्धा गेल्या निवडणूकीत १२ टक्के मते मिळवली होती. यावेळी अनेक जागांवर ती जोर लावत आहे. उत्तराखंड राज्य झाल्यापासून तिथे आळीपाळीने कांग्रेस, भाजपाची सरकारे आलीत. या दोन्ही पक्षांच्या सरकारांनी कार्पोरेट भांडवली लूटीद्वारे विकासाचं जे मॉडेल उत्तराखंड मध्ये गेली दोन दशकांत लागू केलय, ते सर्वांसमक्ष आहेच. एकीकडे हायड्रोपॉवर प्रकल्पाला भांडवली लूटीच्या नजरेतून ज्या प्रकारे लागू केले आहे त्याने उत्तराखंडातील पर्यावरणाची परिस्थिती असंतुलित झाली आहे. निसर्गाने नफ्याच्या या आंधळ्या लोभीपणाची शिक्षा दिलीच आहे. २०१३ मध्ये उत्तराखंडमध्ये जो पूर आला होता ती नैसर्गिक आपत्ती नव्हती, उलट बड्या भांडवलाद्वारे उत्तराखंडच्या नैसर्गिक संपत्तीच्या अतिव लूटीने निर्माण झालेला नैसर्गिक आपत्तीचा एक नमुना होता. या वेळेपर्यंत तब्बल ५५८ हायड्रोपॉवर प्रकल्प चालू आहेत. ५०० हेक्टरच्या जंगलाची जमिन आणि सोबत बरीच शेतीयोग्य जमिन या प्रकल्पांना दिली गेली आहे. तरी या प्रकल्पाद्वारे बेरोजगारी कमी करण्याचे दावे पोकळ सिद्ध होत आहेत. उत्तराखंडमध्ये सरकारी आकडेवारीनुसार तब्बल २० लाख बेरोजगार आहेत. तर ४० लाख बेरोजगार नोकरीच्या शोधात राज्य सोडून भटकत आहेत. दुसरीकडं ११०० गावांना निर्मनुष्य घोषित केलं गेलं आहे. कारण नोकऱ्यांसाठी प्रवास करण्याने तिथे काहीच उरलं नाही. राज्यांतील गरीब श्रमिक जनता मेहनत आणि निसर्गाच्या मोठ्या लूटीच्या परिणामी बरबाद झाली आहे, परंतु इथेही कुठलाच पर्याय उपलब्ध नाही. निवडणूकीत श्रमिकांच्या स्वतंत्र क्रांतीकारी पक्षाची अनुपस्थिती आहे.

पंजाबातही स्थीती फार काही वेगळी नाही. यावेळी तिथे त्रिकोणीय लढत होणार असं दिसतय. एका बाजूला अकाली-भाजपाची खुप अलोकप्रिय झालेली शासक आघाडी आहे. दुसरी कडे कांग्रेस पार्टी आहे जी स्वत:च्या कर्तुत्वाने नव्हे तर अकाली-भाजपाच्या अलोकप्रियतेमूळे जरा जोर पकडत आहे. तर दिल्लीतील आपल्या यशानंतर देशातील इतर छोट्या राज्यात बस्तान मांडण्याच्या उद्देश्याने केजरीवाल यांची आम आदमी पार्टी ही पंजाबात इलेक्शन लढवत आहे. पंजाबात शीख धर्माचे अस्मितावादी आणि कट्टरपंथी राजकारण करणारा आणि शीख जनता आणि पंजाबाच्या विशिष्ट हितांचे प्रतिनिधीत्व करणारा दक्षिणपंथी पक्ष, शिरोमणि अकाली दल आणि राष्ट्रीय स्तरावरील सांप्रदायिक फासीवादी पार्टी भाजपा यांची आघाडी आहे. वास्तवत: ही आघाडी राज्यांतील श्रीमंत शेतकरी लॉबी सोबत बड्या वित्त-औद्योगिक भांडवलदार वर्गाचं प्रतिनिधीत्व करत आहे. कॉग्रेस श्रीमंत शेतकऱ्यांच्या लॉबीतील अपेक्षेपेक्षा छोट्या विभागाचं प्रतिनिधीत्व करण्या सोबतच दलितांवरही डोळा ठेवून आहे. पंजाबात दलित लोकसंख्या इतर राज्यांच्या तुलनेत बरीच जास्त आहे. तेव्हा दलितांची मते राज्यात कुणाची सत्ता आणायची हे ठरवाण्याच्या स्थितीमध्ये जाऊ शकतात. आता आम आदमी पार्टी सारख्या तिसऱ्या खेळाडूने मैदानात उडी घेतल्यामूळे लढत तिरंगी होणार यात शंकाच नाही. आम आदमी पार्टीने क्रांतीकारी कम्युनिस्ट आंदोलन आणि सोबत १९८० व १९९० च्या दशकांतील अलगाववादी शीख आंदोलनातील कित्येक भुतपूर्व घटकांना सामावून घेतलं आहे. ती एकत्रच सर्वप्रकारच्या असंतोषाला अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे. तिचा अजेण्डा आणि मागणीपत्र सुद्धा वरवर पाहता सर्वसमावेशक, एकत्रीत सर्व मागण्या सामावून घेणारा दिसतोय. पण वास्तवात आम आदमी पार्टीचा अजेण्डा प्रत्येक ठिकाणच्या प्रत्येक समुदायाला संतुष्ट करण्याच्या दाव्यानंतरही, तो छोटे भांडवल, ग्रामीण व शहरी पेटीबुर्झ्वा, छोटा व्यापारी वर्ग इत्यांदीच्या सेवार्थ आहे. तीचे चारित्र्य एक पेटीबुर्झ्वा पार्टी एवढच आहे. या त्रिकोणीय लढतीत कुणीही जिंकले तरी पंजाबातील गरीब कष्टकरी वर्गाच्या हाती काहीच लागणार नाही. इथेही कामगार व सामान्य कष्टकरी समुहांना भांडवली निवडणूकांच्या मंचावर कुठलेच स्वतंत्र क्रांतीकारी प्रतिनिधीत्व नाही.

गोव्यात सुद्धा परिस्थिती अशीच आहे. तिथेही कांग्रेस, भाजपा, आणि आम आदर्मी पार्टी यांच्यात तिरंगी लढत होत आहे. मणीपूरमध्ये निवडणूकीच्या राजकारणाची समिकरणे थोडी वेगळी आहेत. कारण मणिपूर त्या राज्यांमध्ये आहे जिथे भारतीय राजसत्तेचे दमन टोकाला आहे. तिथल्या दमित राष्ट्रीयतांना त्यांच्या मूलभूत नागरी व लोकशाही अधिकार इंच इंच लढवून मिळवावा लागतो. आपण या राज्यांतील निवडणूकांतील समिकरणाच्या विस्तारात जात नाही. कारण लेख विस्ताराची मर्यादा. निश्चितपणे पूढे या प्रश्नावर स्वतंत्र उत्तर-पूर्वेकडील राजकारणाची स्थिती म्हणून लिहू. पण आता या प्रश्नांवर येऊ की आजच्या विधानसभा निवडणूका आणि सामान्यपणे भांडवली व्यवस्थेत होणाऱ्या निवडणूकांमध्ये श्रमिक वर्गाची भुमिका काय असायला पाहीजे ? आपण काय केलं पाहीजे ?

### भांडवली निवडणूका व क्रांतीकारी कामगारांची भूमिका

भांडवली व्यवस्था आणि तिच्यात होणाऱ्या निवडणूका निश्चितच ऐतिहासिक रित्या आपल्यासाठी अप्रासंगिक झाल्या आहेत. म्हणजे असं की ऐतिहासिक रित्या तो काळ लोटला आहे जेव्हा भांडवली लोकशाही आणि निवडणूका सामान्य कामगार वर्ग आणि श्रमिक जनतेला काही देऊ शकत होत्या. असं फक्त त्या काळात होतं, जेव्हा सामंतवाद व साम्राज्यवादा विरुद्ध क्रांतीकारी पद्धतीने एखादं रैडिकल परिवर्तन झालं असेल, एक क्रांतीकारी भांडवली वर्ग सत्तेत आला असेल आणि तो लोकशाही सुधारणांना अंतिम रूप देत असेल. केवळ आणि केवळ तेव्हाच भांडवली लोकशाहीतल्या निवडणूका देशांतील सामान्य कष्टकरी वर्गाला काहीतरी देऊ शकतात. या व्यतीरिकत, भांडवली व्यवस्था तिच्याच प्रगतीशील सकारात्मकतेला ओझं होऊन बसते, तसं तिच्यांतील निवडणूकांची सुद्धा प्रासंगिकता ऐतिहासिक रित्या संपून जाते.

भारतात ही सकारात्मकता पूर्ण करण्याचा काळ कधीच आला नाही. कारण आपल्या देशाला एका ऐतिहासिक वसाहतवादी गुलामीचा इतिहास होता. इथं स्वातंत्र्य हे सामंज्यस्यातून भांडवलदारांच प्रतिनिधीत्व करणाऱ्या कांग्रेस पक्षाच्या हाती आले होते, जिथं जनतेशी कुठल्याच तऱ्हेचं सख्य नव्हतं. पण हे अगदी ठाम आहे की आजच्या काळात ह्या भांडवली निवडणूका जनतेपूढे कुठलाच पर्याय ठेवत नाहीत. म्हणजेच आजच्या भांडवली लोकशाहीतल्या निवडणूका पर्यायहीनतेच्या निवडणूका असतात. आजच्याच निवडणूकांवर नजर फिरवली तरी लक्षात येईल. तुम्ही कितीही मनाला समजावण्याचा प्रयत्न करा व आश्वस्त करण्याचा प्रयत्न करा, तुम्ही जाणून असता की आम्हा कष्टकरी कामगारांसाठी ही पर्यायहीन निवडणूक आहे, जिथं एक पार्टी वा आघाडींच्या कारभारांने वैतागून आम्ही दूसऱ्या पार्टी वा आघाडीला मतदान करतो बस्स. आपल्यालाही माहीतीच आहे की काही विशेष परिवर्तन होणार नाही. पण तरीही ही एक भांडवली पक्षांना त्यांच्या

पान १७ वर

# कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतीकारी प्रतिनिधीत्वाचा प्रश्न

पान १७ वरून

मागच्या ५ वर्षांची शिक्षा देण्यांची रित झाली आहे. शिक्षा म्हणून जनता पुढच्या ५ वर्षांसाठी दुसऱ्या भांडवली पक्षाला मतदान करते, जे पून्हा ५ वर्षे आपलं जगणं दुभर करतात. त्यांना त्याच्या पुढच्या निवडणूकीत आपण शिक्षा देतो व पून्हा मागील भांडवली पक्षांना अथवा कुठल्यातरी तिसऱ्याच भांडवली पक्षाला मतदान करतो. पण ही फक्त राग व्यक्त करण्याची तऱ्हा आहे, एक पद्धत आहे. आपल्यालाही माहीत आहे की आपल्या समोर कुठलाच पर्याय नाही आहे. पण कामगार वर्ग आणि कष्टकरी लोकसंख्येतील एक व्यापक हिस्सा आहे ज्यांना अजूनही या भांडवली निवडणूकांतून काही आशा आहे. खरंतर वैज्ञानिक व ऐतिहासिक विश्लेषणा अंती आपण असं म्हणू शकतो की निवडणूकांच्या माध्यमांतून दूरवरही व्यापक कष्टकरी जनतेला काहीच मिळणार नाही. वैज्ञानिक व ऐतिहासिक स्तरांवर भांडवली लोकशाहीतल्या निवडणूका अप्रासंगिक व व्यर्थ बनल्या आहेत. पण असं म्हणता येईल का, की भांडवली लोकशाहीतील निवडणूका राजकीय दृष्टया अप्रासंगिक झाल्या? नाही. निश्चितच क्रांतीकारी कम्युनिस्टांसाठी आणि कामगार वर्गाच्या उन्नत अल्पसंख्य विभागासाठी भांडवली निवडणूका अप्रासंगिक व जुन्या झाल्यात. पण वैज्ञानिक व ऐतिहासिक रित्या समाजातील उन्नत क्रांतीकारी समूहाला आणि इतर तत्वांसाठी जी गोष्ट अप्रासंगिक व जुनी आहे गरज नाही की ती देशातल्या श्रमिक समूहाच्या बहुसंख्येसाठी ही अप्रासंगिक व्हावी. वास्तवत: असं झालं सुद्धा नाहीच. मागच्या संसदेच्या व विधानसभेच्या निवडणूकांमध्ये मतदान करणाऱ्या मतदात्यांची टक्केवारी वाढत आहे. आणि या घटनेला शासक वर्गाद्वारे 'ब्रेनवॉश' वा 'सम्मोहन विद्येचा प्रयोग करणे' असं म्हणून समजून घेता येणार नाही. खरं हे आहे की भारतातील ८४ कोटी सर्वहारा व अर्धसर्वहारा विभागांतील मोठ्या संख्येला या भांडवली निवडणूकांबाबत अतुट आस्था नसली, तरी निवडणूकांबाबतचा एक विभ्रम आणि अर्धाअधुरा भ्रम अजून शिल्लक आहेच. जर एक मोठी अल्पसंख्या सुद्धा भांडवली लोकशाही आणि निवडणूकांवर भ्रमग्रस्त वा संशयग्रस्त का होईना भरवसा ठेवत असेल, वा तीचा विश्वास अद्याप पूर्णत: तुटलेला नाही आहे वा विकल्पहीनता आणि अर्धामुर्धा विश्वासाच्या मिश्रीत भावनेमूळे जर ६५ ते ७० टक्के मतदार मतदान करत असतील तर असं मानावं लागेल की भांडवली लोकशाही आणि तीच्या निवडणूकांतील राजकीय अवकाशाची संधी क्रांतीकारी कम्युनीस्टांनी सोडता कामा नये. त्यांनी अगदी निश्चितपणे या मंचाचा रणकौशल्यांच्या रुपात वापर आपल्या क्रांतीकारी उद्दीष्टांच्या पूर्ततेच्या दिशेने पूढे न्याया करायला हवा. त्यांनी भांडवली निवडणूकांच्या मंचाचा वापर व्यापक जनसमुदायांची राजकीय शिक्षण आणि प्रचार करण्यासाठी करायला पाहीजे. जर एखाद्या देशांतील क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टी या स्थितीत नसेल, तर ती निवडणूकीत गैर-भागीदारीची घोषणा देऊ शकते. पण निश्चितच हा नारा दीर्घकाळासाठी असू शकत नाही. एकतर जनता क्रांतीकारी परिवर्तनासाठी तयार होईल, शासक वर्ग आपले शासन चालू ठेवायला अक्षम बनेल. त्यावेळी मग व्यापक कष्टकरी जनता क्रांतीकारी पार्टीच्या बहीष्काराच्या घोषणांचा स्विकार करेल. अन्यथा, जनतेच्या व्यापक समुदायांचा भांडवली लोकशाही आणि तीच्या निवडणूकांवर अजूनही (अर्धाअधूरा आणि संशयग्रस्त का होईना) विश्वास आहे, तर त्या स्थितीत क्रांतीकारी पार्टीला निवडणूकांत रणकौशल्याच्या स्तरावर भागीदारी करून त्याचा वापर जनतेच्या राजकीय आणि वैचारीक स्तर उन्नत करण्यासाठी केला पाहीजे.

दुसरी गोष्ट अशी की व्यापक कष्टकरी जनसमुदायांचा जो हिस्सा अजूनही भांडवली लोकशाहीप्रती विभ्रमग्रस्त आहे आणि तीच्या प्रति एक छिन्नविन्न भरवसा राखून आहे, तो फक्त क्रांतीकारी पार्टीच्या पत्रके, मुखपत्रे आणि भाषणांद्वारे या विभ्रमांतून मुक्त होणार नाही. भांडवली निवडणूकांच्या मर्यादांना केवळ आणि केवळ तेव्हाच प्रदर्शित केल्या जाऊ शकतात, जेव्हा क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टी भांडवली निवडणूकांच्या मंचावर एक स्वतंत्र कामगार पक्षाचे प्रतिनिधीत्व करेल (स्वतंत्रचा अर्थ आहे, अन्य भांडवली पार्टी व भांडवली वर्गाच्या प्रभाव आणि वर्चस्वांतून मुक्त, ना की राजकारण आणि पार्टी नेतृत्वापासून मुक्ती), तीच्यात रणकौशल्याच्या स्तरावर भागीदारी करा आणि तीच्या माध्यमांतून क्रांतीकारी प्रचार करण्या व चेतवण्या सोबत भांडवली व्यवस्था आणि भांडवली लोकशाहीच्या अंतीम मर्यादांनाही प्रकाशीत करता येइल. म्हणजे या रणकौशल्याच्या स्तरावरील भागीदारीतून ती हे प्रदर्शित करेल की सर्वात उदार, रैडिकल व प्रगतीशील प्रकारांतली भांडवली लोकशाही सुद्धा कामगार वर्गाच्या हितांच्या गोष्टी पूर्ण करू शकत नाही; ती वास्तवत: एक बुर्झ्वा वर्गा (भांडवलदार वर्ग) ची लोकशाही असते, मग ती उष्टे तुकडे का देईना, ती बेरोजगारी आणि गरीबीतून कष्टकरी समुदायांची मुक्ती करू शकत नाही, कारण भांडवली व्यवस्थेला बेरोजगारांची गरज असते. म्हणजे भांडवली लोकशाही आणि निवडणूकांची ऐतिहासिक अप्रासंगिकता आणि व्यर्थतेला राजकीय स्तरांवर प्रदर्शीत करण्याचा रस्ता हा आहे की व्यापक कायदेतर आंदोलने, म्हणजेच सामान्य संप आदी शिवाय क्रांतीकारी कम्युनिस्ट पक्ष भांडवली व्यवस्था आणि तीच्या भांडवली लोकशाहीच्या अंतिम मर्यादांना व्यापक कष्टकरी समुदायांसमोर उघडं करावे.



लेनीनने लिहलं होत की कायदेशीर व कायदेतर राजकीय कार्यामध्ये 'वा' / किंवा हे चिन्ह नाही लावल पाहीजे. उलट 'आणि' शब्दाचा वापर करायला पाहीजे. लेनीनच म्हणनं होत की कामगाराच्या क्रांतीकारी आंदोलनाचे एक आणि कायदेतर संघर्ष (जसे की संप) करण्याचा रस्ता स्विकारायला पाहीजे, जो की निश्चितच जास्त महत्वाचा आहे. पण जर त्याला या रस्त्यावर पूढे जायचे असेल तर त्याला कायदेशीर रूप आणि माध्यमांचा (**जीच्यात भांडवली निवडणूकांमध्ये रणकौशल्याच्या स्तरावर भागीदारी एक प्रमुख रूप आहे**) सुद्धा वापर करायला पाहीजे. लेनिन बोल्शेविक पार्टीद्वारे भांडवली निवडणूकांचा अतिशय मर्यादित भांडवली लोकशाही मध्ये बोल्शेविकांद्वारे प्रयोगाचे उदाहरण देत सांगतात की व्यापक कष्टकरी जनसमुदायांना रशियामध्ये या कायदेशीर कार्याशिवाय तयार करने अवघड होते.

निश्चितपणे, क्रांतीकारी कम्युनिस्ट या गोष्टींवर मजबूत विश्वास ठेवतात की कामगारांची सत्ता आणि समाजवादी व्यवस्थेची स्थापना भांडवली निवडणूकांच्या माध्यमांतून होऊच शकत नाही, कारण अशा राज्यसत्तेचे येणं हे भांडवली राज्यसत्तेच्या उद्ध्वस्तीकरणा शिवाय शक्य नाही. आणि भांडवली राज्यसत्तेचा अर्थ नुसता सरकार असा नसतो. वास्तवत: क्रांतीकारी दृष्टीतून सरकार भांडवली राज्यसत्तेचा ऐतिहासिक दृष्टया खुप कमी महत्वाचा भाग आहे. भांडवली राज्यसत्तेचे स्थायी घटक आहेत, पोलीस, सेना, सशस्त्र बल, नोकरशाही आणि तीची न्यायपालिका. वास्तवत: हे भाग भांडवली राज्यसत्तेच्या खायच्या दातांचे काम करतात. जसे संकटकाळात भांडवली संबंध धोक्यात सापडतात, तसे ही भांडवली व्यवस्था तीचे खायचे दात दाखवायला सुरुवात करते आणि कायदेमंडळ म्हणजेच संसद आणि संसदेची भुमिका गौण बनते. म्हणून कामगार राज्याची स्थापना आणि समाजवादी व्यवस्था निर्मीतीसाठी संपूर्ण भांडवली राज्यसत्तेच्या ध्वंसाच्या अनिवार्यतेबाबत कुठलाच प्रश्न केला जाऊ शकत नाही. चीलीमध्ये सल्वादेर अयेन्देच्या नेतृत्वात जेव्हा समाजवादी पार्टीने निवडणूक जिंकली, तेव्हा थोड्या दिवसांत कामगारांच्या बाजूने कल्याणकारी धोरणांची सुरुवात करताच, चिलीच्या बड्या भांडवलदार वर्गाने साम्राज्यवादाशी हातमिळवणी करून सत्तापलट केली आणि सैनिक राज्याची स्थापना केली. असं ते का करू शकले? कारण क्रांतीकारी आंदोलनाद्वारे जनतेचा क्रांतीकारी पुढाकार खुला झाला नव्हता; कारण जनता सशस्त्र नव्हती; कारण सत्ता आणि शक्तीच्या प्रश्नांवर जनता अजूनही कमजोर होती; भांडवलाची पकड समाजात अजून कायम होती. ज्याच्या बळावर सेना आणि पोलीसांचा एक मोठा हिस्सा भांडवलदार वर्ग आपल्या सोबत घेऊ शकत होता आणि साम्राज्यवादाच्या साहाय्याने तख्तापलट करू शकत होता. जनतेने मतदान करून अयेन्देला सत्तेत आणलं होतं, रस्त्यावरची लढाई लढून नाही. आणि जेव्हा अयेन्देच्या विरोधात प्रतिक्रियावादी सत्तापलट झाली तेव्हा जनतेचा एक मोठा हिस्सा निष्क्रीयतेसह (जरी ती खेदपूर्ण निष्क्रीयता होती) तमाशा बघत होता. चीलीचं हे उदाहरण दाखवतय की लेनीनची शिक्षा वैज्ञानिक आणि ऐतिहासिकरीत्या वर्गसमाज्याच्या संपूर्ण काळासाठी योग्य आहे की, क्रांतीचा राज्यसत्तेचा प्रश्न असतो आणि राज्यसत्तेचा प्रश्न वास्तवता शक्तीचा प्रश्न आहे. त्यामुळे कामगारांच्या राज्यसत्तेची स्थापना आणि समाजवादाची निर्मीतीची सुरुवात क्रांतीकारी मार्गानेच होऊ शकते.

मग याचा असा अर्थ आहे का की भांडवली निवडणूकांमध्ये रणकौशल्याच्या स्तरावर भागीदारीच करायची नाही ? नाही, उलट याचा असा अर्थ निघतो की जोवर जनतेच्या व्यापक समुदायांची एक विशाल अल्पसंख्याही भांडवली लोकशाही आणि निवडणूकांप्रती काही एक भरवसा बाळगुन आहे. तोवर क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टीला कामगार वर्गाच्या स्वतंत्र राजकीय पक्षाचं प्रतिनिधीत्व करत भांडवली निवडणूकांमध्ये रणकौशल्याच्या रूपात भागीदारी केली पाहीजे. रणकौशल्यात्मक (टैक्टीक्स)भागीदारीत अर्थ काय आहे? याचा अर्थ कामगार क्रांती, कामगार सत्ता स्थापीत करण्यासाठी आणि समाजवाद निर्मीतीसाठी रणनीति (स्ट्रेटजी) भांडवली व्यवस्थेच्या अधिन निवडणूकांत भागीदारी नाही होऊ शकत, म्हणजे निवडणूकांच्या माध्यमांतून कामगार सत्ता आणि समाजवाद येऊ शकत नाही. ही क्रांतीची रणनीति नाही होऊ शकत पण क्रांतीच्या रणनीतिला पूढे घेऊन जाण्यात आणि त्यासाठी जनसमुहांना जागृत, गोलबंद आणि संगठीत करण्यासाठी फक्त क्रांतीकारी पार्टीचे पत्रके, आणि वृत्तपत्र पुरेसे नाहीत. या रणनीतिसाठी कम्युनीस्ट पक्षाला भांडवली लोकशाहीच्या मर्यादा आणि तीच्या ऐतिहासिक, अप्रासंगिक, व्यर्थतेला प्रदर्शित आणि सिद्ध करायला हवे. असं केवळ तेव्हाच होऊ शकते जेव्हा भांडवली निवडणूकांमध्ये रणकौशल्याच्या स्तरावर कम्युनिस्ट क्रांतीकारी पक्ष हस्तक्षेप करेल. भांडवली संसदवादाचा आम्ही वैज्ञानिक आणि ऐतिहासिक रीत्या मनोगत रुपात खंडन करतो. परंतु या खंडनालाच बुर्ज्वा संसद व विधानसभांचा वस्तुगत अन्त नाही समजायला हवे. तिच्या वस्तुगत अंताची जमिन तेव्हाच तयार होईल, जेव्हा बोल्शेविक मूल्यांवर कसलेली क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वात रस्त्यावरचे आंदोलन पुढे जाईल आणि सोबतच अशा पार्टीच्याच नेतृत्वात बुर्ज्वा संसद आणि विधानसभांत आणि सोबतच नगरपालीकांमध्ये रणकौशल्याच्या स्तरावर भागीदारी केली जाईल आणि तिच्या मर्यादांना उघडे पाडलं जाईल.

**शेवटी...**

हे एक मोठं आव्हान आहे. आज देशभरांत बुर्झ्वा निवडणूकांमध्ये कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतीकारी पक्षाचं प्रतिनिधीत्व करणारी कुठलीच पार्टी अस्तित्वात नाही आहे. एका बाजूला डावी दुस्साहसवादी कार्यदिशा आहे. जी भांडवली निवडणूकांवर बहिष्काराची घोषणा देते आहे. तर दुसरीकडे सुधारणावादी, दुरुस्तीवादी नकली कम्युनिस्ट पक्ष आहेत, ज्यांचं राजकारण वस्तुत: भांडवली व्यवस्थेच्या शेवटच्या सुरक्षा रांगेचे काम करत आहेत. अशामध्ये या पाच राज्यांतील विधानसभा निवडणूकांमध्ये कामगार वर्गाचं अजिबात प्रतिनिधीत्व नाही. त्याच्या परिणामी कामगार वर्गाचा एक मोठा हिस्सा भांडवली पक्षांच्या मागे जायला मजबूर आहे. याचे नुकसान फक्त राजकीयच आहे असं नाही तर विचारधारात्मक सुद्धा आहे. कामगार वर्ग मग विचारधारात्मक स्तरावरही शेपूट बनू लागतो, निशस्त्र होऊ लागतो आणि भांडवली विचारधारेच्या वर्चस्वाच्या अधिन जाऊ लागतो.

आजच्या परिस्थितीत क्रांतीकारी कम्युनिस्ट आंदोलनासमोर कित्येक महत्वपूर्ण कार्यभार आहेत. पहीला हा की आज एका क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टी निर्माणाची आवश्यकता आहे. अस्तित्वातील कम्युनिस्ट गटांमधील पोथीनिष्ठा त्यांचे जूने झालेले कार्यक्रम, रणनीति आणि सामान्य रणकौशल्य आणि नेतृत्वातील संधीसाधूपणा या कारणांमूळे त्याच्यामध्ये कोणतीही टिकाऊ एकजुट होऊ शकत नाही. अशात, नवे क्रांतीकारी विचार केंद्र, प्रयोग केंद्र आणि भर्ती केंद्र विकसित करत, एका नव्या क्रांतीकारी कम्युनिस्ट पार्टीची निर्मीती करावी लागेल. दुसरं मोठं काम म्हणजे या नव्या कम्युनीस्ट पक्षाच्या नेतृत्वात कामगार वर्गाचं एक व्यापक आंदोलन संगठीत करावे लागेल व गरीब शेतकरी आणि शेतमजूरांच्या संगठना व यूनियन बनवतच संघर्षाची सुरुवात करावी लागेल आणि सोबतच निम्नमध्यमवर्गीय लोकसंख्येला अधिकतम शक्य मागण्या पूढे आणून भावी नव्या समाजवादी क्रांतीच्या बाजूने त्यांना जिंकावे लागेल. पण तरीही एवढचं पुरेसं राहणार नाही. तिसरं महत्वाचं कार्य म्हणजे क्रांतीकारी कम्युनीस्ट पार्टीच्या नेतृत्वांमध्ये भांडवली निवडणूकांमध्ये व इतर संविधानिक कायदेशीर मंचावर कामगार वर्गाचे स्वतंत्र क्रांतीकारी पक्षाचे प्रतिनिधीत्व करतच रणकौशल्याच्या रूपात हस्तक्षेप करावा लागेल आणि भांडवली लोकशाहीच्या सर्व औपचारीक वायद्यांना पूर्ण करण्याचा हट्ट आणि संघर्षाद्वारे तिच्या अंतीम मर्यादाना उघडं करावं लागेल. जेणेकरून व्यापक कष्टकरी जनतेला एका चांगल्या आणि अधिक

पान १८ वर

# नोटबंदीच्या पार्श्वभुमीवर बजेट आणि आर्थिक आढावा

पान २० वरून

करांतून सुटकेचा वायदा मिळालाय, तर बँकींग क्षेत्राला बुडीत कर्जाच्या नावाखाली शिक्षेऐवजी करात सवलतींचे बक्षिस मिळालय. मोदीने कॅपीटल गेन्सवर टॅक्स लावण्याचा उल्लेख काही दिवसांपूर्वीच केला होता पण मालकांच्या तंबी समोर तो तसाच राहून गेला. तरीही जेटली साहेब तक्रार करताहेत की खुप कमी लोक टॅक्स भरतात म्हणून.

**स्वस्त घरांचा खोटारडेपणा**

या बजेटमध्ये गरीबांसाठीच्या स्वस्त घरांना आधारभूत संरचनेत सामावण्याच्या घोषणेबाबतही अनेक वल्गना होत आहेत. २०१४ मध्ये मोदीनेच ६ कोटी स्वस्त घरे बनवण्याचा वायदा केला होता, नंतर मोदीनेच २५ जून २०१५ ला प्रधानमंत्री घरकूल योजनेची घोषणा केली, ज्यात बेघरांना घर देण्यासाठी २०२२ पर्यंत २ कोटी स्वस्त घरे बनवण्यात येणार होती, म्हणजेच दर वर्षी ३० लाख घरे होय. पण जुलै २०१६ मध्ये लक्षात आलं की पहील्या वर्षी फक्त १९,२५५ घरेच बनवली गेली. आता या योजनेलासुद्धा खाजगी बिल्डरांच्या घशात घालण्यात आले आहे. आणि उद्दीष्ट ही कमी करून १ कोटी करण्यात आलं आहे. त्यासाठी नफ्यावर १०० टक्के सुट, २ टक्के कमी व्याजदर आणि भांडवली लाभासाठी मोकळीक दिली गेली आहे. या बजेटमध्ये तरतुद केली आहे की मेट्रो शहरांत ३० वर्ग मीटर आणि इतर ठिकाणी ६० वर्ग मीटर पर्यंत चटई क्षेत्र असणाऱ्या घरांना स्वस्त घरे मानले जावेत. एवढ्या क्षेत्रात तर मुंबईत बिल्डर ५०० वर्ग फूटाचा फ्लैट बनवतात जो इथल्या इलाख्याच्या बाहेर सुद्धा २५-३० लाखांपासून सुरू होतो आणि महागड्या ठिकाणी तर २ कोटी पर्यंत जातो. असाच हिशेब आपण इतरही शहरांमध्ये लावू शकतो, खरंतरं ज्या बेघरांसाठी ही स्वस्त घरे आहेत त्यातली ९५ टक्क्याहून अधिक जास्तीतजास्त ५-१० लाख सुद्धा मोठ्या मुश्किलीनं खरेदी करू शकतील.

बिल्डरांना दिलेल्या या सवलतीं सोबतच खरेदीकरणाऱ्यांनाही सहाय्याचा मोठा डांगोरा पिटला गेलाय, ज्यात कर्ज घेतल्यास ३ ते ६.५ टक्के व्याज सरकार देणार आहे. त्यात ३ श्रेणी आहेत - ६ लाख, १२ लाख व १८ लाख वर्षाला उत्पन्न असणाऱ्यांची व त्यांना हे सहाय्य, बँकांकडून कर्जावर २० वर्षापर्यंत मिळेल. पण देशातली ८० टक्के जनता ज्यांच्या कुटूंबाच वार्षिक उत्पन्न १ लाखाहूनही कमी आहे, त्यांना हे २० वर्ष मुदतीच गृह-कर्ज कोणती बँक देईल? यावरून खुप चांगल्या रितीने समजून येईल की तथाकथित स्वस्त घरांचा फायदा नेमका कुणासाठी आहे - गरीब बेघरांसाठी की बड्याबड्या बिल्डर आणि मध्य वा श्रीमंत वर्गातील खात्यापित्या लोकांसाठी

**राजकारणातील स्वच्छता मोहीमेचे ढोंग**

एक अजून सोंग आहे राजकारणातल्या भ्रष्टाचाराची सफाई करून इमानदार लोकांना आणण्याबाबतचे. यासाठी पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांची मर्यादा २० हजारावरून २ हजारावर आणली आहे, निवडणूकीचे बॉण्डही सुरू करण्याचे आहेत. रोख रक्कमेची मर्यादा कमी करण्याचा जो मुद्दा आहे, त्यासाठी फार तर थोडे अधिक अकौंटंट लागतील जे जास्त पावत्या बनवतील. त्यात पून्हा जितका पैसा निवडणूकांत व रैलीत खर्च केला जातो त्याचा १० वा हिस्सा तरी बँकेत जमा केल्याचे दाखवले जाते का? अडानीच्या हेलीकॉप्टरमध्ये मोदीजी (वा इतर कुणी 'जी') जेव्हा झेप घेतात त्याची काही पावती बनते का? या गदारोळात गुपचुप परदेशातून देणग्या घेण्याची राजकीय पक्षांना देण्यात येणारी सुट वित्त विधेयकात घुसडवण्यात आली. निवडणूक रोखे योजनेत देणगी देणारा बँकेत पैसा जमा करणार आणि रोखे जारी करनार ज्यावर कुणाचच नाव नसणार आहे आणि बँकही घेणाऱ्याचे नाव गुप्त ठेवणार. त्यानंतर तो त्याला हव्या असलेल्या पक्षाला देऊ शकेल, जी त्याच्या बदल्यात बँकांकडून पैसे घेईल. आणि याची नोंद ठेवायची गरज नाही की पैसा कुणी दिला आहे. आता हे राजकीय पक्षातील लोक आरामात म्हणतील की त्यांना माहीत नाही पैसा कुणी दिलाय. म्हणजे जी थोडीशी माहीती अगोदर मिळायची तीही आता मिळणार नाही. अशा रितीने नगदी कमी करणाच्या नावाखाली राजकीय पक्षांना मिळणाऱ्या पैशांचा स्त्रोत पुर्णत: गुप्त ठेवण्याचा बंदोबस्त केला गेलाय. आता यांतून कुठची इमानदारी येणार याचा अंदाज सहज बांधता येईल.

**काय.. बजेटमुळे विकास होईल?**

गेल्या अनेक वर्षांपासून एक मोठी समस्या आहे ती नवीन रोजगाराच्या अनुपलब्धतेची. २०१४च्या निवडणूकीत मोदींने २ कोटी नव्या नोकऱ्या देण्याचा वायदा केला होता. पण गेल्या दोन वर्षात पूर्वीपेक्षाही नोकऱ्या कमी झाल्या. खासकरून नोटबंदीनंतर मोठ्या प्रमाणात श्रमिकांना बेरोजगार व्हावं लागले. हे बजेट यांना काही एक रोजगार देण्यासाठी मदत करेल?

काही वर्षांपासून वाढत्या महागाईच्या तुलनेत घटती मजुरी आणि नव्या रोजगारांच्या कमतरतेनं बाजारांतील उपभोग्य वस्तुंच्या मागणीने वाढीला प्रभावीत केल आहे, ज्यामूळे उद्योग, मागणीच्या तुलनेत अतिउत्पादनाच्या संकटाचा समाना करत आहेत आणि प्रस्थापित क्षमतेचा पूर्ण उपयोग अशक्य होऊ लागला आहे. रिझ्र्व बँकेच्या अनुसार क्षमतेचा उपयोग मार्च २०११ मध्ये ८३ टक्के तर जून २०१६ मध्ये ७२ टक्केच राहीला आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्र नव्या उद्योगांत गुंतवणूक करत नाहीत. भांडवली व्यवस्था साधारणता यांतून बाहेर पडण्यासाठी २ पद्धतीचा वापर करण्याचा प्रयत्न करते. त्या म्हणजे सार्वजनिक वा सरकारी क्षेत्राद्वारे गुंतवणूक आणि सरकारी खर्चात वाढ. पण सरकारी खर्चात या वर्षी फक्त ६ टक्के वाढीचा प्रस्ताव आहे जो १० वर्षांतील सर्वात कमी आहे. जीडीपी शी गुणोत्तर पाहीले तर त्यात अर्धा टक्का कमी झालाय. गरीबांना काही तात्काळ मदत देणाऱ्या रोजगार योजनांवर सुद्धा १ टक्केच वाढ केली आहे. गुंतवणूकीबाबत तर सरकारी भांडवली खर्चात १० टक्के वाढ आहे जी मागील वर्षाच्या सरासरी १२ टक्केहून कमी आहे. आणि सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगांतील गुंतवणूकीत तर २००० कोटीच्या कमीचा प्रस्ताव आहे. बँकाद्वारे होणाऱ्या गुंतवणूकीचे विचाराल तर बुडीत कर्जांमूळे बँकाकडे देण्यालायक भांडवलच नाही.तरी उद्योगांना कर्ज कमी नव्हे वाढवून दिले जाताहेत.

तेव्हा उद्योगांत नवी गुंतवणूक आणि नवीन रोजगाराची निर्मीती दूरवर नजरेत येत नाही. मग बजेट मधून गेल्या कैक वर्षांपासून नोकऱ्यांची कमतरता, घटती कमाई आणि वाढत्या महागाईने त्रस्त कामगार, छोटे व मध्यम शेतकरी, गावाकडून उधवस्त झालेल्या व शहरांत बारिक सारीक धंदे करणाऱ्यांना काय मिळाले? खुळखुळं सुद्धा नाही. होय, कामगार कायद्यांत बदल करून मालकांकडून कामावरून सहजच कमी करण्याच्या बंदोबस्ताची टांगती तलवार डोक्यावर जरूर आहे. अशा रितीने लहान व मध्यम शेतकऱ्यांचे कब्रस्तान तयार करण्यासाठी कंत्राटी शेती सुरु करायची घोषणा जरूर केली गेली, ज्याद्वारे कष्टकरी शेतकऱ्यांना कार्पोरेट गुलाम बनवता येईल. सोबतच सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रम खाजगी क्षेत्रातल्या भांडवलदारांना कवडी मोलानं सोपवायचे उद्दीष्ट तर आहेच.

अर्थव्यवस्थेच्या विकास-विस्ताराच्या शक्यतांशिवायही जर बड्या भांडवलदार वर्गाचे बजेट वर विशेष प्रसन्नतेचे कारण समजून घ्यायचे असेल तर या बजेटच्या प्रस्तावाला जीएसटी, नोटबंदी, डिजीटलाइजेशन, कॅशलेस इत्यादीं सोबत जोडून बघा. या बजेट मध्येही ३ लाखाहून अधिक रोखीच्या देण्या-घेण्यावर दंडासहीत खुप तरतुदी आहेत. ज्या अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक क्षेत्रांकडून औपचारिकतेकडे येण्यासाठी प्रोत्साहीत करतात व न येण्यासाठी दंड करताहेत. अनौपचारिक क्षेत्र भारतात जवळजवळ ४५ टक्के आहे. आणि बाजाराच्या मोठ्या हिश्शावर छाप टाकून आहे. आता या सगळ्या तरतुदी व उपायांनी त्याला औपचारिकतेकडे ढकलत आहेत. जिथं कमी खर्चाच्या फायदा संपल्यामुळे तो बड्या कार्पोरेट भांडवला समोर टिकू शकत नाही. यापेक्षा अधिक संख्येने श्रमिक बेरोजगार होतील. परंतु अर्थव्यवस्थेत विशेष विकास-विस्तार झाला नाही तरीही सद्य बाजारातच या बड्या कार्पोरेट भांडवल आणि त्यांच्या व्यापार संघाचा एकाधिकार वाढेल आणि परिणामत: नफा वाढेल. म्हणून त्यांचे प्रवक्ते भांडवली मीडिया आणि तज्ज्ञ बजेटवर स्तुती सुमने उधळत आहेत.

## रेल्वेचे टप्प्या-टप्प्याने खाजगीकरण - नुकसान जनतेचे, फायदा भांडवलदारांचा

रेल्वे बजेट समजण्यासाठी परिचालन गुणोत्तर वा ऑपरेटिंग रेशोला समजने गरजेचे आहे - या वर्षी तो ९५ टक्के राहीलाय. याचा अर्थ आहे १०० रु कमवण्यासाठी रेल्वेने ९५ रु खर्च केलेत. पण गेल्या बजेटमध्ये ९२ टक्केचा अनुमान होता. या बजेटमध्ये पुढील वर्षी साठीच त्यांचा अंदाज ९५ टक्के आहे. काही वर्षापूर्वी तो ९० हून खाली असायचा. रेल्वेच्या माझी अधिकाऱ्यांच्या मते हे प्रमाण १०० च्या ही पूढे आहे. पण रेल्वे बजेट साधारण बजेट सोबत मिसळून पारदर्शकता कमी करून त्याला कमी दाखवलं जातय. गेल्या ५ वर्षात प्रवासी भाडे अनेक तऱ्हेने २.५ ते ४ पट वाढवले गेले आहे. माल भाडे, तिकीट रद्द करने, प्लेटफॉर्म तिकीट, अन्य शुल्क देखील वाढले आहेत. मग प्रश्न आपोआप येतो की एवढे सगळं वाढवून देखील मग रेल्वेचा परिचालन गुणोत्तर कमी होण्या ऐवजी वाढला कसा?

याची दोन कारणे समोर येतात, एक सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या नावावर खासगी क्षेत्रांकडे संसाधनांचे हस्तांतरण (ज्यात भ्रष्टाचारही सामिल आहे) दुसरं म्हणजे अर्थव्यवस्थेतल्या सुस्तीमुळे मालाला उठाव नसणे. यातून हे स्पष्ट होत आहे की सरळ व चोरून भाडे अजून वाढवले जाईल. साधारण गाड्यां ऐवजी प्रिमीयम, हमसफर, तेजस आदी नावाने भाडे वाढवून गाड्या चालवल्या जातील, ज्यात प्रवास सामान्य लोकांना महागडा होऊन बसेल. या व्यतीरिक्त रेल्वेची साज-सामग्री, रूळ, सिग्नल आदी रखरखावाची स्थिती खराब होत आहे. चौक्या व साज संभाळण्यासाठी तब्बल सव्वा लाख पदे रिकामी आहेत. ज्यातून अपघात व प्रवासांच्या मुत्युत वाढ होत आहे. स्थिती इतकी खराब आहे की धुकं नसतानाही गाड्या लेट आहेत व रद्द होत आहेत. साधारण गाड्यांना सुरक्षित आणि वेळेवर चालवण्यात असमर्थ सरकारचे संपूर्ण लक्ष बुलेट ट्रेन सारख्या योजनेवर आहे. जिथ मोठा खर्च होईल पण उपयोग फक्त श्रीमंतच करू शकतील.

---

# कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतीकारी प्रतिनिधीत्वाचा प्रश्न

पान १७ वरून

उन्नत सर्वहारा लोकशाहीसाठी तयार केले जाऊ शकेल. हे तिसरं काम जरुर कठीण आणि जटील आहे आणि या कामाला हाती घेतल्यानंतर प्रारंभी अनेक चुकांसाठी सुद्धा तयार रहावे लागेल. पण तिच्यातील चुका आणि गुंतागुंतीला घाबरून दिर्घकाळापर्यंत त्याला स्थगित नाही करता येणार.

हे स्पष्ट आहे की चालू निवडणूकांमध्ये कुणालाच मतदान न करण्याने वा करण्याने काहीच फरक पडणार नाही. फक्त एवढचं होईल की कदाचित एका भांडवली पक्षाच्या जागेवर दुसरा भांडवली पक्ष सत्तेत येईल. वस्तुगत रित्या, फासीवादी भांडवली पार्टी आणि अन्य भांडवली पार्टी मध्ये सर्वहारा वर्गाला तात्कालीक रणनिती आणि सामान्य रणकौशल्यासाठी फरक करायलाच पाहीजे. पण हे ही स्पष्ट आहे की फासीवादी ताकदींचा खतरा कुठल्याही उदार भांडवली पक्षाद्वारे दूर होऊ शकत नाही. कारण तो उदार भांडवली पार्ट्यांच्या शासनकाळातच निर्माण झालेल्या अनिश्चितता, अराजकता, आणि असुरक्षितेच्या कारणांमुळे पैदा झाला आहे. त्यामुळे आपण या वा त्या भांडवली पक्षांमार्फत तात्कालीक आरामाची खुप जास्त अपेक्षा न करणेच योग्य राहील. आता तात्कालीक स्वरूपातही कामगार वर्गाला गरजेचे आहे की त्याने स्वतंत्र रीत्या आपल्या राजकीय पार्टीला भांडवली निवडणूकांच्या मैदानात रणकौशल्याच्या स्तरांवर भागीदारी करावी. याच्या शिवाय भारतात कामगार वर्गाचे क्रांतीकारी आंदोलन अधिक पूढे जाणार नाही.

# कविता - विदूषक

कविता कृष्णपल्लवी, अनुवाद - सोमनाथ केंजळे

विदूषक सिंहासनावर बसून
दाखवतो तऱ्हेतऱ्हेच्या करामती
दरबारी हसतात, टाळ्या पिटतात
आणि भ्यायलेले सभ्य नागरिक साथ देतात
त्यांना माहीतीय, विदुषक एक खुनी आहे
आणि दरबारात रक्ताच्या डागावरच
अंथरल्यात लाल पायघड्या
विदूषकाचा आवडता छंद आहे
युगपुरूष बनून रस्त्यावर भटकण्याचे सोंग रचने
भव्य दिव्य स्टेजवरून 'अच्छे दिना' च्या घोषणा करने
जे ऐकताच सम्मोहीत झालेली गर्दी
करू लागते जोरदार घोषणाबाजी
सदगृहस्थ भली माण्सं घाबरतात
शहाणे आपल्या बचावाच्या युक्त्या-प्रयुक्त्या जमवू लागतात
आणि विवेकवान माण्सं मात्र येऊ घातलेल्या बरबादीवर
विचार करू लागतात, चिंतातूर..
युगांपूर्वी जे हल्लेखोर बनून आले होते
तेच आता येऊ पाहताहेत पाहूणे बनून
विदूषक सामान्यांतून आपल्या महान बनण्याच्या
अगणित आठवणी सांगू लागतो
तो चंद्राला जादूई दोरी टाकून



ओढून जमिनीवर आणल्याचा दावा करतो
विदूषक शब्दांचा खेळ मांडतो
आणि अलंकार-वैचित्र्यांची मालिकाच लावतो
असो शब्द वा पोशाख वा लूट अन् दमनाची विधान
वा सामूहिक नरसंहार रचन्यासाठी विकसित केलंलं
संकेत विज्ञान
विदूषक सगळं कसं सुनियोजित आणि सुधारीत रितीनं करतो
आणि रचतो क्रुरतेच नव सौंदर्यशास्त्र
सर्कशीचा मालकच होऊ पाहतो विदूषक
जनमत त्याच्याच बाजूने असल्याचा
गणितीय तर्क त्याच्याच दिमतीला असतो
तरीही उद्वीग्न, अस्वस्थ आहे तो
दूर्गनगरासारख्या विशाल बंद सर्कशीच्या तंबू बाहेर
अजून निशब्द शांतता आहे, तळपणारे ऊन आहे
आणि इथंतिथं उठणारे धुळीची वावटळ सुद्धा आहेत
विदूषकाला समजत नाही ही रहस्यमयी शांतता
विदूषकाला सहन होत नाही चिमुरडयांच हसणं सुद्धा,
जे नसतं हतबल आणि भयग्रस्त
या तमाम आश्वस्तते नंतरही
भुतकाळातली प्रेतं सतावत राहतात विदूषकाला
तो भेदरलेलाच असतो सदैव

## महाविद्रोही राहुल सांकृत्यायन यांच्या जन्मदिनी ९ एप्रिल व स्मृती दिवस १४ एप्रिल च्या निमित्ताने त्यांची काही उद्धरणे

1. आपण आपल्या मानसिक दास्याच्या बेडीची एक एक कडी कठोरपणे तोडून फेकून द्यायला सदैव तयार रहायला हवं. बाहेरील क्रांतीपेक्षा मानसिक क्रांती जास्त गरजेची आहे. आपल्याला मागे पुढे उजवीडावीकडे दोन्ही हातांनी नंगी तलवार नाचवत आपल्या सगळ्या रुढींना कापत पुढे जावं लागेल.

2. खरं सांगायचं तर, ''धर्म तर शिकवतोच आपसांत वैर ठेवायला. भावालाच भावाचे रक्त प्यायला''. हिंदूस्तानातील लोकांची एकजूट, धार्मीक मिलापातून नाही होणार, तर ती धर्माच्या चीतेवरच होइल. कावळ्याला घासून राजहंस नाही बनवता येणार. धर्माचा रोग स्वाभाविक आहे. त्याच्या मृत्यू खेरीज दुसरा उपाय नाही.

3. जर जनशक्ती वर विश्वास असेल तर आपन निराश होण्याची गरज नाही. जनतेच्या दुर्दम्य शक्तीने फासीवादाच्या काळ्या ढगांमध्ये आशेच्या विजेचा संचार केलाय. तीच अमोघ शक्ती आपल्या भविष्याची सुद्धा गॅरंटी आहे.

4. रुढींना लोक चिकटून यासाठी बसतात कारण त्यांच्यासमोर रुढींना तोडल्याची पर्याप्त उदाहरणे नसतात.

5. आपल्या समोर जो मार्ग आहे त्याचा बराच भाग घडून गेलाय, काही आपल्या समोर आहे आणि बराच भाग पुढे येणार आहे. घडून गेलेल्यातून आपण सहाय्य घेतो, आत्मविश्वास कमावतो, घडलेल्या गोष्टीकडे परत मागे जाण्याने प्रगती नाही तर प्रतीगती-अधोगती होइल. आपण पून्हा मागे तर जाउ शकत नाही कारण भुतकाळाला वर्तमान बनवणे निसर्गाने आपल्या हाती नाही दिलं.

6. जातीभेद ना केवळ लोकांना तुकड्या तुकड्यात विभाजित ठेवतो, तर सगळ्यांच्या मनांत उच्चनिच्च पणाचा भावही निर्माण करतो. आपल्या पराभवाचा सारा इतिहास सांगतो की या जाती भेदामुळेच आज आपली ही अवस्था आहे .ही घाण त्याच लोकांनी पसरवली आहे जे धनी होते किंवा ज्यांना धनवान व्हायचं होतं. सगळ्यांच्या मागे विचार आहे धन गोळा करून ठेवण्याचा किंवा त्याच्या रक्षणाचा. गरीब वा स्वताच्या कष्टाची भाकर खाणाऱ्यालाच सर्वात अधिक नुकसान सोसावं लागतं. पण हजारो वर्षांपासून जातीपाती विषयी जनतेमध्ये जो एक विचार पैदा केलाय, तो त्यांना वास्तविक परीस्थितीकडे नजरही टाकू देत नाही. स्वार्थी नेते यामध्ये सगळ्यांत मोठी अडचण आहेत.



7. धर्माच्या बुडाला वाळवी लागली आहे. त्यामुळे धर्मांच्या मेलमिलापाच्या गोष्टी कधी कधीच कानावर पडतात. पण मग हे शक्य आहे का, 'धर्म नाही सांगत आपसांत वैर करण', या शुद्ध खोटारडेपणाचे काय करायचं. जर धर्म वैर सांगत नाही तर मग शेंडी व दाढी च्या संघर्षात हजारो वर्षापासून आपला देश का वेडा झालाय. जुन्या इतिहासाच्या गोष्टींना सोडा, आज सुद्धा या देशातली शहरे व गावांतून एका धर्माच्या लोकांच्या रक्ताची तहान दुसऱ्या धर्म वाल्यांना कोण लावतय, कोण गाय न खाणाऱ्याना गाय खाणाऱ्यांशी लढवत आहे. खरी गोष्ट तर ही आहे की धर्म तर सांगतोच आपापसांत वैर धरायला. धर्म आजही तसाच हजारो मुर्ख विश्वासांचा पोषक आणि मनुष्याच्या मानसिक दास्याचा समर्थक आहे .जसा तो पाच हजार वर्षांपुर्वी होता. सगळे धर्म दयेचा दावा करतात, पण भारतातल्या या धार्मीक झगड्यांना पाहीले तर खुद्द माणूसकीच आसरा शोधू पहाते आहेत.

# नोटबंदीच्या पार्श्वभुमीवर बजेट आणि आर्थिक आढावा

## डबघाईला आलेली अर्थव्यवस्थेची हालत भ्रामक प्रचाराचा उपयोग करून लपवण्याचा आणि गरिबांच्या किमतीवर गबरगंडांना फायदा पोहचविण्याचा खेळ

मुकेश त्यागी


१ फेब्रुवारीला अर्थमंत्री अरुण जेटलींनी भाजप सरकारचं चौथ्यांदा बजेट सादर केलं, ज्याच्या बरोबर एक दिवस आधी आर्थिक सर्वे सादर केला गेला. बजेट नंतर चर्चेच्या नावाखाली टिव्हीवर चाललेल्या तमाशांमध्ये 'अर्थतज्ञांनी' या गोष्टीवर आनंद व्यक्त केला, की मोदी-जेटली जोडीने नोटबंदीनंतर जनतेचे हाल बघूनही, त्यांना आराम देण्यासाठी खजिन्यांचे तोंड न उघडता, वित्तीय अनुशासन कायम ठेवले आहे आणि आपली मुठ बंदच ठेवली आहे. म्हणजेच कामगार-शेतकऱ्यांना खुश ठेवण्यासाठी वायफळ खर्च न करता, बोलाचाच जमा बोलाचाच खर्च दाखवून काम भागवलं गेलं. त्यांच्या या शौर्यासाठी आणि मालक वर्गाशी इमानदारीवर 'बाजार' अर्थात धनिक वर्ग विशेष फिदा झालाय.

हे बजेट नोटबंदी नंतरच्या परिस्थितीत सादर केले गेले. नोटबंदीमुळे देशातल्या बहुसंख्य कष्टकऱ्यांनी मोठ्या अडचणी सहन केल्या, उद्योग आणि इतर व्यापारांतील सुस्तीच्या परिणामी मोठ्या संख्येने कामगार बेकार झाले, छोट्या धंदेवाल्या गरीबांना उध्वस्त व्हावं लागलं, अगोदरच २ वर्ष दुष्काळानं पिडलेला शेतकरी, पडत्या किंमतीत शेतीमाल विकायला मजबूर झाला. काळा पैसा, नकली नोटा, आतंकवाद संपवणे आणि कैशलेस अर्थव्यवस्थेच्या नावाखाली केलेल्या नोटबंदी दरम्यान झालेल्या या अडचणीच्या काळातच प्रधानमंत्री मोदी जनतेला म्हणाले होते की लोकांनी देशहीतासाठी या अडचणी सहन करून त्याग केला, तर देशातील अनेक समस्या सुटतील, अर्थव्यवस्थेला दुरगामी लाभ मिळेल, आणि त्यानंतर आयुष्यात सुखच सुख असेल.अशाही बातम्या येत होत्या,ज्यात मोदी समर्थक जनतेला समजावत होते की नोटबंदी नंतर श्रीमंताचा जो काळा पैसा जप्त होईल, त्यातूनच मोदीजी लोकांच्या जनधन खात्यात एक चांगली रक्कम जमा करतील. सोबत मध्यमवर्गालाही मीडियाद्वारे करांमध्ये सवलतींचे गाजर दाखवले जातच होते. त्यामुळे या बजेटबाबत सामान्य जनता जरा जास्तच आस लावून होती.

पण ३१ जानेवारीच्या आर्थिक सर्वेक्षणात, जे बजेट पूर्वी सादर केले जाते, त्यात स्पष्ट केले आहे की नोटबंदीच्या परिणामी अर्थव्यवस्थेत पडझड झाली आहे, व्यापार बंद झालेत, श्रमीक बेरोजगार झालेत, शेतकरी व शेतमजूरांची कमाई अत्यल्प झाली आहे आणि याचा एकुण परिणाम पुढे वर्षभर राहील अर्थात याचा फायदा मिळायला अजून जास्त वेळ लागेल. आर्थिक सर्वेक्षणामध्ये सरकारने एक अजून नवीन गोष्ट सांगितली की काळा पैसा, खोट्या नोटा, कैशलेस अर्थव्यवस्था यापेक्षाही अधीक नोटबंदीचा उद्देश घर/जमिनीच्या किंमती कमी करने हा होता. खरतर मोदीजी सर्व गरीबांना स्वस्तात घरे देणार होते आणि नोटबंदीच्या परिणामी किंमती कमी होऊ लागल्याही आहेत. आपण अधिक खुश होण्यापूर्वीच सांगण्यात आलं की काही काळ घरांच्या किंमती खाली येतील पण जीएसटी लागू होताच पून्हा वाढू लागतील.

आर्थिक सर्वेक्षणात हे ही सांगितलं की मोदी सरकारच्या धोरणांमुळे अर्थव्यवस्थेला वेग मिळाला आहे. तरी बँकांची बुडालेली कर्जे या वर्षी वाढून गेल्या वर्षीपेक्षा दुप्पट झाली आहेत. सरकारी बँकांमध्ये तर दिलेल्या एकुण कर्जाच्या १२ टक्के एवढी संख्या झालीय. पण तरी हा एकुण आकडा नाही आहे, कारण वसूल न झालेल्या कर्जापैकी जी बँकखाती बुडीत खात्यात टाकली (write off) जातात ती रक्कम इथे मोजली जात नाही.या अगोदर प्रचार केला जायचा की बँकाची कर्जे दाबण्याचं काम, गरीबी निर्मुलनाच्या नावाखाली चाललेल्या योजनांत, लोन घेतलेले छोटे शेतकरी वा इतर छोटीमोटी कामधंदे करणारे लोक करतात. पण सर्वेक्षणानुसार एकुण बुडीत कर्जापैकी ७१ टक्के हिस्सा हा फक्त ५० बड्या कंपन्यांनी दाबलाय, ज्यांनी सरासरीनं प्रती कंपनी २० हजार करोड रूपये दाबून ठेवलेत. त्यातल्या सर्वात मोठ्या १० कंपन्यांनी प्रती कंपनी ४० हजार कोटी रूपये दाबून ठेवलेत.

पण, २० व ४० हजार कोटी रूपए दाबून ठेवणं या व्यवस्थेत कलंक आणि बदनामीचं नव्हे तर 'मेहनती'च काम समजल जातं. त्यामुळं अशाच लोकांना आजच्या व्यवस्थेत 'उद्यमी' म्हटलं जात, कारण लुटमार करनेच या लुटारू भांडवली व्यवस्थेचा खरा उद्योग आहे. आणि रात्रंदिन भिकार काम करणारे गरीब श्रमिक तर आळशी व फुकटखाऊ असतात, म्हणूनच भुकेनं मरतात. आणि आता या भांडवली व्यवस्थेच्या न्यायाची अपरिहार्यताच आहे की या महान 'उद्यमीनां' संकटातून बाहरे पडण्यासाठी मदत करायला हवी, म्हणजेच अजून जास्त कर्जे दयायला हवीत. पण बँकांकडे तर यासाठी भांडवलच शिल्लक नाही, मग आता काय करायचं? सर्वेक्षणात यावरही उपाय सुचवलाय, की रिजर्व्ह बँकेकडे ४ लाख कोटी रूपयांचं फालतू भांडवल आहे ते घेऊन या सरकारी बँकांना दयावे, जेणेकरून या उद्योगपतींना अजून मोठी कर्जे बुडवण्याची संधी देण्यासाठी पुरस्कृत करता येइल. आणी जोवर असं होत नाही तोपर्यंत सरकार बजेटमधून ७० हजार कोटी रू. देईल. पैकी २५ हजार कोटी रू. तर यावर्षी अगोदर दिलेच आहेत. लगेचच दुसऱ्या दिवशी बजेट मध्ये वित्तमंत्र्यांनी या बँकांना १० हजार कोटी रू भांडवल दिले सुद्धा.




या वेळच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार 'गमतीची' बात अशी की जरी देशात वस्तु आणि श्रमाचा एकिकृत बाजार असला, म्हणजेच वस्तु आणि श्रमीक दोघेही मोठ्या संख्येने आदला बदली होतात. तरीही सर्व आयोग / योजनानुसार सार्वजनिक क्षेत्रांतही संपत्ती आणि मिळकती ची प्रादेशिक असमानता कमी होण्याऐवजी वाढतेच आहे. त्यासाठी दरवर्षी ९० लाख लोक रोजीरोटी कमवायला घरदार सोडून प्रवासी बनतात आणि ही संख्या वर्षाला ४.५ टक्के दराने वाढतेय. हे ही सांगीतल गेलं की स्त्रीयांची संख्या यामध्ये वाढते आहे, कारण वस्त्र आणि इलेक्ट्रॉनिक उद्योग स्त्रीयांना खास करून भरती करू इच्छितात. अशा तऱ्हेने घरकामासाठी सुद्धा मोठ्या संख्येने देशातील कमी विकसित भागात मोठ्या प्रमाणात महीलाच असतात. मग त्यांचे जगणं खरच सुधारत आहे? खरं बघता यापैकी बरेचजण मुंबई, दिल्ली, लुधियाना, तिरुपुर व बैंगलोर इत्यादी शहरांतील घाणेरड्या रोगट झोपडपट्ट्यात, जीथं हे लोक देशातली सगळी आर्थिक वृद्धी आणि भांडवलदार मालकांच्या वाढत्या संपत्तीचे सगळं ओझं आपल्या खांद्यावर घेतात. हे तुम्हाला सहजासहजी नजरेसही पडणार नाहीत, कारण या वस्त्या उंच उंच इमारती आणि चमचमणाऱ्या मॉलच्या मागे लपून असतात. एखाद्या खुराडयात कोंबडया कोंबाव्यात तसं थोड्या जागेत मोठ्या संख्येनं राहतात. 'मायानगरी' मुंबईची दोन तृतीयांश लोकसंख्या शहरांतील फक्त ८ टक्के जागेत राहते. इथं हरेक धर्म, जाती, प्रदेश, भाषा इत्यादींची लोकं बीकट स्थितीत राहतात. ते सर्वजण श्रम मूल्यांच्या लूटीचे बळी आहेत.

### सर्वांसाठी पायाभूत उत्पन्न कि सर्वांसाठी जीविताचा अधिकार

आर्थिक सर्वेक्षणामध्ये एक नवा विचार मांडलाय, सर्वांसाठी पायाभूत उत्पन्नाचा, जो इतर सर्व योजना-सब्सिडी इत्यादींची जागा घेईल. त्याच्या अंतर्गत आधार कार्डशी जोडलेल्या खात्यात सरळ पैसा टाकला जाईल. खुप दिवसांपासून असा प्रचार चालू आहे की आधार संलग्न खात्यांवर डायरेक्ट पैसे टाकल्यास भ्रष्टाचार होणार नाही, सरकारी मदत सरळ गरजूं पर्यंत पोहचेल आणि चोरीही कमी होईल. स्वत: मोदीनेच दावा केलाय की सरकारी योजनांचा पैसा सरळ बँक खात्यात टाकल्याने भ्रष्टाचार कमी होऊन ४० हजार कोटी रू. वाचवले गेलेत. पण खुद्द केंद्र सरकारच्याच नीती आयोगाद्वारे चंडीगढ, दादरा नगर हवेली आणि पाँडीचेरी मध्ये स्वस्त धान्यांऐवजी खात्यात पैसे टाकणाऱ्या पायलटचा अहवाल या दाव्याला खोटं ठरवतोय. या रिपोर्टनुसार ४० टक्के प्रकरणात पैसा लाभार्थीपर्यंत पोहचलाय की नाही याची खात्रीच नाही. अर्ध्याहून कमी प्रकरणात काहीच भेटलं नाही आणि १७ टक्के लोकांना जितकं मिळालं पाहीजे त्याहून जास्त मिळाल आहे. या योजना, जसे रेशनिंग बंद केली तर त्या कुटूंबाला धान्या ऐवजी पैसे मिळूनही स्वत:च्या खिशातून सरासरी १००-२०० रू महीना जास्त खर्च झाले.

शेवटी 'आधार' काय करू शकतो? तो फक्त एवढच सांगेल की खातं अमूक एका व्यक्तीचं आहे, पण कुणाची आर्थिक स्थिती कशी आहे, कुणाला मदत मिळायला हवी, कुणाला मिळायला नको, किती मदत मिळायला हवी, या गोष्टी निश्चित करणे आणि योग्य-अयोग्य व्यक्तीपर्यंत पोहचवायचं काम तर याच सरकारी यंत्रणेला आणि स्थानिक पुढारी-ठेकेदार यांनाच करायचे आहे. इथं आधार किंवा बँकखातं काय करणार? दुसरी गोष्ट, खरी गरज तर सर्वांना रोजगार मिळण्याची व त्याचा न्यायोचित मोबदला ठरल्या वेळी मिळण्याचा आहे. याच रितीने समान शिक्षण, आरोग्य आणि निवास इत्यादी मूलभूत सुविधांची उपलब्ध करण्याची जबाबदारी सरकारची आहे. पायाभूत उत्पन्नाच्या नावाखाली सरकार या जबाबदारीतून पळ काढू पाहतय.

या आर्थिक सर्वेक्षणा नंतर अर्थमंत्र्यांनी जे बजेट सादर केले, त्यावर आस लावून बसलेल्या सामान्य गरीब जनतेला काहीच मिळालं नाही - त्यांच्या रोजगारांसाठीच्या व्यवस्थेबाबत, जनधनच्या खात्यातून काही मिळण्याबाबत आणि चवली पावलीच्या दरानं शेतीमाल बाजारात विकणाऱ्या शेतकऱ्यांना मोकळा श्वास घेता यावा म्हणून, कुठल्याच तरतुदी बाबत एक अवाक्षर ही लिहलं गेलं नाही. पण शेअर बाजाराला बजेट खुप आवडलं आहे. देशी-विदेशी वित्तभांडवल आणि कार्पोरेट्स ही खुश आहेत, बजेटवर कौतुकांचा वर्षाव होतोय, बडे भांडवलदार याला १० पैकी १० मार्क देऊन मोकळे झालेत. या लोकांनी आनंदी व्हायलाच पाहीजे कारण, कुणाला करात सुट मिळाली, कुणाला पायाभूत सुविधांच्या नावावर स्वस्तात जमिन मिळाली, शेतीच्या नावाखाली कृषि उद्योगांना स्वस्तात कर्ज मिळाले आहे. देशाच्या कथित विकासासाठी विमानतळाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून पडत्या भावात घेतलेल्या जमिनीपैकी विमानतळ चालवणाऱ्या कंपन्यांना ५० एकर जमिन दुकाने, हॉटेल, इत्यादी बनवायला मिळाली आहे.

मध्यमवर्गातील मोदी भक्तांसाठीसुद्धा ५०० ते १००० रू महीना आयकराच्या सवलतीचा तुकडा फेकला आहे. संपत्तीमध्ये दिर्घमुदतीच्या भांडवली लाभाचा (कैपिटल गैन्स) फायदा सुद्धा आता ३ वर्ष ऐवजी २ वर्षातच मिळणार, यातूनही त्यांना काही कर वाचवायची संधी मिळणार आहे. नोटबंदीनं घायाळ झालेले आणि मोदींवर थोडे नाराज असणाऱ्या लहान-मध्यम कार्पोरेट समुहांतील मोठ्या हिश्शाला - ५० कोटी हून लहान व्यवसाय करणाऱ्या ९६ टक्के कंपन्यांनाही कार्पोरेट टैक्स मध्ये ५ टक्केची सुट (३० ऐवजी २५) मिळाली आहे. आणि ही सुट तेव्हाही चालू राहील जेव्हा यांचा कारभार ५० कोटीहून जास्त असेल, म्हणजेच स्थायी फायदा. परंतु यांनीच नोटबंदीनंतर ज्या कामगारांना कामावरून कमी केलं होतं त्यांच काय ? त्यांना काहीच नाही. उलट हे बडे कार्पोरेटवाले सरकारी आकड्यानुसार अगोदरच ३० टक्केचा दर असताना ही २१ टक्केच कर देत आहेत. तेही जी कमाई दाखवतात, त्यातही चुकीच्या यादीद्वारे जे लपवले जातात, त्यांचा तर काहीच हिशोब नाही.

विदेशी वित्तभांडवलाचे मालक सुद्धा खुश आहेत. पोर्टफोलियो इन्वेस्टरना अप्रत्यक्ष

पान १८ वर

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३ • संकल्प प्रिंटर्स, जी-१, द्रोणगिरी कॉ. ऑ. सोसायटी, साईनाथ नगर, ठाणे फोन न. ०९०२९९१६५०५ कडून मुद्रित